नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन


अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र युगवाणी दिवाळी अंक १९७८ विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र युगवाणी

युगवाणी दिवाळी अंक १९७८ विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र युगवाणी दिवाळी अंक १९७८ विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र



युगवाणी दिवाळी अंक १९७८ विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र युगवाणी दिवाळी अंक १९७८ विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र युगवाणी दिवाळी अंक १९७८ विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र युगवाणी

अनुक्रमणिका

साभार पोच

क्रमांक	पुस्तकाचे नाव	लेखक	प्रकाशक	पृष्ठे	मूल्य
					रु. पैसे
१.	पराग (कविता)	के. एन. नांदुरकर	मंगल प्रकाशन, नशिरावाद, जि.-जळगाव	४३	५-००
२.	माझी कहाणी (उस्ताद अल्लाउद्दीनखां)		प्रास प्रकाशन, ३९ नाथमाधव, कांदिवली पूर्व, मुंबई–६७	५८	१२-००
३.	कर्दळ (कविता)	रमेश ललगूणकर	माग्रस प्रकाशन, धंतोली, नागपूर.	६९	९-००
४.	नमस्कार मुंबईला (कविता)	विजयकुमार पवार	खोली क्र. ४ मोहिद्दीन चाळ, कालिना व्हिलेज मार्ग, मुंबई–२९	३६	२-००
५.	मराठी रंगभूमीची जडण घडण	लक्ष्मणराव मा. जाधव	साहित्य संशोधन मंडळ ९३ सी, राजेन्द्र नगर इन्दूर	८८	६-५०
६.	अष्टवक्र महागीता	भगवान श्री. रजनीश	जीवन जागृती केन्द्र १०१ न्यू टिंबर मार्केट, पुणे–२.	१३६	८-००
७.	तळ्यातल्या साऊल्या (कविता)	पुरुषोत्तम पाटील	पाप्युलर प्रकाशन ३५९, ताडदेव रोड मुंबई–३४	७५	८-००
८.	बाई विना बुवा	उद्धव ज. शेळके	पाप्युलर प्रकाशन, ३५९, ताडदेव रोड मुंबई–३४	२४८	२४-००
९.	चिंतनसुधा (वैदिक संस्कृतीचा इतिहास)	वि. त्र्यं. शेटये	दास्ताने रामचंद्र आणि कं. ४५६, रविवारपेठ, फडके हौद, पुणे–२	२४४	२८-००
१०.	महाराष्ट्राचा देव्हारा (दैवतांचे दर्शन)	रामचंद्र चितामण ढेरे	विश्वकर्म साहित्यालय, २०३५/२ सदाशिव टिळक रस्ता, पुणे–३०	१४०	१०-००
११.	चाहूल	बाबा मोहोड	वंदन प्रकाशन, मंगलधाम, माधान, जि. अमरावती	८८	१०-००
१२.	उखाहरण	संपा. डॉ. यु. म. पठाण	मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद	३०६	३५-००

अनुक्रमणिका

' महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ ' पुरस्कृत विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

ऑक्टोबर-नोव्हेंबर, १९७८
आश्विन-कार्तिक, १९००

संपादक :
वि. बा. प्रभुदेसाई

मूल्य पाच रुपये) (वर्ष ३४, अंक ७-८

संपादक–मंडळ :
सुरेश डोळके, श्रीधर शनवारे, सुनील सुभेदार, बजरंग सरोदे, यशवंत मनोहर, म. बा. कुंडले

संपादकीय

'युगवाणी'चा हा दिवाळी अंक कथा, कविता, ललित व वैचारिक लेख अशा विविध साहित्याने सजवण्याचा प्रयत्न केला आहे. तरीपण, पृष्ठसंख्येच्या मर्यादेमुळे यापुढे कथा, कविता, एकांकिका यांसारख्या ललित साहित्याच्या प्रसिद्धीवर खूपच बंधने घालून द्यावी लागणार आहेत.

'युगवाणी'च्या सर्व रसिक वाचकांना दिवाळीच्या पाडव्यापासून सुरु होणारे नूतन वर्ष आनंदाचे व उत्कर्षाचे जावो.

प्रा. ना. सी. फडके यांचे देहावसान

मराठीतील एक नामवंत साहित्यिक प्रा. ना. सी. फडके यांचे वयाच्या ८४ व्या वर्षी पुणे येथे दि. २२ ऑक्टोबर, १९७८ रोजी देहावसान झाले. प्रा. फडके यांनी आपल्या लेखन कार्याची सुरुवात चरित्र-लेखनाने केली असली तरी पुढे त्यांची विशेष कीर्ती झाली ती कथा-कादंबरीच्या क्षेत्रात. याव्यतिरिक्त निबंध, लघुनिबंध, समीक्षा अशा वाङ्मयाच्या विविध क्षेत्रात यशस्वीपणे संचार करून प्रा. फडके यांनी आपले स्वतःचेच असे एक युग निर्माण करून ठेवले आहे. ललित साहित्याप्रमाणेच संगीत क्रीडादी ललित कलांचेही आप्पासाहेब हे एक जाणकार होते. मराठी प्रमाणेच इंग्रजी भाषेवर देखील त्यांचे चांगले प्रभुत्व होते. मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदापासून केन्द्र शासनाने बहाल केलेल्या किताबापर्यंत अनेक मानसन्मान आप्पासाहेबांना लाभले होते. 'कलेसाठी कला' या सिद्धांताचा आयुष्यभर पुरस्कार करून त्यासाठी शेवटच्या घटकेपर्यंत विपुल वाङ्मय निर्मिती करणारे कै. आप्पासाहेब फडके यांना वि. सा. संघाची विनम्र आदरांजली.

अनुक्रमणिका

अंतरंग

मुरलीधर कुलकर्णी / अपंग

बारमध्ये अस्पष्ट प्रकाश. पिवळसर धूसर. माझ्यासमोर व्हिस्कीचा पेला. सोडा ओतलाय. खालून वर सळसळत येणारे बुडबुडे. आपोआप जन्मणारे. वर येऊन फुटणारे. मीही तसाच. बुडबुडा. माझं आयुष्य निरर्थ. ते फुटणार आहे या बुडबुड्यासारखं. मी फोडणार. मी भोगतोय जिवंतपणीचं मरण व्हिस्कीच्या घोटांनी माझ्यावर अंमल केलाय. पण मी शुद्धीवर आहे. वार कमं हलकंफुलकं बुडबुड्यासारखं. अस्पष्ट प्रकाश माझ्यात विरघळतोय. मी बारमध्ये एकटा. एकटा म्हणजे पिणारे आहेतच. पण ते आपापले. आपापल्यात मी एकाकीच. शुद्धीवर नसलो काय असलो काय, एकाकीचं. हे असंच चालणार आहे. एकला चालो रे! तुला सोबत कुणी नाही. वायको नाही, मुलं नाहीत. मुलं ती मुलं. त्यांचं जग वेगळं. माझं वेगळं. मी त्यांच्याशी कितीही एकरूप व्हायचा प्रयत्न केला तरी मोठी होत जातील तशी दुरावणार आहेत. ती आपली नसतातच. म्हणजे रहात नाहीत. आपली कधी असतात? अगदी लहान असतात, आपल्यावर अवलंबून असतात तेव्हा. ती आपल्या वाटेनं जाणार. मी मागं रहाणार. एकटा. एकाकीच मरणार. मरण तर सर्वांनाच आहे. पण मी मरणाअगोदर मरणार आहे.

मी सुसाईड करतोय. स्लो सुसाईड. नाहीतरी आयुष्यात आता फारसा अर्थ उरलेला नाहीय. लारानं माझ्या आयुष्यातून हा सारा अर्थच काढून घेतला. लारा आता माझी राहिलेली नाही. तिला बॉय फ्रेन्ड मिळालाय. म्हणाल, या वयात बॉय फ्रेन्ड? कसं शक्य? पण जगात अशक्य असं काय आहे? काय घडेल कुणाला सांगता यायचं नाही. इडिपसला त्याच्या आईचा नवरा व्हावं लागलं. तो दैवयोग असेल. पण काही गोष्टी घडवल्या तर घडतात. त्या देवाच्या हातातल्या म्हणणं वेडेपणाचं. लारानंही घडवून आणलं. कदाचित् तिच्या शरीरानं, कदाचित् तिच्या मनानं म्हणा हवं तर. लाराला तिचं शरीर प्रिय. ती शरीरावर प्रेम करते. नवऱ्यावर नाही. आता जॉनवर— बॉय फ्रेन्डवर करते. तिच्या दृष्टीनं फरक काय?

तसा जॉन एकेकाळचा माझा दोस्तच. दोस्तीचं रूपान्तर आता नफरतीत. मी त्याचा द्वेष करतो, मत्सर करतो. तो डोळ्यांसमोर नकोसा होतो. लाराचं त्याच्यावर प्रेम ही कल्पनाच असह्य. तुम्हांला आश्चर्य वाटेल तीन मुलं झाल्यावर प्रेम हे कसं शक्य आहे? मघा म्हटलंच अशक्य असं काय आहे? म्हणूनच मी मला या मदिरेत बुडवलंय. तिन्ही त्रिकाळ नसलं तरी ड्युटीवरून सुटलो की हा बार. एवढाच मार्ग उरलाय आता. काही काळतरी स्वत:ला विसरता येतं. तेव्हा जग देखील सुंदर दिसतं. आनंदी वाटतं. मग आपण सुखात गटांगळ्या खातो. आपण हसलो की आरशातले आपण हसतो तसंच. बारमधल्या बुडबुड्यांसारख्या झाज संगीतात व्हिस्की मारून मी स्वत:ला बुडवून टाकतो. सारं जग एक सुंदर संगीत बनतं.

तशी दारू मला नवीन नव्हतीच. लहानपणीच चर्चमध्ये तिची दीक्षा मिळाली. पण मी तिच्यापासून अलिप्तच राहिलो. अगदी दोन मुलं होईस्तोर.

लारा भेटली चर्चमध्ये मासच्या वेळेला. अगदी सहज. गाठी पडत गेल्या. बोलत राहिलो. मैत्री झाली आणि मैत्रीचं रूपान्तर प्रेमात. लारावर मी बेहद्द खूश होतो. तीही माझं वैगुण्य विसरून. फारशी उंचं नसलेली. गौर अपरं जाडसर नाक. कुरळे केस. बांध्यानं भरलेली. माझ्याही अपेक्षा माफक. माझ्यात मुळात व्यंग. कुबडा. जन्मापासूनचा. माझ्या आयुष्यात अव्यंग मुलगी येईल अशी माझी अपेक्षाच नव्हती. कुठली तरी लंगडी पांगळी सांगून यायची. पण घडलं अनपेक्षित. अव्यंग, दिसायला माझ्यापेक्षा उजवी लारा माझ्या आयुष्यात आली. मला स्वर्ग दोन बोटं उरला.

साधारण नोकरी आणि असलेलं व्यंग एवढं माझं भांडवल. जीवनाबद्दल फारशा अपेक्षा मी बाळगलेल्या नव्हत्याच. लग्नापूर्वीच मी निराश होतो. लाराच्या ओळखीमुळं माझ्या आकांक्षा प्रफुल्लित झाल्या. लारा पदवीधर न् नोकरी करणारी, कमावती. तरीही तिनं माझा स्वीकार केला. घरच्यांचा विरोध सहन करून. वडील श्रीमंत. पैसेवाले. तिला म्हणाले,

"लारा, पीटर तुला आवडलाय् ?"

"आमचं लग्नाचं ठरलंय."

"विचार कर पोरी. त्याच्यापेक्षा चांगला श्रीमंत नवरा मिळू शकेल तुला. तो रॉबीन पहा. श्रीमंत आहे. मोटार आहे. चारदोन बंगले. त्याचीही तुझ्यावर मर्जी आहे."

"मी पक्का विचार केलाय. त्यात बदल नाही."

"बघ पस्तावशील."

"त्रिवार नाही."

"पीटरशी लग्न केलंस तर आईवडिलांच्या मायेलाही मुकशील. आमचं ऐक !"

"इतर कुठल्याही बाबतीत मी तुमचं ऐकेन व ऐकलं. पण या निवडीच्या बाबतीत मी ठाम आहे."

"रॉबीन तुझ्याबरोबर बॉलमध्ये नाचला त्यावेळीच त्यानं माझ्यापाशी मन खुलं केलं. अगदी सुखात डुबशील बघ".

"तुम्ही माझं आयुष्य दुःखी करू नका."

"तुझी मर्जी".

लारानं हे मला सांगितलं तेव्हा तिचा केवढा अभिमान वाटला ! माझ्या अपेक्षा केवढ्या उंचावल्या ! आजवर वैराण भासणाऱ्या आयुष्यात लाराच्या रूपानं वसंत वहरला. सहारामध्ये एकाएकी ओॲासिस निर्माण व्हावं तसं वाटलं. मी सारं लाराला बहाल केलं. आयुष्यच तिच्या पायावर वाहून टाकलं. मला कुठला आधारच नव्हता. लारानं मला सहारा दिला. जीवनात सुखाचा मंत्र गवसला.

मी एक कारकून. साधा शालान्त परीक्षा जेमतेम पास झालेला. लारानं महाविद्यालयातील चार वर्षं पूर्ण केलेली. पण स्वतःच्या शिक्षणाचा तोरा मिरवला नाही. ती स्वतःला माझ्याच गुणवत्तेची समजायची. लारा खूपच समंजस वाटली तेव्हा मी कारकून. माझ्याजवळ मोटरगाडी नव्हती. रॉबीनसारखे बंगले नव्हते. माझ्याशी लग्न करण्याचा निर्णय घेऊन लारानं आपला सुखाचा जीव दुःखातच लोटला. कारण तिनं जर ठरवलं असतं तर लक्ष्मी तिच्यापुढं हात जोडून उभी राहिली असती. तिनं संपत्ती पाहिली नाही, प्रेम पाहिलं. हाच तिच्या मनाचा मोठेपणा. खऱ्या प्रेमाला तिनं लाथाडलं नाही. तिचं माझ्यावरचं मनापासूनचं प्रेम यामुळं प्रत्ययाला आलं.

लारानं माझ्यावर काही दया केलेली नव्हती. मी असा कुबडा म्हणून तिच्या मनात माझ्याविषयी कणव निर्माण झाली होती की नव्हती हे कळण्यासारखं नव्हतं. कणवेपोटी जर तिनं मला आपलं मानलं असेल तर त्यातूनच खरं प्रेम निर्माण झालं. पण माझ्या कुबडेपणासंबंधी तिनं एक अवाक्षरही कधी काढलं नाही.

एकदा समुद्रकिनाऱ्यावर संध्याकाळच्या अंधारउजेडात मी तिला परखड विचारलं,

"लारा, तू माझ्याशी लग्न करण्याचा जो निश्चय केलाय तो पक्का आहे ना ? माझ्यावरचं तुझं आजवरचं प्रेम अगदी सत्य आहे हे मी मान्य करतो. तरीपण व्यवहार ज्याला म्हणतात त्याचा तू विचार केलायस् का ? मी असा कुबडा. लोक तुला हसतील. म्हणतील, लारानं जन्माचा जोडीदार कसा निवडलाय पाहिलात ?"

"म्हणू देत लोक वाट्टेल ते. तू मला कधी अपंग दिसलाच नाहीस. `अरे, मन अपंग नसलं म्हणजे झालं. तुला असं वाटतं का, की माझ्याशी तुझं लग्न होऊ नये ? तुझं कुणावर प्रेमबीम--"

"माझी चेष्टा करतेस लारा. अगं माझ्यावर प्रेम करून आणि माझ्याशीच लग्न करण्याचा निर्णय घेऊन तू मला इतकं उपकृत केलंय की ते उपकार या जन्मी तरी फिटणार नाहीत. माझ्यासारख्या कुबड्यावर कुठली पोरगी प्रेम करील ?"

"पीटर, तू हे उपकार मानतोस हे मला बरं वाटत नाही. खऱ्या दिलाच्या प्रेमाला उपकाराची भाषा शोभत नाही."

"तरीही लारा असं वाटतं कधी कधी—माफ कर मला— की कसल्यातरी भाराखाली मी गुदमरतोय. जन्मभर मी तुझाच आहे."

ती संध्याकाळ आठवतेय. सूर्य बुडून गेलेला. समुद्राच्या संथ लाटा पुळणीवर फुटणाऱ्या. पश्चिमेकडली अंधारत जाणारी आकाश लाली लाटांच्या कणाकणांत भिनलेली. किनाऱ्यावर आकाशाशी भिडलेले सुरूंचे वृक्ष. इकडं पायांखालून निसटणारी, मऊसर पांढरी रवाळ वाळू. सारं निसर्गचित्र रोमारोमात भिनून आणि लाराचं घट्ट आलिंगन. तिचे उष्ण ओठ आणि नसनस् उद्दीपित करणारा उरोजस्पर्श.

"आता काय उरलंय तुझ्याकडं शिल्लक ?"

"हे सारं शरीर. तुझंच आहे रे ते. ते उरतंच कितीही दिलं तरी."

त्या संध्याकाळी आम्ही खरेखुरे पूर्णतया एकमेकांचे झालो. कारण एकमेकांच्या मनातले संदेह फिटले. एकमेकांसाठी जगण्या-मरण्याच्या आणाभाका झाल्या. ती नशा आणि धुंदी आयुष्यभर टिकविण्याची प्रार्थना परमेश्वराच्या लाडक्या पुत्रापाशी आम्ही केली. वळण घेतलेल्या किनाऱ्यावरील दिव्यांच्या तारका आमच्याकडं पाहून गालातल्यागालात हसत असताना आम्ही परतलो.

लग्न झालं ती संध्याकाळ नि रात्र आठवतेय. तिचे सारे मित्र-मैत्रिणी आणि माझे, शिवाय कलीग्ज जमलेले. प्रेझेंटस्चा खच. सेन्टचा धुंद गंध. विवाहाला शुभेच्छा व्यक्त केल्या गेल्या. नंतरची रात्र फक्त आमची दोघांचीच. खिडकीतून चंद्र नि चांदण्या मिस्किलपणे बघत असलेल्या.

लग्नाला लाराचे वडील अर्थात आले नाहीत. त्याचंही दु:ख तिला वाटलं नाही. पुढंही संबंध राहिले नाहीत. कधी फिरकले नाहीत. माहेरच्या मायेला ती दुरावली. पण ती त्याबद्दल कधी अवाक्षर बोलली नाही की कधी डोळ्यांतून पाणीही आलं नाही. लारानं माझ्यासाठी केवढा त्याग केलेला ! तिच्या उपकाराखाली मी अक्षरश: दबून गेलो. तिचे उपकार मी तिचं सारं ऐकण्यानं, विरोध न करण्यानं फेडण्याचं ठरवलं. तिचं मन दुखावणार नाही याची काळजी घेण्याचं ठरवलं. नाहीतरी विरोध करण्याचं कारणच काय होतं ?

जेन आणि रोमेल होईस्तवर आमचा संसार दृष्ट लागेल असा होता. पण पुढं लारा अंतर्मुख होत गेली. माझ्याशी कामाव्यतिरिक्त बोलेनाशी झाली. फटकून वागू लागली. माझी चीड येऊ लागली. मी समजुतदारपणानं लाडिकपणा केला तर तिच्या कृतीतून तिरस्कार बाहेर पडू लागला.

"पुरे रे तुझं हे पीटर. मला आता सारं नकोसं झालंय. किळस येते."

"हल्ली झालंय काय लारा तुला ?"

"काही नाही. तू लागून घेऊ नकोस." तिनं टाळाटाळ केली.

जॉन माझा मित्र. वेळी अवेळी घरी येई. मी कधी संशय घेतला नाही. कधी काही मनात आलं नाही. जॉन माझा जसा मित्र तसाच लाराचाही. मुलांना अंकल खूप आवडायचा, कारण तो त्यांच्यासाठी चॉकलेट मिठाई आणायचा. हे काही जगावेगळं नव्हतं. हे असंच चालत राहिलं.

एके दिवशी ऑफिसातून सहज किनाऱ्यावर फिरायला गेलो. वेळ संध्याकाळची. तर एका बाजूला जॉन नि लारा हातात हात घालून फिरतायत्. विश्वासच बसेना. डोळे चोळून पुन्हा पुन्हा पाहिलं. तो जॉनच होता नि ती लारा. मी नुसता बघत राहिलो. गर्दीकडं येताना त्यांचे हात सुटले. त्रयस्थासारखं घराकडं निघाले. मला त्यांनी पाहिलं नव्हतं. मुलांचा प्रश्नच नव्हता. त्यांना सांभाळायला आया ठेवलेली.

वेगळ्या वाटेनं मी अगोदर घरी पोचलो. लारा रात्र पडताना परतली. दारात येऊन उभी राहिली. मी तिच्या डोळ्यात पाहिलं. खाली मान घालून ती घरात शिरली.

"कुठं गेली होतीस लारा ?" मी मुद्दामच विचारलं.

"फिरायला."

"बऱ्याच दिवसांपासून तू फिरायला जाणं टाकलं होतंस. आणि आज— ? शिवाय मुलांना घरी ठेवून ?"

"रोज जातातच ना ती रोझीवरोबर मीच कशाला हवीय ?"

"मुलांचं काय ठरवलंयस् तू ?"

"म्हणजे ?" अनपेक्षित प्रश्नानं ती दचकली.

"माझं वेगळं. पण मुलांचं कसं व्हायचं ?"

"तुला म्हणायचंय काय ?"

"हेच. समजा तू जॉनशी लग्न करण्याचा निर्णय घेतला—"

"पीटर, काय बोलतोयस् तू हे ! कसं शक्य आहे ते ? कुठल्या आधारावर बोलतोस तू ?"

"आज मी तुम्हा दोघांना समुद्र किनाऱ्यावर हातात हात घालून फिरताना पाहिलं." मी मनावर संयम करीत म्हणालो.

लारा प्रथम अवाक् झाली. शब्द मिळेना. नंतर किंचाळून म्हणाली—

"हा तू माझ्यावर खोटा आरोप करतोयस्."

"मला वाटतं माझे डोळे अजून शाबूत आहेत."

"खोटं"

"खोटं काय ?"

"की माझं जॉनवर प्रेम बसलंय".

"मी तसं केव्हा म्हटलंय ? पण तू ते नाकारूनच कबूल केलंयस् "

"म्हणजे माझं त्याच्यावर प्रम आहे असंच तुला म्हणायचंय्."

"अलबत."

"खोटं आहे हे सारं. कुभांड आहे. हे शक्य नाही." ती किंचाळली.

"जगात अशक्य काही नाही लारा. लारा—" मी शांत रहाण्याचा प्रयत्न केला पण गलबलून आल्यासारखं झालंच. थोडं सावरून म्हटलं, "लारा, तुला माझा कंटाळा आलाय. खरं ना ? येणार नाही तर काय ? मी असा व्यंग असलेला कुबडा. हे कुबडेपण आताशा तुझ्या लक्षात आलंय्. समाजात तुझी अवहेलना होतेय हे तुला जाणवू लागलंय. जेन झाल्यापासून तू माझ्या-बरोबर फिरायला येणंही टाळतेस. माझ्या लक्षात आलंय सगळं. तू मला टाळतेस लारा ! माझ्या कुबडेपणाची लाज वाटते तुला आता. लोक माझ्याकडं बघून तुझी माझ्याशी तुलना करतात. बाई किती सुंदर नि अव्यंग. पण हे कुबडं कसं पसंत केलं तिनं ? किती मूर्ख म्हणावी. लोकांच्या नजरा तुला आता बोचतात. लोक कुजबुजताना तू कॉन्शस् होतेस. मी पाह्यलंय्. तू अस्वस्थ होतेस. खरं म्हणजे तुझं जर खरोखर माझ्यावर प्रेम होतं तर लोकांकडं तू दुर्लक्ष करायला हवं होतं. पण तू पहिल्यापासून फक्त स्वतःबद्दल आणि स्वतःपुरता विचार करणारी. तुला जवळचं दिसलं. दूर पहाण्याचा तू प्रयत्नच केला नाहीस. माझा प्रश्नच नव्हता. मी मला स्वतःला केवढा-तरी भाग्यवान समजत होतो. पण जाऊ दे ते—"

"हे सारं खोटं आहे रे पीटर. जर असं असतं तर मी तुझ्याशी लग्नच केलं नसतं."

"ती धुंदी होती लारा. विशिष्ट परिस्थितीत माणूस तेवढ्यापुरताच विचार करतं. पण परि-स्थिती बदलली आणि दिवस बदलले की त्याचे विचारही दोलायमान होतात. कारण जगाची व्यावहारिक दृष्टी हळूहळू माणसाच्या लक्षात येते. आपल्या बाबतीत म्हणजे तुझ्या—काय झालं माहीत आहे ? म्हणीत थोडा बदल करून बोलतोय दिल लगा गधेसे तो गंधर्व क्या चीज है ? तू जसं तुझ्या शरीरावर प्रेम केलंस—अगदी धुंद होऊन—तसं माझ्यावर केलं नाहीस. कारण तुझ्या ठिकाणी फक्त वासना होती विचार नव्हता. तू जगाला विसरलीस कारण तू स्वतःवरच खूश होतीस. आता तुला जगाची नजर, त्याचा उपहास सहन होईना. माझा तू तिरस्कार करू लागलीस."

लारा हुमसून रडायला लागली. तिची समजूत घातली. घालणं भाग होतं. माझी नेहमीच धाकटेपणाची भूमिका. कारण माझं व्यंग मी विसरू शकत नव्हतो. व्यंग असलेल्या माणसात जन्मा-पासून न्यूनगंड निर्माण होत असावा. निदान मी तरी याला अपवाद नव्हतो. आईबापांनी कितीही मुलाला त्याची जाणीव होऊ दिली नाही तरी जग ते लक्षात आणून देतं. त्याची चेष्टा करतं. अवहेलना करतं. जगाची भाषा 'ए लंगड्या ए लंगड्या, ए कुबड्या' अशीच असते. मग भले ते व्यंग मामुली का असेना. मला जगानं लहानपणापासूनच ही जाणीव करून दिलेली. मग मीही माझा न्यूनगंड तयार केला नि जपला.

अनुक्रमणिका

मी जगापासून दूर राहू लागलो. माझाच कोष बनवला. म्हणूनच माझ्यासाठी सारसर्वस्व अर्पण करणाऱ्या माणसाविषयी मी उपकृत बुद्धीनं वागावं यात नवल ते काय! म्हणूनच मी लाराच्या भावनांना जपलं. जाणीवपूर्वक माझ्या वाट्याला जी भूमिका आली तिच्याशी मी एकरूप होऊन वागलो. पुढं असं भलतं घडेल असं मला कधी वाटलं नाही.

रोमेलनंतर सॅम्युएल घरात आला. काही काळ तरी या सगळ्याचा विसर पडला. पण सॅम्युएलचं येणं मला मानवण्यासारखं नव्हतं. त्याचा जन्मच संशयास्पद. सॅम्युएलच्या जन्माच्या कितीतरी अगोदर मी लाराला विचारलं.

"लारा, तुला पुन्हा दिवस गेलेत. तुझी जॉनशी मैत्री. मूल होईल ते कुणाचं?"

"पीटर फार झालं आता. जरा तोंड सांभाळून बोल!"

"मी असा अगतिक म्हणून तर तू माझा सूड घेत नाहीस ना?"

"पुरे रे पीटर. मीही तुझ्यासाठी फार सहन केलंय."

"लारा, लग्नापूर्वी तुला सगळ्या परिस्थितीची जाणीव होती. ते सोड. विचार भूताचा करायचा नसतो, भविष्याचा. होणाऱ्या मुलाचा बाप मीच ना?"

"पीटर!" लारा किंचाळली. तेव्हा दारात जॉन उभा होता.

"ये जॉन! अगदी वेळेवर आलास. नाही-तरी या गोष्टीचा केव्हातरी सोक्षमोक्ष लावायलाच हवा."

"कसल्या गोष्टीचा?" काही न कळून जॉन म्हणाला. मुलं 'अंकल अंकल' करत त्याला चिकटली. त्यानं पुडक्यातून चॉकलेट काढून त्यांच्या हातांवर ठेवली. मुलांना फिरायला घेऊन जायचं मी आयाला सांगितलं. ती गेली.

"बस जॉन. जॉन, हा प्रश्न मोठ्या तिढ्याचा आहे. तो सोडवायला मी असमर्थ आहे. तुझी मदत हवीय मला. उदाहरणार्थ एक संसारी स्त्री आहे. चारदोन मुलं पदरी. आणि तिचा नवरा अपंग आहे—"

"पीटर." लारा मध्येच ओरडली. पण तिच्याकडं लक्ष न देता मी म्हणालो.

"तिचं एका दुसऱ्या पुरुषावर प्रेम बसलंय."

"पीटर, तुझ्या वागण्याची मला किळस येतेय."

"आणि मला?"

"समजलं मला पीटर. पुढं सांगण्याची गरज नाही. ही गोष्ट तुझी, माझी नि लाराची आहे. यावर तुला काय म्हणायचंय?"

"म्हणजे हे सारं खरं म्हणायचं तर?"

"होय, लारावर माझं प्रेम आहे."

"जॉनऽऽऽ" लारा किंचाळली.

"खरं ते सांगितलं लारा. आडपडदा कशाला?"

"म्हणजे माझ्या असहाय्यतेचा तुम्ही असा फायदा घेतलात. मी असा अपंग म्हणून?"

"चूक आमची आहे हे मान्य. पण याला इलाज नाही. काही काही गोष्टींना इलाजच नसतो."

"परिणाम फार वाईट होईल जॉन. कदाचित तुम्हांला माझा शेवट—"

"पीटर, तुम्ही दोघं मला असे दोन्हीकडून का छळतांहात, कळत नाही."

"मी छळलं नाही कधी लारा तुला. छळणारही नाही. बरं जॉन तुला ठाऊक आहे लारा इज कॅरिंग."

"ब्रेव्हो! हिप् हिप् हुरेऽऽ. कॉन्ग्रॅच्युलेशन्स पीटर, लारा."

लारा काकुळतीला येऊन मला नको नको अशा खुणा करत होती. पण मला सोक्षमोक्ष करायचा होता.

"पण जॉन, लाराला होणारं मूल—"

"पीटर—" लारानं आपलं तोंड झाकून घेतलं. मुसमुसून रडू लागली. जॉननंच तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. तिचा हुंदका संपल्यावर तो म्हणाला, "पीटर, मी इतका निष्ठूर नाहीय. तू माझा मित्र आहेस. असा विश्वासघात माझ्या हातून होईल असं तुला वाटलं कसं? तू भयंकर बोलतोस हे.

मी थंड डोक्याचा म्हणून बरं. पण तरीही हे मला सहन होत नाही. ऐकावसं वाटलं नाही तुझं बोलणं. लाराच्या प्रत्यक्ष बायकोच्या बाबतीत तू असा आरोप करावास !"

"यालाही इलाज नाही जॉन. प्रश्न माझ्या जीवनमरणाचा आहे. लारा, काय करायचं ? यावर मार्ग काय ?"

"मला काहीही सुचत नाही रे पीटर. काहीही सुचत नाही." ती अगतिकपणं म्हणाली. "तू हे जॉनला कशाला विचारायला हवं होतंस ? मला तू इतकी निष्ठूर समजतोस ? हीच किंमत केलीस माझी ?"

"लारा चूक तुझी नि मला दोष ? समजा मीच एखाद्या बाईच्या प्रेमात पडलो असतो— ते अशक्यच म्हणा— तरीही तुला काय वाटलं असतं ? प्रश्न आहे मुलांचा."

"कसला किळसवाणा प्रकार आरंभलाय रे पीटर !"

"मी नव्हे. तुम्ही दोघांनी, खरं की नाही रे जॉन ?"

"काही म्हण. झालंय खरं थोडंफार तसंच. पण पीटर मी केसानं गळा कापणारा नाही."

"म्हणजे लारा—"

"बोलायला नको ते बोलायला लावतोस तू पीटर. होणारं मूल तुझंच पीटर. आणि जॉन इथून पुढं तू आमच्या घरी यायचं नाहीस. मला भेटायचं नाही. तुझी माझी केवळ मैत्री होती. तीही आजपासून संपली. भूतकाळ विसरू या आपण. चल नीघ या घरातून."

"पण लारा—" जॉन अडखळला.

"चल म्हणते ना ? जा !" लारा किंचाळली.

जॉन चकित झाला. शांतपणे उठून निघून गेला.

"पीटर, मी सांगते माझी चूक झाली. तुझ्याशी मी प्रतारणा केली नाही. जॉनच्या बाबतीत झाली खरी. पण मला तू गुदमरवून जगायला भाग पाडत आहेस. थोडासा मुक्तपणा, स्वातंत्र्य माणसाला हवं असतं. मला हवं होतं. मी स्वैर-पणा करत नव्हते. ते स्वातंत्र्य तू माझ्या वाट्याला येऊ दिलं नाहीस. यापुढलं आयुष्य बंद डोळ्यांनी आणि गुदमरलेल्या मनानं काढायचं". लारा पुढं बोलली नाही.

त्या क्षणापासून लारा बदलली. ती माझी राहिली नाही. कुठल्याही पुरुषाची राहिली नाही. मुलांवर तिनं आपल्या प्रेमाची पाखर घातली. संपूर्णतया मुलांची झाली. त्यांच्यात स्वतःला बुडवून टाकलं. ती पीटर नावाच्या नवऱ्याला विसरली. एकाच घरात जगणारी दोन प्रेतं या पलीकडं आम्हाला अर्थ उरलेला नाही. फक्त प्रेतं. कुणास ठाऊक पण अजूनही तिच्या मनात जॉनचे विचार येत असतीलही. असतील तर त्यावर तिचा इलाज नाही. मला ते ठाऊक नाही. कारण तिला जाणून घ्यायचे सारे मार्ग आता बंद आहेत. या कोंडमाऱ्यातून सुटण्याचा एकच मार्ग. व्हिस्कीचे पेग ! तात्पुरतं तरी सारं जग विसरता येतं. या पेगमध्ये स्वतःला बुडवता येतं. मला लाराबद्दल काहीच माहीत नाही. अजूनही वाटतं की तिचे नि जॉनचे संबंध तसेच आहेत. नशेत असलो की दोघांच्याही आकृत्या एकमेकांच्या हातात हात गुंफवून 'बॉल' करताना दिसतात. माझ्या दृष्टीनं मी संपलोय. म्हणून सारं संपलंय्. लाराला भेटलाय् बॉय फ्रेन्ड. माझ्या डोळ्यांत हिंदकळतंय सारं जग. त्यात दोन अस्पष्ट आकृत्या—स्त्री-पुरुषांच्या. जवळ येतात. हवेवर तरंगतात. हातात हात घालून फेर धरतात. ती आहे लारा. तो आहे बॉय फ्रेन्ड ! मी अनुभव-तोय् माझ्या जिवंतपणीच मरण. अगदी डोळ्यां-देखत. एकेका घोटानं मी जाळतोय माझं शरीर. सुसाईड—स्लो सुसाईड. अंऽऽऽ मी कुठं आहे ? मेलोय् की जिवंत आहे ? कुठं घेऊन चाललात मला ? सिमेंट्रीत ?

⊕ ⊕ ⊕

अुषा मा. देशमुख / **अम्लान प्रतिभेची अद्वय लेणी**

केशवसुत, बालकवी, रे. टिळक या पिढीचे कवी काव्यनिर्मिती करीत असता 'बीं'नी काव्य-लेखनाला सुरूवात केली. आणि रविकिरण-मंडळाची कविता प्रस्थापित झाली त्याकाळा-पर्यंत बीचे काव्यलेखन चालू होते. बालकवी, गोविंदाग्रज, विनायक आणि केशवसुत यांच्या काव्यनिर्मितीनंतर मराठी काव्यविश्वात जी पोकळी आणि शून्यता निर्माण झालेली होती ती डोळस-पणे कवी बी बघत होते व त्यावर आपला अभिप्राय व्यक्त करीत होते. काव्यरत्नावलीने जी गोडी रसिकांना काव्यासंबंधी लावली होती तिच्याबरोबर मासिक मनोरंजनाचाही वाटा आहे. आणि केशवसुतांपासून बीपर्यंतचे सर्व कवींच्या महत्त्वाच्या आणि गाजलेल्या कविता मासिक मनोरंजनातून प्रसिद्ध झाल्या. मासिक मनोरंज-नाचा काळ आणि बींच्या काव्यनिर्मितीचा काळ समांतर आहे. म्हणजे इ. स. १८९५ ते १९३५ पर्यंत मासिक मनोरंजन प्रसिद्ध झाले. पण त्याचे कसदार स्वरूप हे इ. स. १९२५ पर्यंत टिकून होते. बीच्या कविता प्रामुख्याने विविध ज्ञान विस्तार, महाराष्ट्र साहित्य, युगवाणी आणि मासिक मनोरंजनातून प्रसिद्ध झाल्या त्यावेळी त्यांना केवळ प्रसिद्धी आणि लौकिक मिळाला असे नाही तर तोला-मोलांच्या कवींनी त्यांच्या कवितेला प्रतिसाद दिला. रे. टिळकांनी to Bee अशी कविता लगेचच प्रसिद्ध केली तर आनंदराव टेकाडे यांनी 'नावात काय आहे ?' या बीच्या कवितेला 'नावात जादू आहे' असे काव्यातून उत्तर दिले.

केशवसुत, गोविंदाग्रज, बालकवी आणि विनायक यांचा उदयास्त बीनी अवलोकिला तर रविकिरण मंडळाच्या उदयापासून विस्तारापर्यंतचा प्रवास न्याहाळला होता. रविकिरण मंडळाच्या कवितेने काव्यविश्वात नवे परिवर्तन घडवून आणण्याचा केलेला अट्टाहास आणि त्यांच्या विचारांना व भावनांना आलेली स्थिरता, निर्माण झालेल्या मर्यादा आणि कमालीचा स्वयंकेन्द्रितपणा बीनी सूक्ष्मपणे अवलोकिला होता. अशा एका विशिष्ट काळात काव्यनिर्मिती करीत असताही बीनी आपल्या इ. स. १८९१ ते १९३४ या काळात उण्यापुऱ्या अडतीस कविता निर्मिल्या तर १९४७ म्हणजे त्यांच्या मृत्यूपर्यंत केवळ अकरा कविता तेरा वर्षात लिहिल्या यावरून बी कवींची प्रतिभा बहुप्रसू नसून मुग्धा होती ही गोष्ट स्पष्ट होते. त्यांचा प्रतिभासंभव अतिशय संथ आणि आत्मरत पद्धतीने झाला आहे. वऱ्हाडी शैथिल्य आणि प्रसिद्धी-पराङमुखता यामुळे रविकिरण मंडळाच्या कवितेच्या झगमगाटात बीची कविता निरांजनासारखी तेवत राहिली. काव्यमुसाफिरांना ती आकृष्ट करू शकली नसली तरी रसिकांना तिने भुरळ घातली. आपलेसे केले. विलक्षण समीक्षकांना तिने आपल्याशी गुंतवून ठेवले आणि पुनः पुनः विचार करण्यास भाग पाडले.

संस्कृत वाङमयाचा अभ्यास, समकालीन मराठी काव्यविश्वातील उंच महामेरूंचा आदर्श आणि सामाजिक परिस्थितीचा निसटता स्पर्श आणि ज्ञानेश्वर तुकारामासारखे संतसांगाती यांवर बीचे कविमन पोसले गेले होते. केशवसुत आणि गोविंदाग्रज यांच्या व्यक्तिमत्त्वावर इंग्रजी भाषा, वाङमय आणि शिक्षणाचा जो मूलधर्मी संस्कार घडलेला होता तसा त्यांच्याच काळाशी संलग्न असूनही बीनी फारसा स्वीकारलेला दिसत नाही. या अर्थाने बीची कविता ही अभिजात कविता ठरली. केशवसुत आणि बालकवी यांच्या कवितेत जसा भरतीओहोटीचा खेळ जाणवतो तसे बीच्या कवितेत घडलेच नाही आणि भरतीची शक्यताच नव्हती कारण एखाद्या स्थितप्रज्ञा-सारखी, व्रतस्थासारखी बीची काव्यनिर्मिती होत गेली. केशवसुत, बालकवी आणि गोविंदाग्रज यांच्या कवितेवर बीनी मनःपूत पराकोटीचे प्रेम केले.

त्यांच्या कवितेचे वैशिष्ट्य, अनोखेपण आणि अनन्यसाधारण स्वरूप बीना मनोमन पटलेले होते. त्यामुळे त्यांचे संवेदनाक्षम कविमन हरवून गेले असल्यास नवल नाही. परंतु केशवसुत, बालकवी आणि गोविंदाग्रज या कवींच्या कवितेमुळे मराठी कविता पृथगात्म झाली आणि तिने आपले पदन्यास ठामपणे टाकण्यास सुरुवात केली. असे बीना फार लौकर जाणवले आणि ही समकालीन कवितेची समीक्षा बींनी कवितेच्या निर्मितीतून साधली. काव्य म्हणजे काय? काव्य कसे असावे व काव्याच्या ठिकाणचा सौंदर्यधर्म कोणता? या विविध काव्यविषयक प्रश्नांची उत्तरे बीना बालकवी, गोविंदाग्रज आणि केशवसुत यांच्या कवितेत सापडली. मराठी काव्यपरंपरेविषयी बीना अतिशयच आदर होता.

या वडचा बंडवाल्यात ज्ञानेश्वर माने पहिला
मोठचांच्या सिद्धांताचा घेतला पुरा पडताळा
डांगोरा फोलकटाचा पिटविला अलम् दुनियेला
झुंजोनि देवा दैत्या, 'अमृता' मधि न्हाणी जनता
उजळिला मराठी माथा सत्तेचे प्रत्यय आले!
तेजाचे तारे तुटले. (डंका)

असे मराठी कवितेच्या पृथगात्म परंपरेविषयी बी स्वाभिमानपूर्वक उद्‌गार काढतात. तर 'कविवंदन' या कवितेत बींनी बालकवी आणि गोविंदाग्रज यांच्या मृत्यूमुळे मराठी काव्यदरबारातील दोन तख्ते रिक्त झाली याविषयी हळहळ व्यक्त केली आहे. समकालीन कवी आणि कविता या संदर्भात बीं नी जी जाणीवपूर्वक समीक्षा केली ती मराठी कवितेच्या संदर्भात अनन्य ठरली. कवी, कविता आणि काव्यरीती यांविषयी इतक्या सुजाणपणे अवलोकन आणि आकलन समकालीन कवींत बीशिवाय कुणालाही शक्य नव्हते. कारण बींचा चिंतनशील, संयत, शांत, गंभीर आणि स्थिरपद असा कविपिंड असल्यामुळे त्यांनी रसिकतेने भोवतालचा काव्य परिसर न्याहाळला व त्यातील त्रुटी आणि बलस्थाने या दोहोंचाही परामर्श आपल्या कवितेतून घेतला. बींची प्रतिभा ही धीरगंभीर आणि विचारशील चिंतनप्रधान असल्यामुळे तिचा एक खास डौल एक स्वतंत्र चाल आणि गंभीर पदन्यास वडिलधारेपणाने साक्षात झाला आहे. बालकवींच्या कवितेचा पदन्यास अवखळ निर्झरासारखा गतिमान आणि निर्व्याज आहे तर गोविंदाग्रजांच्या कवितेचा पदन्यास हा तारुण्यसुलभ प्रणयचेष्टितांनी चंचल झालेला आहे. केशवसुतांच्या कवितेने ओजपूर्ण धीरगंभीर आणि वक्तृत्वपूर्ण पुरोगामी पद्धतीची प्रेरणा आपल्या कवितेच्या पदन्यासातून उमटविली. ती काळाक्षरी दृढही झाली. परंतु या सर्वांपेक्षा बीं ची कविता ही एका वेगळ्या अर्थाने अनुभूतीत परिपक्व व प्रौढ असल्यामुळे ते पारंपारिक संस्कृत प्रतिमासृष्टी टाळू शकलेले नाहीत. परिस्थितीने वडिलधारेपण स्वीकारणाऱ्या तरुणाप्रमाणे बींच्या कवितेची अवस्था झाली. वस्तुतः प्रणयानुभव व्यक्त करताना किंवा समकालीन वास्तवाचे चटके आणि लौकिक तपशील व्यक्त करताना ही कविता संस्कृत प्रतीकांनी जडशीळ झाल्यासारखी वरवर बघितले असता वाटते. परंतु तिचे सूक्ष्म अवलोकन केले असता लक्षात येते की बींची अनुभव घेण्याची आणि अभिव्यक्त करण्याची पद्धतीच मुळी संस्कृतनिष्ठ आहे. जितक्या सहजतेने निखळ मराठीमध्ये आपण बोलावे तितक्या सहजतेने बींची कविता संस्कृत प्रतीक आणि प्रतिमांमधून अविर्भूत होते. मोरोपंतांच्या कवितेतून व्यक्त होणारी संस्कृतनिष्ठा आणि बींच्या कवितेतून व्यक्त होणारी संस्कृतनिष्ठा यात मूलतः फरक आहे, महदंतर आहे. मोरोपंती संस्कृतनिष्ठेचे स्वरूप ग्रांथिक आहे तर आधुनिक मराठी कवींच्या संस्कृतनिष्ठेचे स्वरूप काव्यात्म बोलीभाषेचे आहे.

'नावात काय आहे?' ते 'प्रतिभाभंग' इतक्या उण्यापुऱ्या एकोणपन्नास कविता बींनी लिहिल्या व त्या संगृहित झाल्या त्या. इ. स. १९३४ साली 'फुलांची ओंजळ' या संग्रहात. पन्नास कवितांच्या आतबाहेर काव्यनिर्मिती आणि एकमेव काव्यसंग्रह असूनही आज मराठी वाङ्मयाच्या काव्याव लोकनात बींच्या कवितेला डावलता येत नाही. मोजक्याच परंतु अनोख्या, अनन्य अशा या साऱ्या

कविता ! प्रत्येक कविता स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व टिकविणारी आणि अनेक प्रश्न निर्माण करणारी ! प्राचीन मराठी कवितेत जशी मुक्ताईची कविता, निवृत्ती नाथांची कविता, सोपानदेवाची कविता, संख्येने अल्प असूनही महत्त्वपूर्ण ठरत जाते. संख्येने अल्प असूनही त्यांच्या कवितेची बीजे मराठी मातीशी एकजीव झालेली आहेत. अनेक झंझावाती सांप्रदायिक निर्मितीतही आपापले वैशिष्ट्य आणि अस्तित्व घेऊन ती कविता उभी राहते. तसेच काहीसे बीं च्या कवितेचे झालेले आहे. किंवहुना केशवसुत, बालकवी, गोविंदाग्रज, रहाळकर, विनायक या पिढींची कविता एकाएका संग्रहापुरतीच मर्यादित राहिली. त्याच परंपरेत बीं ची कविता आहे. रविकिरण मंडळाच्या धामधुमीच्या काळात आणि नंतर आजपर्यंत एकाएकी कवीच्या नावावर अनेक काव्यसंग्रह व त्यातून झालेला त्यांचा काव्यप्रवाहाचा विस्तार किंवा विकास किंवा पसारा दृक्‌गोचर झालेला आहे.

आजची कविता ही बहुविध आणि बहुमुखी असूनही कवितेची उत्तुंग झेप आणि भरारी यांमधील सातत्य प्रत्येक संग्रहात टिकविलेले नसते. एकामागून एक संग्रह प्रसिद्ध होत राहातात परंतु त्यातून कल्पनांची, भावनांची तीच ती उतरंड यांना त्या पद्धतीने मर्यादित होत अभिव्यक्त होत राहाते. त्याच्या पलिकडे पोहोचण्याचा तो प्रयत्न नसतो तर तीच एक जीवकक्षा त्या कवितेने सांभाळलेली असते. कारण सृजनाचे बीजघटकच (क्रिएटिव्ह फॅक्टर्स) मुळी एका विशिष्ट परिघापलिकडे पोहचू शकत नसतात व नवी काव्यसृष्टी जन्माला आलेली नसते. असे दोन पद्धतींनी घडते. एकतर ग्रामोफोनवर पीन घासत राहून ती पुढे न सरकल्यामुळे जशा त्याच त्या ओळी तीतून ऐकू येतात त्याचप्रमाणे काही आधुनिक कवींच्या काव्याची गत झाली आहे तर काही कवींच्या कवितेत आपल्याच पूर्वसंचिताला टाळून पुढे जाण्याचा प्रयत्न आहे. परंतु तो प्रयत्न म्हणजे स्वतःचीच एका अर्थाने केलेली फसवणूक ठरते ! उदा. कुसुमाग्रजांनी 'विशाखा'मध्ये सुरू केलेला काव्यप्रवास 'स्वगत' मध्ये हेतुपूर्वक बदलविण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यातून त्यांच्या प्रतिभेचे सोने जपले गेले नाही. उलटपक्षी ती कृतक 'आत्मनिष्ठ' होऊन पाहण्याचा प्रयत्नच करू लागली. 'गर्जा जयजयकार' यामधून स्पंदनशील असलेली कवीच्या व्यक्तिमत्त्वातील वाङ्मयीन महत्ता मात्र पुढील काळात त्यामुळेच उणी ठरली. आधुनिक कवींच्या अनेकसंग्रही कवितेत त्यांना एक विशिष्ट लेबलही चिकटविले गेले. उदा. पु. शि. रेगे म्हणजे शृंगारानुरक्त लघुप्रेमचित्रे, कुसुमाग्रज म्हटले की सामाजिक आणि राजकीय वास्तवाचे निर्भीड चित्रण, कांतांची कविता म्हणजे दाहक आणि प्रखर काव्यस्थंडिल, बोरकरांची कविता म्हणजे 'फुलल्या लाखकळ्या,' दया पवारांची कविता म्हणजे कोंडवाड्यातून दिसणारा भाकरीच्या आकाराचा पांढुरका म्लान चंद्रोदय किंवा चंद्रास्त, अनिलांची कविता म्हणजे फुलवातीच्या स्निग्ध शांत प्रकाशात सांगातीसह केलेला प्रणयप्रवास. कवितेची संख्यात्मक वाढ जशी झाली तशी गुणात्मक वाढ झाली का ? तिचे बलस्थान एकदा निश्चित झाले की त्या पलिकडे झेप घेण्याचा उड्डाण करण्याचा प्रयत्न ती कविता करते का ? म्हणजे एक किंवा दोन संग्रहांपलिकडे वैशिष्ट्यपूर्ण असे स्वतःचे व्यक्तित्व जोपासणारी काव्यनिर्मिती झालेली असते का ? हा खरा प्रश्न आहे ? अनुभवाची प्रेरणा अभिव्यक्तीच्या सरळ आविष्कारापेक्षा स्वतःच्या अनुबंधाशी प्रामाणिक राहिली आहे का ? गूढ प्रेरणेतून अभिव्यक्त झालेली अनुभवाची मूलाकृती तितक्याच प्रामाणिकपणे गोचर होते की लोहचुंबकाला जसा लोखंडाचा कीस चिकटला जावा व त्याच्या परीघात जी जी लोहवस्तू येईल ती त्या चुंबकाला चिकटत राहावी तसे आजच्या कवितेला अनेकदा संस्कृतीटीकेचे ओझे वहावे लागते आहे ? एका विशिष्ट पद्धतीने घेतलेला अनुभव जशाचा तसा सोलीव रूपात का अभिव्यक्त होत नाही ? भाषेचे लडिवाळ छंद का पुरविले जातात ? हे खरे आजच्या कवितेच्या संदर्भातील

अनुक्रमणिका

प्रमुख प्रश्न आहेत. आणि या पार्श्वभूमीवर ज्यावेळी केशवसुत, गोविंदाग्रज, बालकवी, बी, विनायक यांच्या कवितेचा आस्वाद घ्यावा त्यावेळी त्यांची एकएक कविता म्हणजेच एका अर्थाने एकएक काव्यसंग्रह असतो. प्राचीन कवितेची साक्ष घेतली तरी हेच दिसेल. व्यापक आशय आणि काव्यनिर्मितीतील चिरंतन भक्तितृष्णा जीवनसंस्कारातून अभिव्यक्त होत राहते ती एका प्रचंड उत्कटतेने माखून काव्य-निर्मितीच्या जाणीवेपलिकडे असलेली नामदेवाची उत्कट भावावस्था मराठी भाषेतील उत्कट आणि उत्कृष्ट भावकाव्य जन्माला घालते. तुकारामाच्या कवितेत एक नैसर्गिक आणि स्वाभाविक संसृतिटीका उत्कटतेने गोचर होत असते. त्यासाठी भाषेशी लडिवाळ लगट त्यांना करावी लागलेली नाही. यमकांची, रूपकांची उतरंड रचावी लागली नाही तर जितक्या नैसर्गिक पद्धतीने झरा वाहात असावा तितक्याच नैसर्गिक पद्धतीने कविता अभिव्यक्त झाली. आणि ती स्वतःच्या लयींचे सौभाग्यलेणे घेऊनच आली. वास्तवाचे चटके आणि कवीचे अर्न्तविश्व यात संघर्षाची ठिणगी पडली आणि चोखामेळा पेटून उठला. कवीची तीव्र अनुभूती आणि तिचा तितकाच नैसर्गिक आविष्कार त्याच्या कवितेतून आंदोलित झाला. केशवसुत आणि मर्ढेकर यांनी शब्दसाधनाची जी खंत व्यक्त केली त्यामागे भाषेतील अपुरेपणच गोचर होते. 'शब्दांनो मागुते या !' हा केशवसुतांचा अनुभव आहे. तर 'अर्थु बोलाची वाट न पाहे ! अभिप्रायोचि अभिप्राय विये' हा ज्ञानेश्वरांचा काव्य-निर्मितीचा अनुभव आहे.. ज्ञानेश्वरांनी 'अभिप्राय' हा मोठा मार्मिक शब्द उपयोजिला आहे तर मर्ढेकरांनी 'द्रौपदीचे सत्त्व माझ्या लाभु दे भाषाशरीरा' ! असे आपल्या अनुभवाला व्यक्त केले आहे. संस्कृत कवींनीही 'वाचो अर्थानुधावति' असाच आपला अनुभव सांगून ठेवला आहे. अनुभूतीला अभिव्यक्त करताना भाषेचा जाणवणारा अपुरेपणा सर्वश्रेष्ठ कवींनी व्यक्त केला. शब्दांत पकडता येऊ नये असा तो आरस्पानी भावानुभव शब्दांच्याच साह्याने गोचर होत असता नव्या प्रतिमा, नवी प्रतीके श्रेष्ठ कवी निर्माण करतो व त्यातून त्याचे निराळेपण आणि अनुभव घेण्याची आणि अभिव्यक्त करण्याची पद्धती वाचकाला जाणवते.

अशा वेळी कवीच्या मनावरील संस्कार आणि अनुभवाच्या अभिव्यक्तीची दिशा निश्चित होऊन काव्य गोचर होत जाते. केशवसुत, गोविंदाग्रज, विनायक, रे. टिळक यांनी काव्यनिर्मितीला सुरुवात केली त्याकाळात अव्वल इंग्रजी काळातील कविताही संस्कृत भाषांतराच्या अंगाने वाढीला लागली होती तर वामनपंडित, मोरोपंत यांचे आदर्श आणि वैशिष्ट्ये जोपासली जात होती. संस्कृत वाङमयाचे अध्ययन हेही एक संपन्न अभिरुचीचे लक्षण मान्य झालेले होते अशाच काळात बींनी काव्य-लेखनाला सुरुवात केली. बींच्या समोर वामन पंडित, मोरोपंत वळणाचे जसे काव्य होते तसेच ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा हीही त्यांना आकृष्ट करून घेण्यास समर्थ ठरली. केशवसुत, गोविंदाग्रज, बालकवी या समकालीन कवींची कविताही बींच्या समोर होती त्यामुळे ते प्रभावितही झालेले होते. वाङमयव्यवहार आणि वाङमयनिर्मितीची परंपरा यांचा डोळस असा पाठपुरावा आणि काव्याचा संदर्भशोध एका चिंतनशील वृत्तीने घेण्याचा प्रयत्न बींचे कविमन करीत होते. म्हणून त्यांची कविता समकालीन कवितेपेक्षा अतिशयच वेगळी ठरली.

केशवसुतांनीही आपल्या काव्यनिर्मितीत काव्यविषयक विचार व्यक्त केलेले होतेच किंबहुना कवी आपल्या काव्यनिर्मितीबरोबरच काव्यचिकित्सा आणि काव्यमूल्यसमीक्षा करीतच असतो. ती हेतुपूर्वक होत असते असे नाही तर कळीचे फूल व्हावे इतक्या स्वाभाविकपणे ही प्रक्रिया घडत असते. ज्ञानेश्वर, तुकाराम, मर्ढेकर यांनी असा काव्यविषयक विचार आपल्याला दिला तर रामदासांनी आपल्या पूर्व कवीचे समग्र साहित्यशास्त्रीयपर विचार संगृहित केले. बींचे वेगळेपण म्हणजे त्यांनी केवळ काव्य विषयक विचारच आपल्या कवितेतून व्यक्त केला असे नाही तर समकालीन काव्यप्रवाहाची समीक्षा केली आणि आदर्श काव्य कसे असावे याचेही संसूचन

केले. आणि केशवसुत, बालकवी, विनायक यांची कवी म्हणून असलेली पृथगात्मता अचूक ओळखून त्यांच्या चिरविरहाने व्यथित झालेली कविता बींनी लिहिली. केशवसुत आणि बालकवी यांच्याविषयी बींच्या मनात नितांत आदर होता यात काही शंका नाही परंतु व्यक्ती म्हणून आदरभावनेपेक्षाही मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रातील त्यांचे काव्यकार्य किती अलौकिक आहे याची स्पष्ट जाणीव आपल्या कवितेतून बींनी जोपासली. काव्यसमीक्षा आणि काव्याचे आदर्श असे दुहेरी स्वरूप बींच्या कवितेला आले आहे. काव्यसौंदर्य विचार, काव्येतिहास विचार आणि आदर्श काव्यनिर्मितीविचार बींनी प्रामुख्याने आपल्या कवितेतून केला व कमळा आणि माझी कन्या अशासारख्या कवितेतून स्वतंत्र निर्मितीही साधली.

तेराव्या शतकात संस्कृत भाषेचा प्रभाव असूनही सारी संतकविता ही निखळ मराठी बोली भाषेतून निर्माण झाली. संस्कृत भाषा वळणापासून ती फुटून निघाली आणि स्वतंत्र झाली. परंतु हेच वळण पुन: पुढे वामन पंडित आणि मोरोपंत यांनी बदलविले आणि संस्कृत भाषेच्या आधाराने व पद्धतीने काव्यनिर्मिती केली. तिथे रेंगाळणारे संस्कार अव्वल इंग्रजी काळातील कवींना जसे पुसता आले नाहीत तसेच केशवसुतादी कवींच्या कवितेलाही दूर लोटता आलेले नाहीत म्हणून आधुनिक कवितेचा पूर्वार्ध संस्कृतबहुळ आणि चमत्कृतिपूर्ण अशा प्रतिकांनी गजबजलेला झाला. विशिष्ट कविसंकेत स्वीकरले गेले. विशिष्ट दृष्टांत रूपके सर्वच कवींच्या कवितेतून गोचर होऊ लागली व संस्कृत साहित्य आणि भाषा यांचा संस्कार मराठी कवितेतून आविष्कृत होत राहिला तो जवळजवळ रविकिरण मंडळाच्या काव्यनिर्मितीपर्यंत! केशवसुतांनंतर मराठी काव्यविश्वात झालेली पडझड बी अवलोकित होते आणि रविकिरण मंडळाने स्थिरपद केलेल्या काव्यसंकेतांनी अस्वस्थही होत होते हे सारे बींच्या कवितेतून जाणवते. केशवसुतांनी केलेला काव्यविचार हा प्रामुख्याने काव्यविषयक सार्वत्रिक व सार्वकालिक मूल्ये स्थिरपद करणारा असा होता. त्यांच्या काव्यविचारात आदर्शवाला आणि सौंदर्यघन अशा आशयाच्या शिवात्मक सत्याला प्राधान्य दिले गेले होते. बींच्या कवितेतील काव्यसमीक्षा केशवसुतांच्या काव्याचिकित्सेइतकी मूलगामी नसली तरी काव्यव्यवहारातील वास्तवघटितांचा परामर्श बींनी आपल्या कवितेतून घेतला. प्राचीन कवितेत ज्ञानेश्वर आणि रामदास यांच्या काव्यविषयक विचारांचे जे स्वरूप आहे तसेच आधुनिक कवितेत केशवसुत आणि बी यांच्या काव्यविषयक विचारांचे स्वरूप आहे.

बींच्या कविता काळाशी संलग्न आहेत. त्यांचे चिंतनशील मन काळाबरोबर आपण आपल्या जाणिवांसह बदलले पाहिजे असे मानणारे आहे. काळाला वाकविण्याचे मानवी सामर्थ्य आणि चिरंतन मूल्यांतून डोळे दिपविणारे सत्चित् आनंदमय सृष्टिरूप या दोन घटितांना सामोरे जाण्याचा प्रयत्न बी करतात. आध्यात्मिक गूढवादाच्या साह्याने जीवनाची उकल करू बघतात तर विज्ञाननिष्ठित अशा जाणिवेने बी झपाटून जातात. अध्यात्म, विज्ञानवाद आणि आशेचे अंकुर जोपासणारे वास्तव या तीन प्रेरणांतून बींची कविता व्यक्त झाली; आणि मराठी कवितेत असे पूर्वी कधी घडले नव्हते. बींच्या समकाळी असे घडले नव्हते आणि नंतरच्या कवितेतूनही बींप्रमाणे प्रेरणाबळ घेऊन काव्यनिर्मिती झालेली नाही म्हणून बींची कविता वेगळी ठरली. बींच्या कवितेची अभिव्यक्ती आणि आकृतिबंध पारंपारिक आणि केशवसुत कवितेच्या वळणाचा आहे. परंतु त्यांच्या कवितेचा आशय मात्र सर्वस्वी वेगळा ठरला. घाटात्मक परिवर्तन बींच्या कवितेत घडलेले नाही किंबहुना त्यांच्या समकालीन कवितेने घाटात्मक वळण केशवसुतांना आदर्श मानूनच केलेले होते तसे बींनी केले.

बींनी 'नावात काय आहे?' अशी प्रश्नात्मक कविता निर्माण करून एका अर्थाने त्यांच्या समकालीन कवींनी जी काव्यनामे स्वीकारली होती त्याचीच तरफदारी केली आहे. केशवसुतांनी तर 'एक मित्र', कुणीतरी' अशी टोपण नावे घेतली

होती तर गोविंदाग्रज, बालकवी यांनीही काव्य-नामे घेऊन कविता निर्मित केली होती. समकालीन विद्वान वर्गात या काव्यनामांमुळे कुतूहल निर्माण झाले असावे व त्यासाठी बींनी 'नावात काय आहे?' ही कविता लिहिली. कविनामापेक्षा काव्याशय आणि अनुभूतीची अस्सलता महत्त्वाची हेच बींना सुचवावयाचे आहे.

> कां आग्रह ? रसिका ! नाव सांग मज म्हणसी
> नावात मोहिनी भासो सामान्यासी !

असे बी म्हणतात. वसुधेला मुग्ध करणारे असंख्य सुंदर तारे, प्रसुनान्विता तरुलतांनी गंधमत्त झालेल्या प्रमदवनात शिरणारे लोक मंत्रमुग्ध होतात ते त्यांच्या ठिकाणच्या सौंदर्याने होय. नाममहात्म्यामुळे नव्हे ! असे विविध प्रतीकांन्वये बींनी स्पष्ट केले आहे. निसर्गातील सौंदर्याच्या साक्षात्काराने संवेदनशील कविमनाच्या उचंबळून आलेल्या भाववृत्ती त्याला आपल्या नावाचा विसर पाडावयास लावतात. इतके ते वातावरण प्रमत्त, संगूढ आणि अलौकिक आहे. कारण कल्पकतेच्या साम्राज्यात 'आकाशाची घरे त्याला प्रकाशाची दारे' इतक्या भव्यतेत बींनी अनुभव घेतला आहे. शब्द, स्पर्श, रूपरसगंधात्मक संवेद-नांनी संपृक्त झालेल्या भावकुसुमांची लूट रसिका तू करावी. नावासाठी हट्ट धरून बसू नये ! कारण काव्यनिर्मितीच्या अलौकिक अनन्य साधारण अशा अनुभवात कवीदेखील 'निज नामरूपही गेले--विसरुन' इतके काव्यनिर्मितीशी ते तादात्म्य पावतात. निसर्गसृजन आणि काव्य-सृजनप्रक्रियेत तात्कालिक तादात्म्यापेक्षा चिरंतन आशयाची अभिव्यक्ती श्रेष्ठतम होय असेच येथे बी सुचवितात. आचार्य अत्रे यांनी 'नावात काय आहे ?' या कवितेच्या साह्याने बींच्या स्वभावावर जो प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे तो सर्व-थैव विपरीतच म्हणावा लागतो. कारण बींच्या समग्र कवितेवरून बींची मन:प्रकृती सौम्य आणि संयमशील असून सौंदर्याकडे आणि उदात्ततेकडे त्यांचा कल आहे. एका भावात्मक पण वैचारिक पातळीवरून ते अनुभव स्वीकारतात. त्यांची वृत्ती गंभीर आणि प्रवृत्ती तात्त्विक स्वरूपाचे चिंतन असणारी आहे. बींचा जीवनविषयक आणि काव्यविषयक दृष्टिकोण स्वतंत्र असल्यामुळे त्यांच्यावर कुणाकुणाचे संस्कार झाले आणि त्यांचा संप्रदाय निर्माण झाला का ? हे दोन्ही प्रश्न व्यर्थ ठरतात. वास्तविक तत्कालीन प्रत्येक कवीचा मनोधर्म हा स्वनिष्ठ होता. आपापल्या व्यक्तित्वाचे रंग त्यांच्या काव्यनिर्मितीतून व्यक्त झाले. बींची कविताही अशीच स्वत:चा खास रंग घेऊन साक्षात झाली.

काव्यनिर्मिती विषयी बींचा स्वतंत्र दृष्टिकोण आहे. क्षराक्षरांची आणि प्रणवाची जननी म्हणजे काव्यदेवता, होय, असे ते म्हणतात. काव्यानुकुल प्रतिभाधर्माला आणि निर्मितीला देवतारूपात बी बघत असल्यामुळे पावित्र्य आणि मांगल्याचा ठसा आपोआपच स्पष्ट होतो. काव्यदेवता म्हणजे चिरंतनाची आणि शाश्वताची निर्झरणी असून ती जर कवीला मिळू शकली नाही तर 'उघडा कविजन परदेशी' अशी त्याची अवस्था होते. काव्यदेवता जेथे विहार करते तो एक 'सौंदर्याचा कुंज' आहे. मुग्धमधुरा वसुंधरा असून कविजनांनी जिची स्तुती केली आहे अशी काव्य-देवता वसुंधरेवर वास्तव्य करून असते. अशा वसुधातलावरच रक्ताचा थेंब आणि देहाचा कण उमलून सौंदर्याला सामोरा जात असतो. कारण सौंदर्याचा विकास सतत निरंतर चालू असतो.

> अथांग अव्यक्तातुनि होशी निजलीला व्यक्त
> तुझे तूच निर्मिशी प्रसाधनशासन अभियुक्त
>
> (कविवंदन)

अथांग अव्यक्तातुन उस्फूर्तपणे निर्माण होणाऱ्या एका अलौकिक सृष्टीचा आणि लौकिक सृष्टीचा देहबंध बी प्रस्तुत कवितेत व्यक्त करतात. ईश्वरी सामर्थ्य जसे लौकिक सृष्टी निर्माण करण्यात दिसते त्याचप्रमाणे कवी आपल्या ऐश्वर्यात्मक सामर्थ्याने ओसंडून वाहणाऱ्या ओथंबून येणाऱ्या संवेदनासंपृक्त भावोमींनी एक अपूर्व सृष्टी निर्माण करतो. अपूर्ववस्तूनिर्माणक्षम प्रतिभा म्हणजे उत्स्फूर्त आणि सोलीव सुंदरता होय. तेच स्वानंदाचे जिव्हार असून हे सौंदर्यानुभवाचे व्यक्ति-करण म्हणजे 'काव्य' होय. या सौंदर्यस्फुरणालाच

'चैतन्य', 'स्फूर्ती', 'प्रसाद', 'भगवंताचे देणे' आणि 'नैसर्गिक शक्ती' असे म्हणतात.

देवी शारदा हीच न हे स्थल अभ्यासा साध्य
लोकोत्तर काव्याचे हेचि प्रसवस्थल आद्य.

प्रतिभेचे स्वरूप आणि तिची लोकोत्तर शक्ती यांविषयी बी स्वतंत्रपणे विचार करतात. प्रतिभा ही दैवी शक्ती असून तीच शारदा होय. ती अभ्याससाध्य किंवा कष्टसाध्य नसून नैर्सागिक अशी शक्ती आहे. अशा शक्तीच्या अभिव्यक्तीतून काव्य उत्स्फूर्तपणे गोचर झाले की कल्पनेचे उत्तुंग आणि भव्य कल्पनाविश्व जिवंत होऊन आकारू लागले. या विश्वात आकाशाची घरे असून त्यांना प्रकाशाची दारे आणि ग्रहमालिकांच्या अडसरी असतात. विश्वराणी रत्नांच्या विमानी बसून अनंताची प्रदक्षिणा घालते त्यावेळी चंद्र हसतो वारा त्याला साथ देतो आणि सृष्टीच्या स्वरालापात काव्यसूर मिसळून जातो. (वेडगाणे) येथे लौकिक विश्वाच्या घडामोडीत कविकृत अलौकिक विश्वाची एकरूपता आणि अनन्यता बी स्पष्ट करतात. सृष्टीचा रसरसलेला आणि चैतन्य-पूर्ण जिवंत पंचमहाभूतांतील स्वर आणि कवीने स्वसामर्थ्याने प्रतिभावळाच्या साहाय्याने निर्माण केलेली अलौकिक सृष्टी आणि तिचा रसरशीत जिवंत चैतन्यमयी स्वर एकमेकीत मिसळून जातात आणि त्यातून शब्दब्रह्म गोचर होते. त्यात जीवनच गात्रागात्रात मुसमुसून ओथंबून येते. विविध भाववृत्तींच्या साह्याने संपूर्ण बाह्यविश्वच प्रतिभाबलाने ती गिळंकृत करून घेऊ शकते इतकी प्रतिभेची किमया आहे. ब्रह्माण्डाच्या घडामोडी करणारी आणि विश्वाला गिळून टाकणारी ही तीच अलौकिक शक्ती म्हणजे प्रतिभा होय. स्वर्गाला भूलोकी आणण्याची तिची ताकद आहे. तिच्या-शिवाय सारे विश्व नि:सार आहे. कारण तिच्या कृपाकटाक्षामुळेच उदयोन्मुख जगाची निर्मिती होते. (पिंगा) बींचा हा प्रतिभाविचार संस्कृत परंपरेपेक्षा निश्चित मन:पूत आणि स्वतंत्र आहे. सृष्टिचक्र, विश्वचक्र आणि काव्यनिर्मिती यांची सायुज्यता शोधण्याचा प्रयत्न प्रतिभा व्यापाराच्या माध्यमातून बी लक्षात घेतात.

हे लोकोत्तर रूप तेज तुजला आहे निसर्गे दिले
की तू अन्य तसेच निर्मुनि जगा द्यावीस काही फले
दाने दे न कुणा निसर्ग ! धन तो व्याजे तुम्हां देतसे
ते त्याचे ऋण टाक फेडुनि गडे ! राजीग्वुपीने कसे
(दीपज्योतीस)

ज्या ज्या ठिकाणी सौंदर्य आहे तेथे तेथे काव्य आहे, सृष्टीने अपूर्व तेजोबल आणि रूपाविष्कार यांची तुझ्यावर उधळण केली असता तू तिचे ऋण सव्याज फेडले पाहिजे म्हणजे काव्यनिर्मिती करून तू ते ऋण फेडले पाहिजेस. कारण निसर्गाने दिलेले दान स्वीकारले तर 'होता वेल रसप्रसन्न फुटुनी येतो फुलोरा तिला'.

प्रतिभावंत कवी हा एका अर्थाने सृष्टी-देवतेचा बाळच आहे. तिचे मातृत्व आणि बालकाची निर्व्याजता यांच्या मनोहारी संगमाने हे विश्व भरलेले आहे. बींनी निसर्ग आणि सृष्टी या दोन स्वतंत्र संकल्पना मानलेल्या आहेत.

रूप पाहुनि हे सृष्टिसुंदरीचे
स्तव्ध झाले चांचल्य निसर्गाचे (निवेदन)

सृष्टी म्हणजे पंचमहाभूतात्मक अणुरेणु पूर्ण आणि दिक्कालात्मक अवकाश आणि निसर्ग म्हणजे इंद्रिय-गोचर संवेदनांचे ज्ञानात्मक रूप असेच बींनी कल्पिले आहे. (फुलाची ओंजळ) सृष्टिमाता आणि कविबाळ यांचे परस्पर वात्सल्य प्रेम इतके पराकोटीचे होते की सृष्टीचा आतला प्राणच कवी होऊन जातो.

सांत अनंताची मिळणी ती अगम्य अद्भुत खरी
मायलेकरे अभिन्न झाली निजानंदसागरी ।।
सृष्टीशी कवी समरस झाला, प्राण तिचा आतला
हृत्कमळाची तिच्या कळाली फुलती मिटती कळा
कवीच झाला सृष्टी सारी सृष्टी झाली कवी
हा हासता हसते ती, अथवा हा रडता ती रडे
पहाट फुटते हा उठता हा निजता झापड पडे
काव्यरसामृत यास्तव कारुण्याने निर्मुनी कवि
मृदुमधुरोज्ज्वल गीते गाउनि ते तेजोबल वाढवी
काव्य अगोदर झाले नंतर झाले जग सुंदर
रामायण आधी, मग झाला राम जानकीवर
(फुलांची ओंजळ)

सान्तानंताची मिळणी निगूढ अद्भुतपणे कवी आणि सृष्टी यात झाल्यामुळे सुवर्ण आणि

अलंकार किंवा पाणी आणि त्याचे तरंग किंवा चंद्र आणि त्याचे किरण यांमध्ये ज्ञानेश्वरांनी जी निर्द्वंदता कल्पिली तीच अद्वैताची निर्विकल्पाची भूमिका बीनी स्वीकारली आहे. सृष्टी आणि कवी मुळातच दोन नाहीत. तर ती एकरूप, एकात्म असून कवीचा आकार हा स्फुट अर्धस्फुट शब्दोच्चार हाच प्रणवाचा आदिस्वर होय. म्हणूनच बी म्हणतात, काव्यनिर्मिती आधी झाली व त्यामुळे सत्यशिवात्मक जग हे सौंदर्यपूर्ण झाले.

मज कसले जाणे येणे! भाव अभावाविण असणे
बुद्बुद हो की कल्लोळ! अर्णवपद माझे अढळ
(पिंगा)

असे घडून आले म्हणजे अद्‌भुतरम्य असे स्फूर्तीचे कडे पडून अम्लान प्रतिभावंतच चोहोकडे उमलू लागतात व सत्कल्पनांच्या प्रवाहात वृत्तींची रसलीन चंचल खगश्रेणी क्रीडा करते. बुद्धिग्राह्यपद्धतीने किंवा जड इंद्रियांच्या माध्यमाद्वारे आणि विविध प्रमाणांच्या साहाय्याने हा अनुभव स्वीकारावयाचा नसून 'काव्यानंद रसप्रसंग मग हा निस्संग संभोगणे' अशी त्याची सांगता एका उत्कट आनंदवृत्तीत बी दर्शवितात.

आधुनिक कवितेवरील भाष्य

बीनी आधुनिक मराठी कवितेला डोळसपणे न्याहाळले होते. इतकेच नव्हे तर तिच्यावरील आरोप प्रत्यारोप यामुळे ते अस्वस्थ झालेलेही दिसतात. 'कविवंदन' या कवितेत बी म्हणतात, आधुनिक कवींच्या कविते तुझ्यावरील रोष अजूनही टीकाकारांचा संपलेला नाही. वास्तविक तू सर्वार्थाने पूर्णतः वदललेली आहेस. भावाविष्करणाच्या अनंत पद्धती तू स्वीकारल्या आहेस. वस्तूतः तू अजूनही अल्लड व मुग्ध आहेस. तुझे अगाध लावण्य आणि निस्तुळ रूपामुळे तुझी कुलीनता अधिकच लक्षणीय झाली आहे. कारकसंधी आणि रसरीती यांचा साहित्यातील दगड चुरा तू फेकून दिलेला आहेस त्यामुळे तुझ्या सौंदर्यात अधिकच लक्षणीय भर पडली. कारण काव्य म्हणजे काही शब्दांचा सुंदर नादमधुर मेळ नाही किंवा अर्थचमत्कृतिपूर्ण असा डोंबारी खेळही नाही तर अथांग, अव्यस्त, अलौकिक अशा प्रतिभासंभवातून काव्यनिर्मिती होते. तुझ्या ठिकाणी अपूर्ववस्तुनिर्माणक्षमता असल्यामुळे दिव्य सौंदर्याची स्फुरणे, प्रस्फुरणे तुझ्याठिकाणी संमीलित होतात' असे आधुनिक कवितेचे स्वरूप असून मात्र टीकाकार तिच्यावर टीकेचा भडिमार करीत आहेत. वस्तुतः तिचे स्वरूप—

सोप्या सोप्या शब्दांनी स्फूर्तिसूत्राते गुंफोनी
मंजुळ मंजुळशी गाणी रचुनी रसिकान्तःकरणी
हळु शिरावे चोरोनि जावे मीपण लोपोनी,
हाँस मनी ही असे परी टीका तीते विफल करी !

असे आहे. परंतु टीकाकारांनी तिला हैराण केले अशी स्पष्टखंत बी व्यक्त करतात. तरीही ते आशावादी आहेत. महाराष्ट्र कविपरंपरा अखंड असूनही आज मात्र रसिकांचीच उणीव भासत आहे असा विशादपूर्ण उल्लेख बी करतात. भवभूतीनेही स्वकाव्यविषयी असाच उल्लेख केला होता. 'कालोऽह्ययं निरवधिर्विपुलाच पृथिवी' हे त्याचे उद्‌गार आहेत. 'अनुकार' ही सर्वार्थाने टीकाकारांच्या टीकाखोर वृत्तीला उद्देशून बीनी रचली आहे. काव्यात्मकतेच्या संदर्भात या कविता उण्या वाटत असल्या तरी त्यांमधून समकालीन कवितेवरील आक्षेपांचा योग्य परामर्श बीनी घेतला आहे व त्यातच सत्काव्य कोणते याचाही आदर्श मांडून दाखविला आहे. आधुनिक कवींच्या ठिकाणी असलेल्या नव्या उमेदी, नवे जिव्हाळे, नवे भरोसे आणि नवे उमाळे यांचे अचूक निदान बीनी करून त्यातून आधुनिक कवितेची प्रचंड परंपरा निर्माण होण्याचे सामर्थ्य एकवटलेले आहे असा दुर्दम्य आशावाद व्यक्त केला आहे. समकालीन काव्याचा बीइतका आधुनिक कोणत्याच कवीने पाठपुरावा केलेला नाही म्हणून एका अर्थी बी हे 'कवीनां कविः' ठरले व त्यातच बींच्या ठिकाणी असलेल्या रसिकतेचाही पडताळा येतो. काव्याचे सूक्ष्म अवलोकन, परंपरेचा अचूक परामर्श आणि आदर्श कवितेविषयीच्या निश्चित सुजाण समजुती बीनी कवितेतून व्यक्त केल्या. काव्यातील स्वाभाविकता आग्रहपूर्वक प्रतिपादिली आणि सौंदर्यधर्माचा आणि लयतत्त्वाचा पाठपुरावा केला.

काव्यानंदाची प्रतीतिपूर्ण ओळख रसिकांना बींनी करून दिली. 'मी' ची जाणीव नष्ट होऊन काव्यानुभवाच्या आनंदपूर्ण निर्मितीत रसिकानेही सामील व्हावे अशी अपेक्षा बी करतात. प्रतिभेच्या अम्लान कळ्यांच्या दिव्य मुग्धमधुर सुवासामुळे कवीचे अन्तर्विश्व फुलून येते आणि सुगंधित होऊन जाते व त्याचा आस्वाद रसिकापर्यंत पोहोचल्यावर हृदयसंवाद घडून रसास्वादाची प्रक्रिया पूर्ण होते, अशी मीमांसा काव्य चिकित्सेच्या संदर्भात बींनी केली आहे. तीत त्यांच्या पुरोगामी दृष्टिकोणाची आणि आधुनिक मनाची ठेवण स्पष्टपणे आणि लक्षणीय स्वरूपात व्यक्त होते. तांबे संप्रदायात कवितेत भावनेला मिळालेले जे प्राधान्य होते त्याला डावलून बींनी भावनेबरोबरच चिंतनशीलतेवर आणि विचारपरिपक्वतेवर भर दिला. आधुनिक मराठी कवितेला बींनी विचारशील बनविले, तिला अन्तर्मुख केले, तिच्यात विचारांची भेदकता निर्माण केली. त्यामुळे रविकिरण मंडळाच्या भावशबल काव्यनिर्मितीच्या पार्श्वभूमीवर बींची विचारशील कविता अधिकच उठून दिसली.

विश्वरूप आणि काव्यविश्व

पंच महाभूतांनी अन्वित होणारे विश्वरूप आणि कवीच्या मन:सृष्टीतून स्फुरणारे काव्यविश्व यांचा आलेखही बींची कविता काढते. स्वर्ग-धरेच्या मीलनाची सार्थ आकांक्षा केशवसुतांनीही धरली होतीच पण त्यांच्यापेक्षा बींची अपेक्षा थोडी वेगळी आहे. घननीलमणि प्रासाद चंद्रशालातील चमचमणारे तारे संगूढ नेत्रसंकेतांनी वसुंधरेला मंत्रमुग्ध करतात. प्रमदवनात शिरलेले लोक आपण तरुलता होऊन जातात आणि निजनामरूप विसरून जातात. चिरंतनाच्या निर्झरणीतील शाश्वततेचे पाणी आणून तू (शारदे) कुण्या भाग्यवंताचे शीर्ष न्हाणिले आहेस ! असा भाग्यवंत कल्पकतेच्या साम्राज्यात सृष्टी, निसर्ग यांच्याही पलीकडे जाऊन अनंताशी तादात्म्य पावतो व त्यावेळी अलौकिक ब्रह्माण्डाची घडामोड तो करतो. मनोमय वाणीला दिव्य भोगांच्या खाणी उपलब्ध होतात. परंतु सामान्य अरसिकाला 'टला-ट-गेला-गे' (वेडगाणे) अशी त्याच्याविषयीची समज होत. परंतु कवीचे कर्तृत्व इतके अपार आहे की हृदयाच्या कोशागारात ज्या सौंदर्यराशी आहेत त्या लुटून नेण्यासही कविवृत्तीच भ्रमरी होतात आणि त्या संपूर्ण विश्व गिळून टाकतात. विश्वाच्या उत्पत्तिस्थितीलयात नेहमीच परिवर्तन होत असते, घडत असते. हाच विचार केशवसुतांनी 'जुने जाऊं द्या मरणालागुनि' ह्या शब्दांत मांडला होता. बी म्हणतात,

मी येता उदयोन्मुखते। जग तव्हाची संभवते।
जीर्ण बंध सारे तुटले। मी माझी मज सापडले।

(गिगा)

जगाच्या विकासक्रमातही जे सृजन घडत असते त्याचे साक्षित्व कवी स्वीकारतो म्हणूनच काय करू—पण कसे करू। मीपण माझे कां विसरू? दीप कळीगे। दीप्तीला सोड—म्हणे का बुध तिजला? असा प्रश्न बी विचारतात. सृष्टीच्या प्रचंड पसाऱ्यात माणूस अनंत जीवमात्रांपैकी एक असला तरी त्याची संवेदनशील आणि नवनिर्माणक्षम अशी अलौकिक प्रतिभा या संदर्भातील अलौकिकतेच्या बाबतीतही समांतर विचार बी प्रस्तुत करतात. दीपकळीने आपला प्रकाश टाकून द्यावा असे 'बुध' तिला म्हणतील का? त्याप्रमाणे अनंत ब्रह्माण्डाच्या उलथापालथीत सर्जनशील कवीची प्रतिभा आणि तिची निर्माणक्षमता अनन्य आहे. याच संदर्भात विश्वाची मर्यादा बी स्पष्ट करतात. विश्व हे र्हास आणि उत्कर्ष यांच्या त्रिज्येत फिरत आहे. कोणत्याही गोष्टीचा प्रारंभ व अंतिम शेवट हा असतोच. पूर्णोत्थापनाचा काळ हाच त्याचा पतनप्रारंभ ठरतो अशा सृष्टीशासित कायद्यात विश्व बांधले गेले आहे. नूतनजीर्ण, रूपविद्रूप, नीचोत्तम, न्यायान्याय, अनीतिनीती, विषयासक्ती-संयम या अनंत द्वंद्वांनी संपूर्ण विश्व गजबजलेले आहे. त्यातच 'दारी बंड ! घरात बंड ! अवघे ब्रह्माण्ड बंडे भरे' अशी आज अवस्था झाली आहे. त्यात सृजनशील प्रतिभावंताला मात्र निसर्गाने लोकोत्तर रूप आणि तेज बहाल केले आहे. कारण त्यामुळे एक अलौकिक सृष्टी जन्माला येणार असते. निसर्गाने

दिलेल्या ऋणातून कुणालाच मुक्त होता येत नाही तर ते सव्याज फेडावे लागते. 'वाढा आणि जगा' हा सृष्टीचा नियम निसर्गालाही लागू असून तोच कवीलाही लागू आहे. वेलीला जसा रसप्रसन्न फुलौरा तसा कवीचा प्रतिभाविलास होय.

चैतन्याने रसरसलेली सृष्टी तिच्यातून जीवन-रस घेऊन फुलणारा निसर्ग आणि नवनिर्माणक्षम प्रतिभा असलेला कवी व त्याची काव्यनिर्मिती यांचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न बींचे कविमन करीत आहे. हे नाते आईचे आणि मुलाचे नाते आहे. बी म्हणतात—या विश्वकदंबी तेवि मातृ विंदू ते। शिशुविंदु मिळे जगदंबदयामृत वाते।

(वात्सल्य)

विश्वविकास आणि विश्वात्म्याचे विमल अविनाशी हास्य यामुळे विश्वकदंब फुलून येतो व स्वर्गधरेचे मीलन होते. विश्वाचे अंगणच आम्हांला इथे आंदण मिळाले आहे. (चांफा) विश्वदिशा उत्कंठित असून आकाश प्रसन्न आहे. संज्ञेत व्यक्त होणारे अपार्थिव संगूढ भाव चित्रात दाटून येतात आणि काव्यनिर्मिती होते. (निवेदन) विश्वातील समस्त वस्तुजातातील जे जे सौंदर्य डोळचांच्या पुतळीला दिसत आहे. ते ते चित्ताच्या मुशीत ओतून सत्कल्पनेतून अभिव्यक्त करा. विश्वसृजनसौंदर्य आणि काव्यसृजनसौंदर्य यांमधील अलौकिकता बी स्पष्ट करतात. विश्वाची नित्यविकासपरायणवृत्ती आणि कवीची काव्य-निर्मितीतील विकसनशीलता यांचा अनुबंध जोडण्याचा प्रयत्न बी करीत आहेत. (गिरिरान) विश्वातील जे जे म्हणून ज्ञेय आहे ते ते सुंदर आहे. मधुर आहे त्यातच कल्पकता भरली आहे. ही कल्पकताच जर विश्वातून कमी केली तर विश्व शून्य होईल. कमळ आणि भृंग रसिक आणि सहजमनोहर कविता यांचे जे नाते आहे तसे संपूर्ण विश्व आणि सौंदर्य यांचे नाते असून ते कल्पकतेच्या साह्याने सत्कवी कवितेत उतरवितो. इतकेच नव्हे तर 'कवीच झाला सृष्टी, सारी सृष्टी झाली कवि' असे सायुज्य विश्व आणि कलावंत यांच्यात निर्माण होते. पूर्णापासून ढळलेले जग शेवटी पूर्णापर्यंत अनंत अडचणीतून आणि संकटातून जात राहतेच. अशा जगावर कवीची सत्ता आहे. कारण कवी सृष्टीचे लाडके असल्यामुळे त्यांचे संलाप, प्रलाप आणि विलापाने संपूर्ण जग भरून जाते (फुलांची ओंजळ).

विश्वचक्राची उत्पत्ती, स्थिती आणि लय ही मानवी काव्यसृजनामुळेच लक्षणीय ठरते आणि कवी आपल्या नवनिर्मितिक्षम प्रतिभा बलावर एक अपूर्ववस्तू अलौकिक अशी निर्माण करतो. विश्वचक्राशी कवितेचे नाते आहे. सांतअनंता पलिकडचे आणि जाणीव नेणीव यांच्याही विचार-कक्षांपलिकडचे ते सर्व कल्पकतेच्या साह्याने कवीला जाणवत असते. तो अरूपाला रूप देण्याचा प्रयत्न करीत असतो.

वेडगाणे—पिंगा—चाफा

कवी, काव्य आणि काव्यरीती यांचा संबंध विश्वरूपाशी कसा आणि कोणकोणत्या पद्धतींनी गोचर होतो हे बघितल्यावर बींनी जो तत्त्व-चिंतनपर आणि दुर्बोध नि गूढ विचार 'वेडगाणे,' 'पिंगा' आणि 'चांफा' या तीन कवितांतून मांडला आहे त्याचाही निर्देश करणे आवश्यक आहे. वास्तविक बींनी प्रणयकविता, सामाजिक कविता, निसर्ग कविता, कथात्म कविता, भाषांतरित कविता, अशा समकालीन काव्यनिर्मितीचा ठसा, स्वीकार-णाऱ्या कविताही लिहिल्या होत्याच नाही असे नाही. 'माझी कन्या' आणि 'कमळा' या कवितांतील स्वाभाविकता बींच्या इतर कवितेतील क्लिष्टतेच्या संदर्भात कोण विसरेल! केशवसुतांनी काव्य-निर्मितीच्या घालून दिलेल्या परंपरेने बींनी वरील कवितांतून वाटचाल केली. परंतु ते काही त्यांच्या कवितेचे आत्मबळ नव्हे! आशयाच्या संदर्भात केशवसुत संप्रदाय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने केशवसुत आणि गोविंदाग्रज अशा रूपसिद्धीतून बींची कविता अवतरली. केशवसुतांनी आपल्या कवितेत बाह्यविश्व आणि कवीच्या गूढ अनुभूती यांच्या संदर्भात तात्त्विक पातळीवरून अनुभव स्वीकारला होता. क्षणात नाहिसे होणारे दिव्या-भास? या कवितेत केशवसुत म्हणतात 'हा हा ! हे जर सर्वभास धरता येतील माते तर। पृथ्वीचा सुरलोक की वनवुनी टाकीन मी सत्वर' हे जे भासाचे

अस्तित्व केशवसुत स्वीकारतात त्यातूनच त्यांचे कविमन 'हर्षखेद हे मावळले' 'व्यर्थ अधिकच अर्थ वसे' अशा निर्द्वंद्व अवस्थेपर्यंत पोहोचते. बींनी अपेक्षिलेली पूर्णता ही केशवसुतांच्या निर्द्वंद्व अवस्थेशी साम्यवादी ठरली आहे. केशवसुतांची एक कविता तर 'स्वर्ग, पृथ्वी आणि मनुष्य' या शीर्षकाची आहे. 'म्हातारी', 'झपूर्झा' आणि 'हरपले श्रेय' या तीन तत्त्वचिंतनात्मक कवितेद्वारा केशवसुतांनी मानवी गूढ भावनाशयाचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला. तशाच बींच्या 'पिंगा', 'वेडगाणे' आणि 'चांफा' या तीनच कविता गूढ आध्यात्मिक अनुभूतींनी रंगलेल्या आहेत. बींच्या मनावर संतकवितेचे संस्कार आहेत. आणि भारतीय अद्वैत तत्त्वचिंतनाची त्यांना ओळख होती इतकेच नव्हे तर त्यांचे धाकटे बंधु 'गजानन महाराज' म्हणून प्रसिद्ध होते. अशा एका वातावरणाचा परिणाम त्यांच्या तत्त्वविचारांवर आणि आध्यात्मिक अनुभवांवर पडणे शक्य होते. ध्यानधारणेचा बींचा अभ्यास होता. साधक आणि सिद्ध, ईश्वर आणि भक्त, प्रियकर आणि प्रेयसी अशा प्रतिकांतूनच भारतीय भक्तिविचार मधुरा भक्तीच्या अंगाने विकसित झालेला आहे. किंवहुना अद्वैत या संकल्पनेसाठी ज्ञानेश्वरांनी देखील प्रियुच प्राणेश्वरी या मिथुनाचे प्रतीक अमृतानुभवात उपयोजिले होते. प्रणयाच्या उत्कट, लक्षणीय आणि अपार्थिव अशा तरल गूढ अनुभूतीच्या अभिव्यक्तीसाठी बींनी 'चांफा' हे प्रतीक योजले तर 'पिंगा' या कवितेत 'नाचण' असलेल्या 'मी' ची विश्वचक्राकारात्म गतिशील अवस्था अभिव्यक्त केली. वेडगाणे या कवितेत अपूर्व वस्तूनिर्माणक्षम प्रज्ञाप्रतिभा हिचे सत् चित् आनंदमय स्वरूप अनुभविले. अशा या तीन कविता म्हणजे बींच्या काव्याची तीन अनुलंघ्य शिखरेच होत. बींच्या व्यक्तिमत्वाचे सारे विशेष आणि प्रतिभाधर्माच्या साऱ्या पाऊल खुणा घेऊन आलेल्या या तीन कविता म्हणजे खरे बींचे काव्यसंचित होय.

'चांफा,' 'वेडगाणें' आणि 'पिंगा' या कवितांत दुर्बोधता येते असे म्हटले जाते. परंतु ती दुर्बोधता शब्दांपलीकडे असलेल्या अनुभवाच्या प्रतीतीची दुर्बोधता आहे. जीवनाच्या सखोल चिंतनातून आलेला जो अनुभव आहे त्याचे प्रगटीकरण शब्दांद्वारा करीत असत. अनुभवाची अनेक पदरी घडण आणि निरंतर छंद गुंतागुंतीच्या स्वरूपात बींना जाणवले आहेत. ही गुंतागुंत जीवनविषयक केवळ नसून जीवनचिंतनातून स्फुरलेली प्रस्फुरणे जी कविमनाला जाणवतात, ती त्यांच्या आकार, वजन, परीध यासह अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न बी करतात. आणि त्यासाठी मग कधी आध्यात्मिक प्रतीके उपयोजितात किंवा कधी स्त्री—गीतातील लयकारी स्वीकारतात. वेडगाण्यात आलेले प्रतिभेतील कल्पकतेच्या स्वरूपाचे जोरदार अस्तित्व बींची काव्यविषयक जी ठाम बैठक आहे तिचेच दिग्दर्शन करतात. शब्दसृष्टीचे ईश्वर आणि लौकिक सृष्टीचा नियंता यांची तौलनिक श्रेष्ठता आणि अरूपाला रूप देण्याचा कवीचा अधिकार 'वेडगाणे' या विरोधाभासातून व्यक्त करतात. प्रतिमांच्या विरोधी न्यासातून अलौकिक प्रतिभा असलेला कलावंत आणि सृष्टीची निर्मिती करणारा ईश्वर यांच्या श्रेष्ठतेची मीमांसा करतात. 'वेडगाणे' या कवितेत किंवा 'पिंगा' या कवितेत किंवा 'चांफा' या कवितेत बी केन्द्रीभूत असे कलावंताचे अस्तित्व आणि त्याभोवती असलेले संपूर्ण विश्व यांच्यातील संदर्भाचा अन्वयार्थ लावतात ! 'वेडगाणे' मध्ये बी म्हणतात 'मी न तुझी त्याची मी न माझी कुणाची' तर 'पिंगा' मध्ये बी म्हणतात 'काय करू पण कसे करू, मी पण माझे का विसरू ?' तर 'चांफा' मध्ये म्हणतात 'कोण मी— चांफा ? कोठे— दोघे जण ?

बींच्या अन्तर्मनात निर्माण होणारे जीवनविषयक प्रश्न वरील कवितातून अभिव्यक्त झाले आहेत. लौकिक विश्व आणि कवीचा मन:कोप यातील संवाद वरील कवितेतून बोलका होतो. बींच्या एक आत्मसंघर्ष मन:संघर्षाचे प्रतिकात्मक रूप त्यांच्या या कवितातून घडते. मी कोण ? आणि विश्व रचनेशी माझा संबंध कोणता ? हा केवळ तत्वज्ञानापुरता प्रश्न न उरतो स्वत:च्या अस्तित्वाचा संदर्भशोध वरील कवितेतून बींनी

तिचं निरीक्षण विलक्षण संवेदनाक्षम असावं. पहिल्या दिवशी तिनं केलेला गोड अन् जास्त दुधाचा चहा मला आवडला नाही हे तिनं कसं जाणलं कुणास ठाऊक! माझ्या कपाळावरच्या अन् चेहऱ्यावरच्या रेषान् रेषांतली भाषा जणू ती नजरेतनं वाचत होती!

दुसऱ्या दिवशी माझ्या हातात कडक चहाचा कप आला. तो मला फार आवडल्याचंही मी चुकूनसुद्धा बोललो नाही. पण त्यानंतर तसाच नेमका चहा मला मिळत गेला. !

चहाबद्दल कौतुकाचे चार शब्द बोलावेत म्हणून मी कितीदा तरी जीभ रेटण्याचा प्रयत्न केला पण ते ओठाबाहेर आलेच नाहीत. त्या घरातलं शब्दांचं वावडं जणू मला बाधलं होतं!

मी काहीतरी बोललो नाही तरी तिची रोखलेली नजर दिवसभर माझा पाठपुरावा करीत असायची.

दुसऱ्याच दिवशी सकाळी माझ्या खोलीत माझ्या टेबलावर जळवाताच्या मलमाची डबी.

माझ्या पायांना पडलेल्या खोल उभ्या चिरा-देखील हिच्या नजरेतून सुटल्या नव्हत्या तर!

वास्तविक गेल्या रात्रीच्या माराच्या खुणा तिच्या गालावर अन् पाठीवर उमटलेल्या होत्या त्या माझ्याही नजरेला पडल्या होत्या. पण त्यांना काही लावलं का नाही हिनं हे मी कसं विचारावं. ? एक तर मी पुरुष. दुसरं पाहुणा.

त्यांच्या घरगुती बाबीत लक्ष घालण्याचा मला काय अधिकार होता? पण तिनं मात्र अगदी प्रेमळ आणि जबाबदार मालकिणीच्या नात्यानं माझा जळवात टिपून त्यावरचं औषध टेबलावर हजर केलं होतं.

निदान त्याबद्दल तरी धन्यवाद देणारे चार शब्द उच्चारावेत असं मी मनोमन ठरवलं.

पण ती आत. किचनमध्ये. आतापर्यंत एकही शब्द न बोललेली. संभाषणाला सुरुवात कशी करावी?

शेवटी जेवताना म्हटलं——

'तुम्ही पण का नाही बसून घेत?'

'नको, ते जेवल्यावर मग. ' नवऱ्याच्या कपड्यांची घडी करीत ती पुटपुटली.

अचानक वाटलं—— कशाला थांबावं हिनं त्यांच्यासाठी—— जो घरात नीट टिकतही नाही. मध्यरात्रीनंतर कधीतरी उगवतो. दारू पीत मारतो. त्याच्यासाठी कशाला.

पण असं कसं बोलणार?

फक्त बोललो——'ते मलम कशाला उगाच?'

'ज्यांच्या आधारावर आपण उभं रहातो अन् ज्यांच्या बळावर पुढची वाटचाल करायचीय् त्यांची काळजी नको घ्यायला? '

मी सर्द.

इतकं ही बोलू शकते?

अन इतकं अन् असं बोलण्या इतका ही प्रत्येक गोष्टीचा एवढा विचार करते?

हिचं हे उत्तर माझ्या पायांच्या संदर्भातलं की तिच्या नवऱ्याबद्दल माझ्या मनात आलेल्या विचारांच्या संदर्भातलं आहे?

'अन् माझ्या लक्षात आलं की ते उत्तर दोन्हीच्या संदर्भात चपखल बसेल असं देण्याइतकी ही स्त्री चतुर आहे.'

नुसती चतुर नाही तर ही मनकवडी पण आहे. 'तुम्ही पण का नाही आधी बसत?' या माझ्या एकाच प्रश्नानं तिनं तिच्या नवऱ्याबद्दलचे माझे विचार क्षणार्धात जाणले असावेत.

'वेदना देणाऱ्या गोष्टींकडे दुर्लक्ष करायलाच हवं का? वेदना असल्या तरी त्या शेवटी आपल्याच ना? .त्यांना जपायला हे हवंच. !'

मी हतबुद्ध.

जिला मी निर्जीव पुतळा समजत होतो ती स्त्रीच हे बोलत होती?

मी हळूच म्हटलं——'खरं तर नातं ना परिचय. मी तुमच्या घरात आलो. हक्कानं रहातोय. वर तुम्ही माझ्या औषधाचं. '

'मला त्यात त्रास कसलाही नाही.' ती म्हणाली 'आधी येतंय कोण आमच्या घरात'? एकटे-पण खायला उठतं. ! उलट कुणी आलं की जिवाला विरंगुळा. त्यात तुमच्यासारखा अन्यायाविरुद्ध लढणारा. मला तुमचं कौतुक वाटतं.

'त्यात कौतुक वाटण्यासारखं काय ?'

'जुलुमापुढे निमूटपणे मान न तुकवता लढत रहाणाऱ्यांचं मला नेहमीच कौतुक वाटतं. परिस्थितीनं दिलेलं आव्हान स्वीकारायचं की तिच्याबरोबर फरपटत जायचं ? दोन पर्याय असतात. तुम्ही आव्हान स्वीकारलंत... लढता आहात. ' ती म्हणाली.

मी शेवटचा घास उचलीत म्हटलं—

'लढू तर तुम्हीही शकता '

घडी घालता घालता तिच्या हातातला कपडा निसटला. ती किंचित पुढं आली.

माझ्याकडं रोखून पहात म्हणाली..

'लढते तर आहेच. लढणारही आहे. पण काही युद्धंही नुसतीच लढायची असतात. विजयाची तिळमात्र आशा नसतानाही'

'पण कशासाठी असं ? का ? विजयाची आशा नाही तर मग काय मरणाच्या ओढीनं ती लढत रहायची ? '

तिच्या दंडावरच्या एका काळ्यानिळ्या चरचरीत वळावर नजर खिळवून मी विचारलं.

ती उदास हसली. ग्रीष्मातल्या निष्पर्ण वृक्षासारखी भकास.

'मरणाचा विचार कशाला ? मरण ही तर जन्माला येतानाच नियतीनं जिवाला घातलेली पहिली अट...!'

'प्रश्न मरणाचा नाही... ते निमूटपणे स्वीकारायचं की लढता लढता स्वीकारायचं हे महत्त्वाचं. !!'

दुसऱ्याच क्षणी तिनं पाठ फिरवली अन् ती आत निघून गेली.

त्या दिवशी रात्री तो बऱ्याच उशीरानं परत आला. आला म्हणजे झिंगलेल्या अवस्थेत त्याच्या दोस्तांनी आणून पोचवला.

बेडरुमचं दार बंद झालं.

मी जागाच.

आदल्या रात्रीचा संदर्भ जमेला असल्यामुळं असेल कदाचित— त्यांचं भांडण मला अधिक स्पष्टपणे उमगलं.

त्याच्या पिण्याबद्दलची तिची नाराजी.

त्याच्या कृष्णा मैत्रिणीबद्दलचा उल्लेख...

मग थोडी मारहाण. रडणं. .कण्हणं...

मग शांत रात्री वहाणारे निःशब्द उष्ण. गुदमरुन टाकणारे वारे.

सकाळी तो निघून गेल्यावर पेपर चाळत मी उगाचच सहज स्वगत म्हटलं—

'परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत आहे. अन्यायाला काही सीमाच राहिलेली नाही... हे किती दिवस चालणार अजून ? '

'परिस्थिती आटोक्यात आणण्याचा आपण आपल्याकडून कसोशीनं प्रयत्न करतोच आहोत ना ? लढत रहायचं.

'शेवटी काय होणार कळत नाही.. !'

'फार फार काय होणार ?' तुम्ही पकडले जाल.

'नुसता पकडला जाणार नाही ! ही बातमी वाचा आजची... हे लोक हालहाल करून कुत्र्याच्या मौतीनं मारतात. '

ती जोरात हसली. म्हणाली— 'माराला घाबरता ?'

मी म्हटलं 'माराला घाबरत नाही— अन्याय्य माराची चीड येतेय्...'

मी क्षणभर थबकलो. म्हटलं—'कल्पना करा समजा एखाद्या पोलिस ठाण्यावर मला पकडून नेण्यात आल्यावर खूप बेदम मारलंय— अंग सुजलंय...'

माझी तिच्या अंगावरच्या वळांमध्ये फिरणारी नजर पकडीत ती म्हणाली— 'पुरे. उगाच कल्पना ताणू नको. अगदी तुम्हाला मेलेल्या अवस्थेत मी पाहिलं त्या प्रकारात तरी मला काही एक वाटणार नाही. काहीही उलट तुम्ही लढता लढता मेलात याचं कौतुक वाटेल. डोळ्यांतून पाणी नाही काढणार मी. लढायला फार मोठं धैर्य लागतं. .फार मोठं. मला ठाऊकय्... कारण मी... मी अनुभव घेतेय् त्याचा स्वतः '

झटकन् ती निघून गेलीही.

अन्याय्य आणि अत्याचाराच्या बातम्यांची काळी अक्षरं हातात धरून मी एकटाच तिथं बसून राहिलो.

रात्रीचं जेवण झाल्यावर तिनं मला आठवण केली— 'जळवाताचं मलम लावता ना?'

मी मुद्दाम म्हटलं— 'तुम्ही कोणती कोणती मलमं लावता?'

'माझं सोडा'— ती म्हणाली. 'मला चार भितींतच रहायचंय् अन् स्वतः साठीच लढायचंय्. ! तुम्हाला गजाबाहेर रहाण्यासाठी धडपडायचंय् अन् गजाआडच्यांसाठी लढायचंय्. '

'समजा ही लढाई संपली तर सगळे गजाआडचे मुक्त होतील? कित्येक गुदमरणारी मने. '

'पुरे पुरे. हे मलम फक्त पायाच्या भेगांवरचं आहे हं. मनालाही एक जळवात असतो. .त्याच्या भेगा दिसत नाहीत. खोल चरलेल्या असूनही पण दिसत नाहीत म्हणून त्यावर औषधही नाही. '

'अशावेळी. ?'

'अशावेळी फक्त मनाचं समाधान करायचं अरे यावर औषध नाही तर काय करणार? अन् मग ज्याच्यावर औषध आहे ते इमाने इतवारे चोळत रहायचं. कळलं? ·कोड्यात बोलणं पुरे. लावाल ना पायाला? ज्याच्या आधारावर उभं रहायचं अन् पुढची वाटचाल करायची त्यांची काळजी घ्यायलाच हवी.. '

त्यानंतर २.४ दिवसच गेले असतील नसतील. एक दिवस ती बेडरुमच्या बाहेर फारशी फिरकलेली दिसलीच नाही. त्या दिवशी जेवायला वाढायलाही ती समोर नव्हती. तिला बराच मार बसला असावा.

मी उगाचच अस्वस्थ बनलो. दुपारी मनाची तयारी करून तिच्या बेडरुमच्या दाराशी घोटाळत जरा जोरात पुटपुटलो—

'मला वाटतं— डॉक्टरांना.

आतून क्षीणसं हसू त्याही परिस्थितीत उमटलेलं जाणवलं—

'मला वाटतं मनाच्या जळवातावर डॉक्टरांकडे मलम नसतं.

मी चुप.

घरातल्या एकूण परीस्थितीच्या किनाऱ्याशी तटस्थपणे उभं रहाताही येत नव्हतं अन् धड त्या परिस्थितीशी एकरूपही होता येत नव्हतं. अशी कठीण अवस्था. ‹असं कठीण नातं तिच्यामाझ्यात नकळत गुंफलं गेलेलं.

काही नात्यांना शब्द नसतातच.

काहींना फक्त शब्दांचीच नाती असतात. त्या तिच्या गुदमरात मी विनाकारण गुदमरला जात होतो. तिला निदान कण्हता तरी येत होतं. मला कण्हताही येत नव्हतं. कारण जखमच मुळी नेमकी कुठं अन् कशीय् ते जाणवत नव्हतं.

अखेर राऊतला फोन केला.

'मायनस फाईव्ह.'

तो आमचा कोडवर्ड होता. एकाद्या ठिकाणी रहाणं कठीण वाटतयसं वाटलं काही धोका वाटला तरचा तो सांकेतिक निरोप होता. राऊत आला.

जाताना मी तिला म्हटलं— 'काही कारणानं इथून लवकर हलावं लागतंय.'

ती हसली. म्हणाली. 'कारण ठाऊक आहे. मात्र फारसं समर्पक नाही. हरकत नाही.'

मी निघालो. सामान आवरलं होतंच. तसं फार होतं काय? पण जे होतं ते उचलल्यावर-देखील उगाचच काहीतरी हरवल्यागत झालं. पाय काढायचा ठरवून राऊतला बोलावला पण पाय निघत नव्हता. मनाचे नाजुक तंतू कधी अंकुरले होते अन् कशाकशाला वेढून बसले होते तेच कळत नव्हतं. पण तरी निघणं आता भागच होतं.

म्हटलं— 'येतो. आमचं जीवन वर्तमानाच्या जगत्या क्षणावर लादून बाहेर पडलेले लोक आम्ही. उद्याचा काय— पुढच्या क्षणाचा भरवसा नाही. पुढं भेट होईलच कधी असं नाही. झाली तरी कोणत्या परिस्थितीत...कोणत्या अवस्थेत. ' मी अडखळलो.

ती.क्षीणशी हसली. म्हणाली— 'कोणत्याही अवस्थेत असो— जे लढू शकतच नाहीत त्यांच्यासाठी डोळ्यांत पाणी आणायचं. जे लढत रहातात त्यांच्यासाठी नाही. !'

तिनं जळवाताच्या मलमाची डबी पुढं केली. मी म्हटलं—.'आता हे कशाला?'.

'असू दे. लावीत जा. दिसणाऱ्या भेगा तरी बुजवणं आपल्या हाती आहे. तुम्ही भाग्यवान

आहात. निदान तुम्हांला औषध असलेला पायाचा जळवात आहे. औषधच नसलेला मनाचा नाही.

मी डबी खिशात टाकली अन् निघालो. जाताना राऊत म्हणाला— 'तुला काय त्रास होता तिथं ? 'तू तिथं सेफ होतास'

मी म्हटलं— 'बाबारे काही गोष्टी दाखवता येत नाहीत. काही सल ज्याचे त्यालाच सलून जातात..

अन् एकाकी मला जाणवलं— पायाच्या भेगां-वरचं औषध घेऊन बाहेर पडलोय् खरा...

पण मनावर एक खोल भेग उमटवून घेऊन !

राऊतनं माझी सोय कमलाकरकडं केली. तो फोटोग्राफर होता. त्याचा मदतनीस म्हणून मी डार्करूममध्ये बराच वेळ काढू शकत होतो.

पण तिथला अंधारही तिची आठवण झाली की अधिक गडद व्हायचा.

खरं तर कोणतीही चौकट न लावता येण्या-जोगं ते अनामिक नातं.

जणू कोणतीही निगेटिव्हच अस्तित्वात नसताना डेव्हलप होत गेलेली ती एक भावना.

तिची सतत आठवण होई. कशी असेल ती ? कधी कधी वाटे आपण उगाच निघून आलो तिथून. पण तिथं रहाणं फार बेचैनीचं झालं होतं. फार अस्वस्थ करणारं होतं. अन् तिथं राहून तरी मी काय करणार होतो ? ते काहीच न करता येणं फार त्रासदायक. भेगा दिसून. जाणवूनही औषध न लावता येणं. मनाचा तो जळवातच...

अचानक राऊत आला. म्हणाला 'फार वाईट बातमी.'

'कुणाला पकडलं रे ?' कमलाकरनं विचारलं.

'पकडलं नाही रे आपला तो चौधरी वकील— अरे हा होता ना तिथं, तो त्याची बायको मेली.'

'आँ ? केव्हा ? कशी ?' मी ताडकन् बाहेर येऊन विचारलं.

'अरे काल चोरी झाली म्हणे घरांत. चौधरी नव्हताच. तो क्लबात. हिला खूप मारहाण झाली. चोरांनी काही फारसं नेलं नाही पण ही नाहक मेली. अरे अंगावर हेऽऽ वळ.' मी क्षीण हसलो...

एकूण चौधरीनं स्वत: तिचा मारमारून जीव घेऊन असं चोरीचं नाटक रचलं होतं तर.. !

'काय सॉलिड मारलन्' ! राऊत सांगत होता— 'अरे हीऽऽ सुजली होती रे ! मी प्रेत पाहिलं ना ? तर टपकन् डोळ्यात पाणी आलंन्...'

'छट्'— मी एकदम म्हटलं— 'अरे जे लढू शकत नाहीत त्यांच्यासाठी रडायचं असतं— जे लढता लढता मरतात त्यांच्यासाठी नाही...'

मी एवढे शब्द उच्चारले खरे पण का कुणास ठाऊक— एकदम डार्करूममध्ये घुसलो अन् मला जाणवलं माझे दोन्ही डोळे पाण्यानं भरलेत.

लढत मेलेल्या तिच्यासाठी नाही...

तिच्यासाठी काहीच लढू न शकलेल्या माझ्या स्वत:साठीच. अन् मग त्या निर्जीव अंधारात मी माझ्या अश्रूंना मुक्त वाट करून दिली...

तिच्या सहवासातल्या असह्य आठवणींचा जळवात आता मला मात्र आयुष्यभर तोलायचा होता. मनामध्ये. औषधाविना. !

⊕ ⊕ ⊕

अनुक्रमणिका

प्रल्हाद वडेर/पु. शि. रेगे यांची कविता

आधुनिक मराठी कवितेचे दोन प्रमुख शिल्पकार म्हणजे पु. शि. रेगे आणि बा. सी. मर्ढेकर. त्यांपैकी रेगे यांना समीक्षकांनी न्याय दिला नाही असे काही जण म्हणतात. खुद्द रेगे यांनाही तसेच वाटत होते, हे मला माहीत आहे. पण या म्हणण्यात मला तरी काही अर्थ वाटत नाही. मर्ढेकरांचे काव्य हे खऱ्या अर्थाने 'नव' काव्य होते. म्हणजे त्यातील पूर्वपरंपरेचा धागा हा तुकाराम–रामदासांचा उल्लेख लक्षात घेऊनही पूर्णपणे 'काही कविता'-पासून तरी तुटला होता. त्यांचे काव्य विलक्षण उलथापालथ करणारे पण तितकेच सच्चेही होते. त्यांचा 'नवे' पणा हा क्रांतीच्या स्वरूपाचा होता. त्या अर्थाने रेगे यांच्या कवितेतील नवेपणा हा उत्क्रांतीच्या स्वरूपाचा आहे. पूर्वपरंपरेचा तिच्यातील धागा चांगलाच बळकट आहे. रेग्यांच्या मागे एक अभिजात समृद्ध परंपरा उभी आहे. तिच्याशी त्यांचे अतूट नाते आहे. त्यांची कविता ही कोणत्याही एका कालाशी बांधलेली नाही. मर्ढेकरांची कविता मात्र समकालीन जीवनाची, समकालीन भाषेत बोलणारी कविता आहे. रेग्यांच्या कवितेत मात्र आजच्या ज्वलंतच काय पण कसल्याच प्रश्नांना विचारांना वा भावनांना स्थान नाही. त्यांची राधा ज्याप्रमाणे 'मी नच इथली, नव्हतेच कधीं मी इथली' असे म्हणते तेच त्यांच्या कवितेबाबतही खरे आहे. दोन महायुद्धे झाली, जग खूप बदलले पण रेग्यांच्या एखाद्या कवितेचा अपवाद सोडला तर त्यांची त्यांच्या कवितेला दाद ना फिर्याद! मर्ढेकरांचाही एक धागा तुकाराम–रामदासांच्या संतकवितेशी संबंधित असला तरी त्यांची जीवनदृष्टी व श्रद्धा वेगळ्या आहेत. रेगे यांचे तसे नाही. म्हणून दोघेही आधुनिक मराठी कवितेचे महत्त्वाचे शिल्पकार असूनही रेगे मात्र मर्ढेकरांच्या अर्थाने 'नवकाव्या'चे प्रवर्तक नव्हते असे मला वाटते.

रेग्यांची कविता हे समुद्रातून वर आलेले एक स्वयंभू बेट आहे. पूर्णपणे आत्मलक्षी, आत्मरत नि आत्मतृप्त अशी त्यांची कविता आहे. स्वतः-च्याच मस्तीत डुंबत राहणारी, इतरांची पर्वा नसणारी प्रत्येक अनुभवाकडे सौंदर्यदृष्टीने पाहण्याचा, आपण जे अनुभवलं त्यातील सौंदर्य, जिवंतपणा व सामर्थ्य पकडण्याचा त्यांचा उत्कट प्रयत्न असतो. त्यात एक प्रकारचा कलंदरपणा, बेछूटपणा (त्यांच्यातला कवी स्वतःला 'जून कलंदर' असेच म्हणतो). आपल्या सौंदर्यानुभवाच्या छटा पकडून घेतानाही रेगे भाषेची मोडतोड करीत नाहीत. तिला मुरड घालतात. काही शब्द नव्याने घडवितात. त्यांची शब्दसूची आणि त्यांची लयीवरील पकड विलक्षण आहे. मोकळ्या जागा, स्वल्पविराम यांनाही त्यांच्या कवितेतल्या अर्थात व लयीत फार महत्व येते. संस्कृत वाङ्मयाचे संस्कार त्यांच्यावर फार खोल आहेत. त्यामानाने पाश्चात्य वाङमयाचे संदर्भ त्यांच्यात फार कमी येतात. किंबहुना पाश्चात्य संस्कारात वाढूनही त्यांनी आपले जुनेच संस्कार कटाक्षाने जपलेले आहेत. आणि ते त्यांच्या व्यक्तिमत्वाची समृद्धीच वाढवितात.

रेगे यांच्या कवितेचा एकच विषय आहे. आणि तो म्हणजे स्त्री व तिची सृजनशक्ती. निसर्गातही याच निर्माण-शक्तीचा विलास त्यांना दिसतो. स्त्रीच्या रूपात या सृजन शक्तीचा त्यांना साक्षात्कार होतो. त्यांना एकदा तुम्हाला शारीरिक संवेदनातून मुक्तीचा मार्ग शोधावयाचा आहे काय असा प्रश्न विचारला असताना ते म्हणाले होते की, "मुक्ती म्हणजे काय? सौंदर्य मग ते कोणतेही असो, त्याचे आकलन मी केवळ स्त्रीनिष्ठ समधाततेतच करू शकतो. निसर्गाची केवळ निसर्ग म्हणून मला अपूर्वाई वाटत नाही." त्यांचा निसर्ग आणि त्यांना भुलविणारा सृजन-

शक्तीचा विलास हा स्त्रीच्या विविध विभ्रमांतूनच साकार झालेला आहे. त्यांचे अनुभवविश्व काहीसे मर्यादित वाटले तरी अविष्काराची अपूर्व विविधता आपल्याला थक्क करते. त्यांच्या कवितेतील अनुभवांचा ताजेपणा, नाविन्य आणि इंद्रिय-संवेद्य अनुभवांतील आवाहकता ही अत्यंत तरल, उत्कट व सूक्ष्म जशी वाटतात, तसेच त्यांचे शब्दही एक प्रकारच्या मंत्रशक्तीने भारल्या-सारखे वाटतात. आणि त्यांच्या कवितेला असलेली बोलीभाषेची लय, त्यातील धृष्टता व निःसंकोचपणा हीसुद्धा विलक्षण परीणामकारक ठरतात. पुन्हा त्यातील अल्पाक्षरत्व व गूढता ही त्या अनुभवांभोवती एक भारलेले वातावरण उभे करतात.

त्यांची सुरवातीची कविता ही प्रामुख्याने शारीरिक पातळीवरच अवतरते. त्यांच्या या कवितेतील सृजन शक्तीचे विलास विविध स्त्री-रूपातून व्यक्त होतात. तिची विविध रूपे, तिच्या हालचाली, स्मिते, निःश्वासिते, तिचा खटयाळपणा (नि लुच्चेपणाही), नि तिची नेत्रपल्लवी, तिचे अवयव इतकेच नव्हे तर तिच्या तोंडावरची चिकचिक नि हनुवटीवरची पुळी हीसुद्धा त्यातून निसटत नाही. आपल्या लावण्याच्या अनेक परींनी पुरुषाला भुलविणारी आणि फसविणारी ही स्त्री आणि तिच्याशी मीलन व्हावे म्हणून आसुसलेला पुरुष या पुरुष-प्रकृतीच्या सनातन खेळाची जाणीव त्यांच्या कवितेत उत्कटतेने होते. पण स्त्री ही आदिशक्ती किंवा कामभावनेचे उदात्तीकरण रेग्यांच्या कवितेत नंतर सुरू झाले असावे. प्रारंभी तरी त्यांच्या अनुभवांच्या उत्कट आविष्कारावर हे अध्यात्मिक अवगुंठन फारसे जाणवत नाही. (पुढे पुढे मात्र त्यांच्या कादंबऱ्या व नाटके यातून ते सुरू झाले. पण गमंत अशी की, त्यांची कथा यापासून वरीचशी अलिप्त वाटते. तिथे मात्र एक सर्व भोगलेला पण तरीही अलिप्ततेने पाह-णारा एक 'जून कलंदर' आहे. पण त्यांच्या गद्यलेखनाचा हा मुद्दा आपण इथेच सोडू या). त्यांच्या एका संग्रहाचे नाव 'हिमसेक' आहे, ते अत्यंत अर्थपूर्ण आहे. हिमसेकांतील कोमलता, नाजुकता, सौंदर्य आणि गूढता त्यांच्या सर्वच कवितेत भरून राहिली आहे.

पुरुष आणि प्रकृती या सनातन प्रतीकापेक्षा किंवा त्यांच्या कवितेचा अध्यात्मपर अर्थ लावण्या-पेक्षा स्त्री आणि पुरुष यांच्या चिरंतन ओढीची चित्रेच त्यांच्या कवितेत पाहणे मला अधिक श्रेयस्कर वाटते. कारण मग त्यांच्या कवितेतील स्त्रीला आदिमाता, आदिस्त्री वगैरे वगैरे म्हणणे आपोआप टळते. रेग्यांनीही समीक्षकांचा तसा उगाच गैरसमज करून दिला असावा, याचे कारण तत्कालीन मराठी साहित्यविश्वातील सनातनी वातावरणात असावे. म्हणून त्यांनी सेक्सचे (काम भावनेचे) अधूनमधून उदात्तीकरण करण्याचा प्रयत्न केला असावा. रेगे गूढ अध्यात्मात शिरल्यासारखे वाटतात ते काहीसे अलीकडे, म्हणजे त्यांच्या 'प्रियाळ' पासून. पण एरवी त्यांची कविता ही हाडामांसाच्या स्त्री-पुरुषांचीच वाटते व तसाच तिचा आस्वाद घेतला तर ती आस्वाद्य होते. तिला उगीच अध्यात्माच्या परिभाषेत डुंबवून तिच्यातून भलती प्रतीके पाहण्यात अर्थ नाही. (तसले अर्थ वाचून रेगेही आपले सगळे अंग घुसळीत मिस्किलपणे हसले असते !)

पुरुष आणि स्त्री यांचे एकमेकांकडील आकर्षण, प्रीती, काम भावना, ओढ यांची चित्रे ते कधी निसर्गाच्या प्रतीकांतून व्यक्त करताना दिसतात. त्यात त्यांची कोणतीही नैतिक दृष्टी नाही. पाप ही कल्पनाही नाही. कुणाला काय वाटेल, कसे वाटेल याची पर्वा न करता निःसंकोचपणे आपला 'अ-पाप' दृष्टिकोण ते व्यक्त करतात. म्हणूनच—

"तू हवीस यांत न पाप
पण हवी असताना
नसावीस तूं, नकोच तूं, नाहीच तूं
छे ! छे ! पापच तूं"

असे ते म्हणू शकतात.

स्त्रीकडे स्त्री म्हणून, एक सावयव, वस्तू म्हणूनच ते पाहतात. तिचे लावण्य 'वर्षाकाल' या कवितेत म्हटल्याप्रमाणे जणू त्यांनी—

"कोरुनि मी नभ घेतो
या माझ्या हातांनी—
वदन तुझे अलवाले
फुस लावुनि अन् घेतो
मातीच्या ओठांनी
संथ तळ्यातील पाणी
डोळ्यातिल तव गाणी"

असे अगदी कोरून घेतले आहे. तसेच त्यांनी अत्यंत उत्तान भावनेचे उत्कट चित्र काढण्याचेही टाळलेले नाही. शारीरिक तृप्तीच्या व अतृप्तीच्या विविध छटा किंवा शृंगाराच्या अलिकडचा पलिकडचा असा सृजनशक्तीचा तरल अनुभवही 'पाहिले न पाहिले' सारख्या कवितेत व्यक्त केला आहे. त्यांच्या स्त्रीरूपाच्या विभ्रमाची काही उदाहरणे पाहिली तर रेग्यांची किमया लक्षात येईल—

१. हिरवी साडी ही त्याली–
कांति केसरी खुलली
कुजबुजली पानांही
चाफेकळीच वेढिली.

यात एका निसर्गचित्राच्या आधारे स्त्री-रूपाचा ते वेध घेतात—

२. दोन प्रहर निवान्त सारे
श्रमभराने वाजेवरती
पांगुळलेली तू
खिडकीबाहेर ढाळितो चवरी
आसुसलेला शेवगा दारचा.

या कवितेत शेवगाही आसुसलेला आहे. आणि त्याच्या रूपाने पुरुषाच्या अतृप्तीचा मोजक्या नि नेमक्या शब्दांत एक गोफ विणला गेला आहे. 'पाहिले न पाहिले' मध्ये कवीला सृजनशक्तीचा साक्षात्कार होतो तर 'मस्तानी' या त्यांच्या गाजलेल्या कवितेत मातीचे व मस्तीचे निकटचे नाते पुन्हा स्त्रीच्या (मस्तानीच्या) रूपाने उलगडू लागते—

माती म्हणजे खरेच माती
दुसरे तिसरे नव्हेच काही

आणि

मस्ती म्हणजे गालावरची
मस्ती म्हणजे डोळ्यांमधली.

येथपासून मस्ती म्हणजे छाती, मांड्या, मांड्यांवरचा घाम, मस्ती म्हणजे विसरणारी अन् विसरविणारीही असे हे 'मस्ती पुराण' चालू होऊन मस्ती म्हणजे गंगेमधले अथांग पाणी, गोपकृष्ण नि मत्त हत्ती असे त्याचे उदात्तीकरण होते. पण तरीही मातीचे मस्तानीशी असलेले निकटचे नाते—

केसात तिनदा काळी माती
वक्ष तिच्या त्या निळ्या टेकड्या.

वगैरेंतून पुन्हा पुन्हा ठसविले जातेच. पार्थिव आणि अपार्थिव यांपैकी रेग्यांच्या कवितेत अखेर पार्थिवालाच अधिक महत्व आहे हे जाणवते. 'त्रिधा राधा' या कवितेत निसर्गाच्या रूपास राधा कृष्णाच्या सनातन प्रतीकाद्वारे हेच पार्थिव, अपार्थिव नाते जरा वरच्या स्तरावर व्यक्त होते.

रेग्यांच्या कवितेत स्त्रीची अनेक रूपे येतात. कधी 'शहनाज' तर कधी दाक्षायणी, उमा, राधा, सीता, पांचाली अशा रूपात ती येते. शहनाज कवितेची परिभाषा आध्यात्मिकही आहे (असे म्हणतात). या दृष्टीने बारा पाकळ्यांचे हृद्कमल, हंसविशेष, काळोखाच्या विळख्यातील पद्मिनी, तारिणी इत्यादी प्रतिमा कुंडलिनी योगाशी संबंधित आहेत असे म्हणतात व तसा अर्थ लावून या मार्गातील जाणत्यांना तिचा आस्वाद घेता येईल. पण त्या खटाटोपात न पडताही 'शहनाज' चा आस्वाद घेता येतो.

रेग्यांची कविता अलिकडच्या काही वर्षांत खूप बदलली. तिच्यातील कारागिरीही (craft) वाढली. ती अधिक गूढ झाली. पण तिचे मूळ केन्द्र मात्र तेच राहिले : स्त्री आणि स्त्री-प्रमाणेच ती भुलविणारी, फूस लावणारी, फसविणारी, हातातून निसटून जाणारी, सौंदर्याने मुसमुसणारी, नि कधी कधी मिस्किलपणे खोड्या करणारी अशीच आहे. तिला एक स्वतंत्र लय आहे. केवळ शब्दांची, ओळींची उलटा पालट करून (उदा. पुष्कळदा पक्षी झाडावर जे गाणे गातो, सावध बेसावध इ.) ते अर्थाची व लयीची एक वेगळीच बंदिश साधतात. उत्कट निसर्गचित्रे काढावीत तर ती रेग्यांनीच. शेवटी त्यांच्याच शब्दात त्यांच्या कवितेचे असे वर्णन करता येईल—

सतेज तुझे बोलणे चालणे
सुकुमार खेळे अंगी नव्हाळी
क्षणभर वाटे
अपूर्व जणु हिमसेक हा
स्वच्छ निरागस, तेजाळ, विश्रब्ध.

⊕ ⊕ ⊕

आशा सावदेकर / केशवसुत आणि तांबे

अर्वाचीन कवितेचे जे विशिष्ट रूप आज तिला लाभले आहे ते कशामुळे ? असा प्रश्न विचारला तर एकच एक उत्तर देता येईल की केशवसुतांनी या अर्वाचीन कवितेचा पाया घातला. यासंबंधी कुसुमावतीबाई देशपांडे म्हणतात की, या कवितेचे मूळ इंग्रजी कवितेच्या अध्ययनात आहे. रा. श्री. जोग इंग्रजी काव्यलेखनपद्धती केशवसुतांनी आत्मसात केली म्हणून अर्वाचीन काव्य आत्मलेखनपर बनले असाच सूर आळवताना दिसतात. परंतु याच इंग्रजी काव्याच्या अध्ययनावर आधारलेली कविता कुंटे, प्रधान, महाजनी यांनी लिहिली असताना त्यात हे वैशिष्ट्य का दिसू नये ? याचे एकच कारण सांगता येईल, की केशवसुतांनी इंग्रजी काव्यांचा पिंड ओळखला. इंग्रजी अध्ययना-पेक्षा विशिष्ट स्वरूपी व्यक्तित्वामुळे केशवसुतांना मराठी काव्यक्षेत्रात अशी अभूतपूर्व क्रांती घडवता आली. काव्याची अंतर्मुखता त्यांनी जाणली आणि म्हणूनच सौंदर्यभावना, आत्मानुभव व्यक्त करणारी आत्मविश्वासानं युक्त अशी नवी कविता या नव्या सौंदर्यवादी मनातून निर्माण झाली. सौंदर्याचा गाभा शोधण्याची तळमळ त्यात महत्वाची आहे. सौंदर्यवाद ही मानवी स्वभावप्रकृती आहे हे लक्षात घेतले म्हणजे केशवसुतांनी मराठी काव्यात आणलेला सौंदर्यवाद या संज्ञेचा अर्थ चटकन् लक्षात येऊ शकतो. प्रामाणिक भावनांची उत्कटता आणि सौंदर्यासाठी निर्माण होणारी मानसिक तळमळ यांमुळे सौंदर्यवादी मन आत्मपूजक बनते, पण याचा अर्थ ते अ. ना. देशपांडे म्हणतात त्याप्रमाणे 'लोकविन्मुख' बनते असा होत नाही.

मराठी काव्याची आधुनिकता ही अशी व्यक्ति-विशिष्ट सौंदर्यवादाशी निगडित आहे. प्रा. क्षीरसागर म्हणतात त्याप्रमाणे हा सौंदर्यवाद सौंदर्याच्या साधनेसाठी बेहोप होणारा, त्याच्या अप्राप्तीने अंतर्बाह्य निर्माण होणारा, त्याच्याच ध्यासात केवळ लीन होऊन गेल्यामुळे निगूढ वाटणारा, त्याच्या चिंतनात सर्वस्वी अंतर्मुख होणारा असा असतो. तो प्रथम मराठीत आणला केशवसुतांनी.

केशवसुतांनी स्वीकारलेली सौंदर्याची कल्पना ही व्यक्तिसमष्टी संबंधामुळे वेगळी ठरते. 'स्वर्भूसंगमां'चे त्यांचे स्वप्न हीच त्यांची सौंदर्याची कल्पना. कवीच्या स्वातंत्र्याला त्यांनी दिलेले महत्व हा त्यांचा असाधारण विशेष. त्यामुळेच त्यांची कविता सर्वगामी बनली. 'अपुल्यामध्ये विश्व पाहुनी मी पूर्जी अपुल्याला.' अशी व्यक्तीकडून समाजाकडे व परत व्यक्तीकडे असा प्रवास करणारी बनली. प्रचलित संकेतांना बळी पडणाऱ्या बाह्य जगावर त्यांचा राग आहे तरीही या जगाला 'सुश्लोकसाम्य' घडवायचे म्हणून कवी जगापासून दूर जात नाही. कला-वंताच्या स्वातंत्र्यावर भर देताना केशवसुत सामाजिक ऋण विसरू शकत नाहीत. बोध-वादापासून दूर राहून समाज मूल्ये जपणारी अशी व्यक्तिविशिष्ट सौंदर्यदृष्टी केशवसुतांनी मराठी कवितेला दिली. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्वांशी त्यांनी आपल्या दृष्टीची सांगड घातली. काव्याच्या स्वातंत्र्याविषयी बोलताना त्यांच्या विलक्षण आत्मनिष्ठेमुळेच इतरांना व कवी तांब्यांनाही ती केशवसुतांची आत्मश्लाघा वाटली. पण केशवसुतांनी कवितेला इतक्या आकुंचित अर्थाने जखडलेले नाही.

'कूपातील मी नच मंडूक' हा कलावंताच्या स्वातंत्र्याचा उद्घोष आहे. तांबे ज्याला केशवसुतांचा अहंवाद म्हणतात ती वास्तविक उफाळलेली अस्मिता आहे. ज्यावेळी समाजात व्यक्तीचे स्वातंत्र्य, व्यक्तीची भावना या गोष्टी अस्तित्वात नव्हत्या, रूढीपुढे मान लपविण्या-पलिकडे वेगळे व्यक्तित्व नव्हते त्यावेळी समाज-विरुद्धची प्रतिक्रियाही तितकीच धारदार असणे स्वाभाविकच ठरते.

याच केशवसुतांनी आणलेल्या व्यक्तिनिष्ठ सौंदर्यवादाचेच पण आगळेवेगळे स्वरूप आपल्याला तांब्यांच्या कवितेत पाहायला सापडते. केशवसुत आणि तांबे या दोन भिन्न परंपरा मानणे म्हणजे तांब्यांना महत्त्व देणे नव्हे तर त्यांच्या संबंधीचे चुकीचे आकलन अुराशी बाळगण्यासारखे आहे.

सौंदर्यवादी व्यक्तित्वाचेच सगळे विशेष मनोज्ञ रूपाला घेऊन तांब्याची कविता संधिकालात अवतरली आहे. पण अभिजातवाद हा तिचा धर्म नाही. सौंदर्यध्यास हेच तिचे मर्म आहे. तांबे सौंदर्याची कल्पना वेगळ्या तऱ्हेने उभी करतात एवढेच. सर्व जगाच्या मूळाशी असलेल्या प्रेममय स्वरूपातच ते सौंदर्याची परिणती शोधतात. या प्रेममय, प्रेममंगल सत्वातच त्यांना खरा सौंदर्यसाक्षात्कार घडतो. म्हणूनच प्रेमश्रद्ध वृत्ती, प्रेमप्रतीतिधर्मी वृत्ती हाच तांब्यांच्या दृष्टीचा खरा विशेष ठरतो. प्रीती ही त्यांची जीवनसंगती आहे तर प्रेमश्रद्धा हे त्यांच्या जीवनानुभवातले खरे संगीत आहे.

तांब्यांची प्रतिभा नाटयात्म खरी, पण ब्राऊनिंग जसे आपल्या नाटयगीतांबद्दल बोलताना म्हणतो—

....So many utterances of so many imaginary persons not mine....

तसे तांब्यांबद्दल म्हणता येणार नाही. कारण इतरांच्या मनोभावना रंगवताना तांब्यांनी स्वतः-च्याच व्यापक मनोवृत्तीचे चित्रण केले आहे. त्या व्यक्तींच्या मनातील भावनेत गवसलेल्या सूक्ष्म नाटयामुळे तांबे तिथे आकृष्ट होतात, ते नाटय त्यांच्या मनात भिनते मग जणू काही तांबे मनाने व्यक्तीच बनतात. तांबे, आपल्या काव्यदृष्टीशी समतोल साधणाऱ्याच व्यक्ती निर्मितात. तांब्यांनी नाटयगीत हा प्रकार स्वीकारला पण त्यातील भावनेची अलिप्तता त्यांनी मानली नाही. त्यांच्या नाटयगीताचे नाते इंग्रजी (Dramatic lyric) पेक्षा संतांच्या विरहिणी, गौळणींशी आहे ते म्हणूनच. (I see myself in all I see) या आधारावर अशा व्यापक आत्मभावाने तांब्यांनी नाटयगीते लिहिली. म्हणूनच द. भि. कुळकर्णींच्या शब्दांत सांगायचे तर त्यांनी सामान्य माणसाच्या पातळीवर वस्तुनिष्ठा आणि आत्मनिष्ठा यांचे ऐक्य साधले आहे. म्हणूनच 'निजल्या तान्ह्यावरी' दृष्टी लावणाऱ्या माउलीचं वर्णन करताना—

अशीच असशील त्रिभुवनजननी
बघत झोपल्या मज का वरुनि.

अशी आत्मनिष्ठा नोंदवणे त्यांना तितकेच महत्त्वाचे वाटते तर आत्मनिष्ठेत रंगतांना 'क्षण हाच जवळ ये' अशी प्रीतीवृत्ती रंगवताना—

पूर्ण विश्वयि अति एकांती
तुझी ज्योति पसरो स्थिर, कान्ती
मिळो त्यात मम फिटुनी भ्रांती

अशी 'आत्मसमर्पणा'ची भावना बळावते.

त्यांच्या नाटयगीतांचा आणखी एक महत्वाचा विशेष म्हणजे त्यांना जाणवणारं नाटय हे व्यक्तीत अथवा शब्दात नाही तर व्यक्तीच्या मानसिक कल्लोळात आहे. म्हणजेच तांब्यांचे काव्य हे निव्वळ नाटयकाव्य नाही तर 'भावनाटयकाव्य' आहे.

'जिकडे तिकडे तुझीच नाडी अुडे'

असे आत्मत्व विस्तारलेले दिसणे हीच तांब्यांची दृष्टी आहे. नाटयकाव्य हे नाटयासारखे निवेदनात्म असलेच पाहिजे असे नाही. नाटयप्रयोग पहाणारा प्रेक्षक प्रत्यक्ष कलेचे अस्तित्व अनुभवतो. साहित्याचा रसास्वाद ही व्यक्तिनिष्ठ अनुभूती. म्हणजे वाचक हा सूक्ष्म मानसिक परिणामकारकतेवर भर देतो. म्हणून नाटयगीत हे भावनांच्या परिणामकारकतेवर भर देणारे असावे हे मर्म तांब्यांनी ओळखले. उत्कटतेच्या क्षणाचा बिंदू त्यांनी ओळखला म्हणून ते भावकवीच ठरतात.

तांब्यांची गूढगीते आणि केशवसुतांचे गूढ-गुंजन यांचा तुलनात्मक अभ्यास केला तरी दोघांच्या दृष्टीतील फरक सहज स्पष्ट होऊ शकतो—

हर्ष खेद ते माळवले
हास्य निमाले
अश्रु पळाले
कंटकशल्ये बोथटली,
मखमालीची लव वठली.

या ओळीं गूढानुभवाच्या खऱ्या पण हा अनुभव शब्दांतील आहे. केशवसुत या कवितेत व्यर्थातला अर्थ उलगडून दाखविण्यात इतके गढले की कविता Analytic बनली. Synthetic हा भावोत्कट काव्याचा धर्म ती विसरली. तथाकथित गूढाची कोडी घालणे हा गूढ काव्याचा धर्म नव्हे. गूढार्थ काव्यमय दृष्टीने स्पष्ट करू पहाणे हेच महत्त्वाचे.

याउलट तांब्यांची कविता ही गूढ दाजू सहजगत्या उलगडणाऱ्या, जीवनाच्या महत्त्वाच्या साक्षात्कारावर भर देणारी आहे. त्यात प्रकृति-पुरुषाच्या प्रतिमांचे संकेत नाहीत तर भावनांचे मूर्तत्व आहे. तांबे प्रेमालाच सृष्टिकंद मानतात व त्या प्रेमतत्वाशी प्रेमयोगानेच एकरूप होऊ पहातात. म्हणून त्यांना Love Mystic च म्हणावे लागते.

मला येथला लागला ळळा
सासरी निघता दाटतो गळा

हे जीवनातल्या सत्याचे मर्म साक्षात्कारासारखे कवीला गवसले आणि सुंदर भावनेतून फुलले. म्हणून त्यांची कविता वेदांतमय नव्हे त्यात 'A carving for infinite, a lingering look towards the great beyond' हीच प्रतीती आहे. ती भावना अनिर्वचनीय आहे तिचे मूर्तीकरण हेच त्यांचे गुढगूंजन आहे. अदृश्य जगाच्या सौंदर्याविषयीचे आविष्करण हा सौंदर्यवादी मनाचा धर्मच नव्हे. प्रा. क्षीरसागर म्हणतात त्याप्रमाणे 'निसटत्या सौंदर्य-दर्शनातूनच सौंदर्यवादी कवीच्या अध्यात्मदर्शनाची वाट फुटत असते.' तृणाच्या पात्यात मखमली सौंदर्याबरोबर विश्वाला व्यापून उरणाऱ्या शक्तीचा साक्षात्कारही तांब्यांना घडतो.

तांब्यांची काव्यातील सामाजिकता हा त्या काव्याचा गाभा नाही. प्रचारापासून दूर राहून सामाजिकतेतही तांब्यांनी चिरकालिक व सर्वव्यापी भावनेवर भर दिला आहे. उपयुक्ततावादाचा धिक्कार केला तरी सामाजिक परिस्थितीपासून तांब्यांची प्रतिभा संपूर्ण अलिप्त नाही. तर सामाजिकता हा केशवसुत-काव्याचा प्राण आहे. व्यक्तिविनाशक रुढिप्रिय समाजविरोधी भूमिका केशवसुत वारंवार घेतात.

तांब्यांची निसर्गदृष्टीही केशवसुतांशी तुलना करून तपासून पहाण्यासारखी आहे. केशवसुतांच्या काव्यातील निसर्गदृष्टी ही इंग्रजी काव्याची देणगी आहे.

चिरतरुणा रे, चिररुचिरा रे
तुजसान्निध्य तो वास वरा रे
तुजमजमध्ये परि केवढी आहे रुंद दरा रे

ही (Romantic yearning) सौंदर्यवादी मनाची वेदना आहे. निसर्गातले शाश्वत सौंदर्य आपल्या जीवनात जे नाही याची ती नवी जाणीव आहे.

जेथे ओढे वनराजी, वृत्ती रमे तेथे माझी
कारण काही साक्ष तिथे, मज त्या श्रेयाची पटते.

अलौकिक बुद्धीला सामान्य जीवनात जे 'श्रेय' हरपलेसे वाटते ते निसर्गसान्निध्यात गवसल्याचा आनंद होतो.

'भृंग' हा सृष्टीचा भाट. हा तर जणू 'प्रीति, चारुता, आनंद' याचेच गीत गातो आहे.

केशवसुतांच्या निसर्गगूजनात एकप्रकारची इंग्रजी अनुकरणातून आलेली सांकेतिकता आहे. तांब्यांना निसर्गसौंदर्यातून भव्य दिव्य चिरंतनाचाच प्रत्यय येताना दिसतो. निसर्गसौंदर्याला वाटाड्या बनवून कविमन त्याहीपुढे असलेल्या चिरंतन सौंदर्याकडे धाव घेते. सौंदर्यदर्शनातूनच गूढ अध्यात्मदर्शनाला तांब्यांच्या काव्यात वाट फुटते ती अशी! त्या निसर्गदृश्यामागील शक्तीचा, प्रेममय अनंतरूपाचा साक्षात्कार होणे, त्यामुळे आनंदलीन होणे हीच तांब्यांची दृष्टी त्यांच्या निसर्गकाव्यातून दिसते. रूपारूपात व्यापूनही ते अनंतत्व रूपातीत आहे या अस्सल भारतीय जाणीवेमुळे निसर्गातून त्यांच्या खुणा निरखीत कवी त्या अंतिम सौंदर्याचा मागोवा घेतात.

'रुपी रुपी तुझी अनंता विभूती विस्तारली' म्हणत असतानाच त्यांना भासते—

'कधी चंद्राच्या मिषे घालिसी डोळा मजवरती'

थोडक्यात, त्यांच्या निसर्गदृष्टीमागेही प्रेमरज्जूने मानव आणि निसर्ग यांना बांधू पहाणारे प्रेमश्रद्ध मनच दिसते.

तुम्हापरि सूर्य किरणी या न्हाणी
तुम्हापरि वरुण पाजी या पाणी,
... बघा हे नाते !

सौंदर्यवादी कवीच्या मनाला ओढ लावणारी बालवृत्ती केशवसुतांनाही प्रिय आहे. 'प्रौढत्वी निज शैशवास जपणे' हा बाणा त्यांना योग्य वाटतो खरं पण बालांवर उत्फुल्ल काव्य त्यांनी रचले नाही. 'म्हातारी' मध्ये 'मुग्ध मधु वाल्यी ऊरु दे' म्हणणाऱ्या केशवसुतांनी बालकविता निर्माण केली नाही.

याउलट मुलांची प्रसन्न बालवृत्ती टिपणे, मुलांबरोबर वागडेल असे गीत निर्माण करणे हे तांब्यांचे विशेष आहेत––

चिंचांच्या शेंड्यांना
वडांच्या दाढ्यांना
ओढोनी हालवी
कोण गे पालवी ?

अशा बालकुतुहलावरोवर बालसुलभ विनोदही तांब्यांनी––

तुज कंठी, मज अंगठी
आणखी गोफ कोणाला ?

असा टिपलेला आहे. चाल आणि ताल ही बालगाण्यांची मुख्य लेणी. तांब्यांची कविता भावपरिपोषावरोवर या अभिनयालाही वाव देणारी आहे.

चिव चिव चिमणी छतात
आरसा लांबे भिंतीला
चिमणी पाहे सवतीला !

अद्‌भुतता व सौंदर्य यांचा संगम 'गारुडी' मधल्या बालभूमीत घडलेला आहे.

पंख पाचूंचे मोरांना
टिपती पाखरे मोत्यांना

थोडक्यात, नाटयात्म प्रतिभेला अनुकूल आणि प्रेमवृत्तीला पोषक असे विषय निवडून तांब्यांनी उत्कृष्ट बालगीते निर्माण केली.

तांबे व केशवसुत यांत दिसणारी ही तफावत त्यांच्या व्यक्तिवैशिटयामुळे पडलेली आहे, तत्त्व भिन्नतेमुळे नव्हे. तांब्यांना केशवसुतांची आत्मनिष्ठा अहंवादी वाटते, याचा अर्थ ते आत्मनिष्ठ काव्याच्या विरुद्ध नव्हते. 'काव्यनिर्मितीतील खरे दैवत म्हणजे कवीची व्यक्तीच होय' असे मानणारे होते. संस्कृत काव्यशास्त्रात व्यक्तित्वाला असे स्थान नाही. तांब्यांची व्यक्तिनिष्ठा ही विश्वात्म पातळीवर जाणारी आहे. व्यक्तिलोपाला तांबे महत्त्व देत नाही. 'सूत्रे मणिगणाइव' असे नाते ओळखणाऱ्या व्यक्तिविस्ताराला तांबे महत्त्व देतात. केशवसुतांची 'क्लृप्ती'ची जी कल्पना आहे ती तांबे कल्पनीय शब्दाने मांडतात. वास्तव आणि कल्पनीय हे अर्धनारीनटेशाचेच रूप आहे. ती सांतानंताची एकरूपता आहे.

अपर्णा तुजविण नीरस ती
पार्वती शिलाच की नुसती
तूहि तिजवीण
देह गुणहीन
शून्य रसभिन्न !

केशवसुत क्लृप्तीला अनन्य शैली मानून काव्यात महत्त्वाचे स्थान देतात.

थोडक्यात तांबे सौंदर्यवादी परंपरेतीलच पण प्रकाशप्रेमी आनंदयात्री आहेत. प्रेमप्रतीतिधर्माचा प्रवाह त्यांनी सौंदर्यवादी विशेषांशी जुळवून आपले आगळे वेगळे स्थान सिद्ध केले आहे.

तांब्यांची ही चैतन्यमयी दृष्टी काही ठिकाणी कोमेजते. सौंदर्यवाद्याच्या वाटचाला अपरिहार्यतेने येणारी निराशा मात्र इथे नाही. कारण, दु:ख ही त्यांना स्वनिर्मितीच वाटते.

नदी लंघोनि जे गेले तयांची हाक ये कानी
इथे हे ओढिती मागे मला बांधुनि पाशांनी
कशी साहू पुढे मागे जीवाला ओढ जी लागे ?
तटातट काळिजाचे हे, तुटाया लागती धागे

ही वेदना सहजच आहे. स्वत: सृष्टी व अनंत कल्पनीय यांचे नाते गवसल्यामुळे अंतर्लीन असलेला हा कवी इतरांशी समरस होऊ शकतो. म्हणूनच त्यांची कविता अनुभव-विस्तारात्मक आहे असे वा. ल. कुळकर्णी सारख्या टीकाकाराचे मत पटू शकत नाही. संगीताचा विचार करतांनाही भावनेचा उठाव होण्याची काळजी तांबे घेतात. 'सरस्वतीचा स्वभाव संगीती आवेशाने बाहेर पडावयाचा आहे.' तांब्यांच्या काव्यातले संगीत असे अंतर्गत आहे.

तांब्यांनी गेयतेच्या प्रकृतिधर्माकरता मुद्दाम शब्द योजलेले, सजवलेले नाहीत. संगीताकरिता काव्य नाही तर काव्याकरताच संगीत आहे. म्हणून तांब्यांना गीतसंप्रदायी मानून त्यांची परंपरा आजच्या रेडीओवरील गीतापर्यंत पोचवणे बरोबर नाही. तसेच वेगळी परंपरा मानणेही बरोबर नाही. तांब्यांच्या काव्याचे बाह्य अनुकरण घडले खरे सत्वयुक्त अनुकरण त्यांची प्रेमश्रद्धा वृत्ती टिपण्यात आहे आणि ते आजतागायत घडलेले नाही. तांबे आणि केशवसुत एका परंपरेतले तरीही वेगवेगळ्या व्यक्तित्वांमुळे त्यांचे काव्यही आगळेवेगळे बनले असे मानण्यात कमीपणा कोणता ?

⊕ ⊕ ⊕

सुलभा हेर्लेकर / 'आतून बंद बेट'

श्रीधर शनवारे यांचा हा दुसरा काव्यसंग्रह. मोजवितरित सुबक बांधणीचा, नितळ अक्षरांतला आणि साध्याच पण वेधून घेणाऱ्या मुखपृष्ठातला; 'उन्ह उतरणी' या पहिल्या संग्रहानंतर जवळजवळ सात वर्षांनी निघालेला. या सात वर्षातील काळात कवीने खूप अनुभव घेतलेत समृद्धतेने आणि जगाकडे बघताना स्वतः मात्र एक आतून बंद बेट झालेत. अंतःप्रवृत्तींची दारे स्वच्छ उघडी ठेवून घेतलेले स्थळकाळाचे अनुभव, व्यक्तिविषयक अनुभव यांच्या संदर्भात घडून आलेल्या या कविता वाटतात. ही अंतर्मुखता स्वाभाविकपणे आलीय याचे मला जास्त महत्त्व वाटते. 'उन्ह उतरणी'तल्या कविता वाचताना लक्षात येते की कवी भावनेला अधिक जपून होता. थोडे हळवेपणही होते. पण या संग्रहात कवीने जगाचा अंतर्मुख होऊन विचार केला. भावना दूर सारून वैचारिकतेकडे अधिक मन झुकलेय्. त्यामुळे काव्य म्हणून 'उन्ह उतरणी'तल्या कविता मनाला अधिक भिडल्या होत्या. तर 'आतून बंद बेटा'तल्या कविता थोड्या वैचारिक म्हणून गद्य वाटल्या. परंतु कवीचा हा प्रवास लक्षणीयच ठरावा.

आपल्या विचार-भावना अभिव्यक्त करण्याची शनवाऱ्यांची पद्धती साधी व सात्विक वाटते. विविध अनुभवांच्या स्पंदनाबरोबरच स्वतःचे आत्मनिरीक्षण करीत कविता लिहिल्याने ती अंधुक बनत नाही. 'चंद्र निमित्त्यमात्र आहे; धुनी निर्माण-पात्र आहे!' म्हणजे कुठल्याही बाह्यगोष्टी या नुसत्या निमित्तमात्र ठरतात. तर 'धुनी' मधून धुंदता व निर्माण होण्याचे अस्सलत्व अधिक. सत्य आणि शब्दांची होणारी फारकत कवीला असह्य होते. या फसव्या जगात सत्य व शब्द या दोहोंच्या प्रतीक्षेत कवी आशावादी वृत्ती बाळगून आहे.

जन्म आणि मृत्यू या दोन अंतिमांतून आयुष्याच्या अस्तित्वाच्या संदर्भात कॅनव्हास रंगवताना कवी निरनिराळ्या ठिकाणी अनुभवांचे 'थांबे' घेत घेत कविता शब्दवतो, तेव्हा क्षणभर कविमन दूर गेल्यासारखे वाटते. पण लगेच कवी 'भर पावसात आसरा शोधता शोधता, सारे रान मोडून, हे कोणते नाते माझ्या कवेत आले?' (१) असा प्रश्न अत्यंत भावनातीत होऊन विचारताना दिसतो. हे नाते खरे म्हणजे कवीला पेलवतच नाहीय. कवीच्या मनाची द्विधा स्थिती आशानिराशेच्या आवर्तात भोवळून पडते की काय असे वाटते.

या आगीच्या पलीकडेही कदाचित
आगच असेल,
त्या आगीच्या पलीकडेही कदाचित
जळता फागच असेल.. (१५)

या सर्वव्यापी अनुभूतीचे ध्वनी-प्रतिध्वनी कवीच्या कवितेतून उमटले आहेत. कुठे ते क्षीण, कुठे तीव्र तर काही ठिकाणी गडद झाले आहेत. मानवी जीवनाच्या साफल्याच्या संदर्भात अंतःकरणातील हे सौंदर्यवादी मन जीवनातल्या अंतिमतेचे रूप शोधत आहे—

निदानच्या आस्तित्वाला
जर तुला जपायचे आहे
तर तेवढी खडेमिठाची कोठी लिंपून ठेव
दुहीच्या दुनियेत पुनः एकदा
मरणाची साथ आली आहे,
उरला सुरला भाकर तुकडा
तडसाने नेण्याची वेळ आली आहे! (६३)

कवीचे आशावादी मन अजूनही सौंदर्य अभिव्यक्तिसाठी प्रतिक्षिलेले आहे: सत्ये मला वेगळी भेटतात, शब्द मला वेगळे भेटतात आणि दोन्ही एकदम कधी भेटतील या अपेक्षेत अजून तिष्ठत कवी उभा राहतो. जीवनातल्या चिरंतन मूल्यांचा शोध घेता घेता कवी अस्वस्थ होतो. मरणाला झाकोळणारी उदासिनता व एक प्रकारची उत्सुकता या विषयीच्या अनुभूतीमय व्यथेतून जीवनातल्या एकटेपणाचे

दु:ख व्यथीत करते. या दु:खाचा नियंत्रक कोण ते कवीला कळत नाही 'आई मूळची कुठली हे मला माहीत नाही' असे तो म्हणतो.

पण तिच्या अत्रस उदरासहित
वस्तीला आल्यासारखे आठवते
ते हेच जंगल आणि हाच मी. (५८)

किंवा—

गाडी कुठे थांबवावी याची जागा शोधत शोधत
तो गाडी चालवत होता, माझा जीव धुक्यात होता
धुरातले गात्र पाहून घेत होता. (५९)
—ही कवीची भावावस्था होय.

जीव जन्मणे आणि नष्ट होणे या दोन्हीचे आकलन न झाल्याने किंवा जिवाचे नष्ट होणे जसे कवीला दु:खमय ठरते तसे सौंदर्याने नटलेल्या जगातला रितेपणाचा अनुभवानेही तो व्याकुळ होतो आणि लिहितो— रसद तुटलेल्या आपल्या मनाशी, बोलत बसलेल्या त्याला कुणी म्हणाले 'हा निखारा नसलेली अपंग राख चिवडतो!' व त्याला ओलांडून ते निघून जातात! (४७) विश्व आणि मानव यांच्यातल्या अजाणत्या, गूढ संबंधाचा, सुंदर विश्व आणि जीवन यांचे नाते शोधण्याचा कवीचा प्रयत्न उत्कट आहे. शब्दशैलीचा फापट पसारा न करता अचूक शब्दात कवितेतील आशय शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न उन्हउरणीपेक्षाहि सरसच झाला आहे—

सलणे सर्वांचेच फक्त ते
माझ्या बोटांना कळले
सत्य साऱ्यांचेच फक्त ते
माझ्या शब्दांतून फळले. (७८)

कवीने या प्रवासात अनुभव घेत घेत कवितेच्या आशयाची पातळी वेगळ्या थरावर विसावण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. आधिचे सौंदर्यवादी मन आता ह्याच्या तळाशी असलेले दु:ख व जीवनाची विसंगती याचा शोध घेतांना दिसते. अस्तित्वाच्या मूलभूत भावानुभावातले वास्तव हेरून घेण्याची व त्याचे रहस्य जाणण्याची तडफड या कवीत दिसून येते. इथे रोमँटिकता व रंजितता नाही. पण अभिजातता मात्र दिसून येते. पण काही ठिकाणी या अभिजातपणाच्या छंदामुळे कवितेत कृत्रिमता येते हे कवीच्या दृष्टीतून निसटलेय. उदा. 'मांजरमासा' (५२) ही कविता.

विविध अनुभवाशी झगडतांना जीवनाच्या अस्थिरतेची जाणीव, जीवन संपणार याची जाणीव, मग आत्म्याचा आत्मरत होऊन घेतलेला शोध, गाडी, दक्षिणाभिमूखी प्रश्न, श्री सूर्य इ. कवितांतून घेतलेला जाणवतो. 'गाडी कुठे थांबवावी' याचा विचार करता करताच मृत्युविषयक विचार कवी करतो. 'तुझ्या इच्छेच्या अशुभ वाडयात आणखी काही दिवस रहायचं ठरवलं आहे!' असे म्हणताना मृत्यूविषयी वाटणारे भयही दर्शित होते.

निसर्गाच्या माध्यमातून मानवी मूल्यांचा शोध घेतांना कविता उत्कट होत गेलेली आहे—

बघता बघता
झाड फुलाआड झाले
आणि अचानक देठाचे कण्हणे
त्याच्या कानी आले! (३१)

कवीचे खरे मन इथे प्रतीत होते. मृत्यूच्या क्षितिज कमानीची आणि वाळक्या झुडपांना आग लावता लावता हिरवे झाड दृष्टीआड होणे आणि एका शवाच्या रूपाने मृत्यूचे सामोरे येणे हे नाते कवीला सहन होत नाही. आत्मचिंतनपर कवितेत कवीची खोली तळाशी गेलीय तर गावीलगड, वरसाली यां सारख्या कवितांतून चित्रमय तत्वाचे आकलन दाखवलेय. कवीच्या निर्मिती प्रक्रियेत 'आपल्या वाहेरच्या जगाचा अनुभव घेणे आणि तो पुन: आपल्या आत अनुभवून आपल्या बाहेरचा वनवणे' अशी अनुभवाची कलात्मक अभिव्यक्ती काही कवितांत सहज जाणवते.

आता पलीकडच्या कुणा अज्ञात दरीतून
एखादा मळका कागद तडफडत वर येईल
आणि कफनासारखा
तिथे उडत राहील. (६०)

अशा काही ओळीतून याचा प्रत्यय येतो.

स्थलचित्रे व व्यक्तिचित्रे टिपण्याची शैली कवीची संपन्नता दर्शवते. 'उन्हउतरणी'पर्यंत शनवारे यांची कविता 'स्व'शी बांधलेली होती.

त्या 'स्व' मधून त्यांच्या कवितेचा रंग गडदपणे जाणवला तर कधी तो अपुराही वाटला! पण या 'स्व' च्या कोषातून ते चिंतनाच्या तळागारात या संग्रहात पोहचल्यासारखे वाटतात. पण कधी कधी अति वैचारीकताही रसभंग करणारीच ठरते. 'भूल' मध्ये कवी जेव्हा म्हणतो 'भूल पडली या रडणाऱ्या गवताच्या रानाला' तेव्हा कवी या जगाच्या कोषातून बाहेर पडलाय हेच सूचित करतो. आत्यंतिक वैयक्तिकता, वेदना व जाणीव यांची एकरुपता कवीला कधी कधी एकटेपण देऊन जाते. हे एकाकीपण इतके प्रचंड असते की ते कवीला अंतर्बाह्य भोवळून टाकते. त्याच मनाच्या वदंळीत विद्रूवर विद्रू पडावा तद्वत शनवाऱ्यांची कविता एकरुप होऊन त्यांच्या मनाचे महाद्वार बाहेरच्या जगासाठी खुले देखिल झालेय.

कित्येकदा दुःखभरल्या मनदेहात मृत्यू या जाणीवेलाच कवीने आपलेसे करुन घेतले आहे. आपला आकार कसा असावा याचा शोध कवी घेत राहातो. या शोधाच्या वर्तुळाला त्यांच्या अनुभवांचे किनारी कढ असतात. आणि या नव-कवीचे मन चिंतनीय गूढात हरवत जाते. ही वैचारिकता कवीच्या पुढच्या टप्याची यशस्वी वाटचाल दाखवणारी आहे असे वाटते.

'आतून वंद बेट', मूल्य १० रुपये. कविता–शनवारे, 'राधेय', गोकुलपेठ, नागपूर-१०, वितरण—मौज' प्रकाशन गृह, मुंबई–४.

⊕ ⊕ ⊕

(पृष्ठ १६० वरुन)

क्षणिक जीवन, शब्द सृष्टीचा नियंता असलेला कवी आणि चैतन्याने रसरसलेले विश्व यांच्या परस्पर मिळणीचा हा अलौकिक क्षण बींनी टिपला आहे. सामान्याचे सुखरूप हे कवीच्या अलौकिक दिव्य दर्शनासाठी बी योजतात. पण खरा नाट्यात्म अनुभव आहे तो विश्वचैतन्य आणि मी यांच्या मीलन क्षणात! नेणिवेच्याही पल्याड असलेली जाणीव रसरसून येते आणि विश्वचैतन्य म्हणजेच मी, माझे चेतन्यतत्व होय. या अनुभूती पर्यंतच्या प्रवास 'चांफा' या कवितेत झाला आहे. कोण मी? आणि कोठे दोघे जण? हा विज्ञानाधिष्ठित प्रश्न संपून जातो आणि उरतो फक्त प्रकाशाचा, तेजाचा, दिव्यतेचा, रसरसलेपणाचा दिव्य साक्षात्कार की ज्याची जात मात्र अध्यात्मप्रवण अशा बींना ईश्वरी साक्षात्कारासारखी जाणवली. म्हणून 'चांफा' मध्ये अनुनय आहे, अनुरक्ती आहे.

चैतन्याशी सत्‌कडून चित्‌कडून आनंदाकडे म्हणजेच चैतन्याच्या संवेदनागर्भ अनुभवाकडे जाण्याच्या तीन प्रक्रियांवरील 'वेडगाणे', 'पिंगा' आणि 'चांफा' या कवितेतून जाणवतात आणि त्या अनुभूतीची परिसमाप्ती होते ती दिठी दीठ मिळण्यात! केशवसुतांची दिव्य ठिणगी आणि बींच्या तेजी दिशा आटून जाणे ही एकाच जातीची आहे. बींच्या इतर कवितांचा विचार प्रस्तुत केला नाही कारण त्या काळाशी इमान राखणाऱ्या आहेत. आपल्या पूर्वजांशी आणि वंशजांशी समरस होणाऱ्या आहेत. परंतु 'वेडगाणे', 'पिंगा' आणि 'चांफा' ही बींच्या कवितेची तीन दुर्लक्ष्य शैलशिखरे होत!

⊕ ⊕ ⊕

भा. श्री. परांजपे / **नाथ परंपरेतील एक चरित्र**

प्रत्येक उत्कृष्ट चरित्र हे आपापल्या परीने स्वतःचा एक घाट निर्माण करीत असते. मराठीतील नाथसिद्धांच्या परंपरेतील चरित्रात असे काही घाट दिसून येतात. कुठे विरक्ताची जन्मजात अवधूत दशा, तर कुठे गुर्वनुग्रहाने स्थित्यानंद देण्याची आलेली शक्ती, कुठे लोकोद्धारार्थ स्वैर-संचार, तर कुठे अनुभवीयांच्या लीळांचे प्रमाण ज़ास्त. कुठे सिद्धवाणीचा प्रबल ओघ तर कुठे विशिष्ट प्रदेशात मठस्थापना, कुठे अघटित लीलांचे प्रावल्य तर कुठे समकालीन सिद्धांच्या प्रशंसेने झाकोळलेले आकाश. लीलाचरित्रापासून परवाच्या माधवनाथसंजीवनीपर्यंतच्या चरित्रग्रंथातून असे एकाहून एक आगळेपण दाखविणारे हे घाट.

ग्रंथाचा ठळक विशेष :

भंडारा जिल्ह्यातील तिरोडा येथील शहीद मिश्रा ज्यु. कॉलेजचे प्राचार्य श्री. गो. मो. कोलते यांनी आपले गुरू श्रीव्यंकटनाथ यांचे जे सुमारे साडेचारशे पृष्ठांचे प्रदीर्घ चरित्र लिहिले त्याचा घाट मात्र बराचसा संमिश्र आहे. 'नाथवाणी निकी' या सिद्धांताचा प्रत्यय त्यात येतो. तशाच 'अनुभवीयांच्या लीळां' ची गोडीसुद्धा मनाला वेधून घेणारी असते. 'अघटित नाथलीलेच्या' अद्भुत घटना आणि साधकाचे 'एकला चलो रे' थाटातील अलौकिक मार्गक्रमण दोन्ही आपापल्यापरीने आपली रमणीयता सिद्ध करू पाहतात. पण या साऱ्या गोष्टींहून अधिक चेतोहर चित्रण जर कोणते असेल तर ते श्री. कोलते यांच्या लेखणीतून पदोपदी उठून दिसणारे उत्कट गुरुभक्तीचे आविष्करण. 'मज हृदयी सद्गुरु' या सिद्धवचनाचा साक्षात प्रत्यय या चरित्रग्रंथाच्या वाचनाने येतो आणि हाच या ग्रंथाचा ठळक विशेष होय.

'बाळ सामान्य नव्हे!'

समकालीन सिद्धपुरुषाचे आणि त्यातही आपल्याला पूजनीय वाटणाऱ्या वंदनीय व्यक्तीचे चरित्र लिहिणे ही एका दृष्टीने अवघड कामगिरी असते. 'बडा विकट यह घाट' ही कबीराची उक्ती जणु या अवघडपणाची साक्ष देणारी वाटते. प्रख्यात सिद्धगुरूंच्या पूर्वायुष्याबद्दल सामान्यांना बरेच कुतूहल असते. पण त्याबरोबरच काही प्रश्नही मनात उत्पन्न झालेले असतात. चरित्र-नायक हा एक साधुवृत्तीचा पुरुष असतो. सारा जन्म लोकोपकारासाठीच तो वेचत असतो. भक्तांना ज्ञानदान वा प्रेमदान हेच त्याचे कर्तव्य असते. हे सारे या चरित्रातून आपणाला वाचायला मिळते. आणि तरीही हे चरित्र वाचत असता आपले मन सतत जागरूकपणे एक प्रश्न विचारीत असते--'हे सत्पुरुषत्व त्या चरित्रनायकाच्या अखंड साधनेतून निर्माण झालेले तपस्येचे फळ असते की अलौकिकत्वाची साक्ष देणारी ती नियतीच्या घरची पूर्वीच ठरून गेलेली खूण असते ? हे लौकिकाकडून अलौकिकत्वाकडे वाटचाल करणारे व्यक्तित्व असते की स्वयंप्रभ व स्वतःसिद्ध अशा आत्मप्रभेचेच ते अद्भुत प्रकटी-करण असते !'

श्री. कोलते यांनी लिहिलेले प्रस्तुतचे श्रीगुरु-चरित्र वाचताना हाच प्रश्न मनात उत्पन्न होतो. पण त्याचे यथास्थित उत्तर मात्र चरित्र संपूर्णतः वाचूनही मिळत नाही आणि मग लक्षात येते ते हे की अशा चरित्रातून अशी अपेक्षा बाळगणेच कदाचित गैर ठरेल. कारण खरा गुरुभक्त अशा प्रश्नांचे समाधानकारक उत्तर देऊच शकत नाही. तो नेहमी हेच सांगत राहणार की 'गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णू !' तो आम्हाला हेच पटवून देण्याचा प्रयत्न करणार की--'गुरूंच्या जन्मापूर्वीच नियती सहस्त्रमुखांनी त्यांच्या अवतारीपणाच्या खुणा पटवीत होती. या वंशातील एका मातेची कूस हिरेमाणकांची ठरणार होती' स्वतः गुरूचे

चरित्र पहावे तर ते तपश्चर्येतून, अपार कष्टातून, कठिण साधनमार्गातून आपला आकार घेत असते. टाचण्या टोचलेल्या आसनावर. . मांडी रक्तबंबाळ तरी बैठक अविचलच. ऐन दुपारच्या रणरणत्या उन्हात पाय भाजत असले तरी गुर्वाज्ञेप्रमाणे पादत्राण न घालता पाउलवाट चालत असते? चरित्रकार कोलते या कथा देतात पण त्याबरोबरच नियतीच्या पूर्वखुणाही पटवीत राहतात. ते सांगतात की कुणा गृहस्थाची उदरव्यथा बाळव्यंकटेशांना पाहताच गेली. नाथांच्या जन्माचे वर्णन करताना चरित्रकार उत्कटतेने लिहितात— 'वैनगंगेला इतकी घाई झाली की नाथजन्माची बातमी सर्व दूर पोचविण्याकरिता ती सारखी लगबगीने वाहत होती.' अर्धशिशी त्रास होणाऱ्या एका गृहस्थाचे दुखणे बाळव्यंकटेशांना जवळ घेताच थांबले. तेव्हा ते गृहस्थ नाथांच्या मातोश्रींना म्हणाले 'कृष्णाबाई आपल्या पोटी एक सत्पुरुष जन्माला आला आहे!' एक दिवस बाळ रडत होते. सद्गुरू माधवनाथांनी डोक्यावर हात ठेवताच रडणे थांबले, असे गुरुकृपेचे महिमानही ते मध्येच अभावितपणे सांगून जातात. पण लिहिण्यातील मुख्य प्रमेय म्हणजे, 'बाळ सामान्य नव्हे!'

आशयाचे गूढ :

श्रीगुरूंच्या पूर्वायुष्यातील सुमारे ९५ पृष्ठांचा भाग लिहिताना चरित्रकार रंगून गेला आहे यात शंका नाही. विशेषतः 'दत्तदर्शनाचा ध्यास' (प्र. १०) आणि 'अज्ञातवासातील दिव्य प्रसंग' (प्र. ११) ही दोन प्रकरणे उत्तम वठली आहेत. पण शैलीच्या दृष्टीने उत्कृष्ट वाटणारी ही दोन प्रकरणे क्वचित आशयाच्या दृष्टीने गूढ आणि धूसर वाटतात. तर क्वचित कळत न कळत 'नाथांच्या घरच्या उलटया खुणा' विरोधी लयीचा एक निराळाच रंग जाणवून देतात. उदाहरणार्थ दहाव्या प्रकरणात 'दत्तात्रय नाथांपुढे दत्त म्हणून उभे' असे सांगत असता त्याच लयीत चरित्रकार पुढे लिहितात. 'दत्तदर्शनाचा ध्यास घेतलेले व्यंकटेश काटयाकुटयातून गेले, डोंगरदऱ्यातून गेले.' अशावेळी वाचकाला हे कळत नाही की निजवस्तूची ओळख पटल्यानंतर मन उचंबळून आत्मानंदाची ओळख पावते की त्यानंतरही भ्रमण चालूच राहते?

ग्रंथकाराची व्युत्पन्नप्रियता :

चरित्रलेखक हे जुन्या मराठी वाङ्मयात मुरलेले असून संतवचने जणु त्यांना मुखोद्गत दिसतात. चरित्र नायकाच्या पिताजींचा स्वभाव सांगताना – 'कुलीन स्त्री आपले अवयव झाकते तसे पुरुषोत्तमबाबा आपले सत्कर्म लपवीत' असा दृष्टांत त्यांनी दिला आहे. तो 'ना तरी कुलवधू लपवी. . ' या वचनाचा अनुवाद आहे. चिकित्सक वाचकांच्या हे लक्षात येत असले तरी येथे त्यांचा विरस होत नाही. असे दृष्टांत मनोरम असतात आणि ते मूळ विषयाची गोडी वाढवितात, असाच या बाबतचा अनुभव आहे. पण कधीकधी ग्रंथकाराची ही व्युत्पन्नप्रियता अनावर होते आणि विषय बाजूला टाकून ती अशा वचनांच्या आधाराने प्रदीर्घ प्रवचने देऊ लागते. कधी कधी तर असेही दिसते की ती चरित्रनायकाला स्वतःचे काही बोलूच देत नाही— अशी तक्रार करण्याचा प्रसंग येतो तो नाथवाणीच्या संदर्भात, श्रीव्यंकटनाथ जेव्हा शिष्याशी बोलू लागतात तेव्हा ग्रंथकर्त्याची ही व्युत्पन्नता नेमकी तेथे हजर होते. चरित्रनायक स्वतःच्या गुरुविषयीचा प्रेमा व्यक्त करू पाहतात, तेव्हा तर त्यांना क्षणभर बाजूला करून चरित्रकारच पुढे होतो.

रससेवनाची बहार :

श्रीव्यंकटनाथांच्या परिवारात आर्त व अर्थार्थी, जिज्ञासू व प्रेमळ अशा सर्वच तऱ्हेच्या शिष्यांची मांदियाळी जमलेली दिसते. या गुरुभक्तांचे जे अनुभव श्री. कोलते यांनी सादर केले आहेत त्यातून चरित्रनायकाचे स्वयंप्रभ तेजोवलय तर दिसतेच पण त्यापेक्षाही त्यांची शिष्याविषयीची अपार वत्सलता जाणवते. प्रस्तुत ग्रंथातील १७ व्या प्रकरणापासून ४२ व्या प्रकरणापर्यंत या भागात 'अघटित किती ही नाथलीला' याचा जसा प्रत्यय येतो तसाच 'महाराज ही माझी श्रद्धा आहे' या गुरुभक्तांच्या मनोगताचा उलगडा होतो. गुरूंचे वात्सल्य व शिष्यांची उत्कटभक्ती दाखविणारी

(पाहा पृष्ठ १९९)

विमल भालेराव / **सोबत**

सोबतची महती अनन्यसाधारण आहे, याचा अनुभव प्रत्येकाला बाळपणापासून येतो. बाळपणापासून प्रत्येकाला कशाची ना कशाची सोबत हवी असते. त्या निमित्ताने आधार हवा असतो. स्वतःच्या दुबळेपणाला टेकू हवा असतो. लहानपणी एखादे भावंड किंवा एखादा शेजारी सोबत म्हणून खेळायला लागतो. नसलंच कुणी तर एखादा दगड, विटेचे तुकडे, बांगडीचे काच, एखादे खेळणे चांगली सोबत करू शकते. हीही साधनसामग्री नसली तर हे बाळजीव स्वतःशीच बोलून स्वतःला रिझवितात. आरशातील स्वतःचे प्रतिबिंबही त्यांना चांगली सोबत करू शकते. ते आपले मनोगत त्यालाच ऐकवितात. 'असे का होते. ?' तर या बाळजीवांना बोलायला कुणीतरी हवे असते. ती त्यांची एक मानसिक गरज असते. त्याला आपले हृद्गत व्यक्त करायला कुणाची तरी सोबत लागते.

सोबतची गरज लहानपणापुरतीच मर्यादित असते. मोठेपणी कोणी सोबत नसले तरी चालते असे नाही. तर मोठेपणीही माणसाला सोबतीची तितकीच गरज असते. वय वाढले तरी वृत्ती कायम असते. जग बदलले आहे. रामराज्याची शांतता नष्ट झालेली आहे. यांत्रिक युगात मानवी मनाला चाकाची गती आलेली आहे. सतत तोल जाणाऱ्या परिस्थितीच्या तालावर तो नाचत असला तरी त्याचे 'मन' तेच आहे. त्याच्या रागलोभादी भावना आदिम आहेत. अन्न, वस्त्र व निवारा या गरजा आदिम आहेत, तशीच सोबतीची गरजही आदिमच म्हणावी लागेल ! लहानपणी, मोठेपणी सोबत ही लागतेच ! किंबहुना लहानपणापेक्षा मोठेपणी सोबतीची गरज अधिक नितांत होऊन बसते, असे म्हटल्यास वावगे होऊ नये. लहानपणी दगड, धोंडा, आरसा, बाहुली, बांगडीचे काच, विटकरीचे तुकडे यांसारख्या निर्जीव वस्तूंची सोबत चालते. परंतु मोठेपणी या निर्जीव वस्तूंची सोबत तोकडी पडते. एकेकाळी ज्या वस्तूंनी त्याला तासनतास रिझविलेले असते, सोबत केलेली असते त्या आता कुचकामी ठरलेल्या असतात. मोठेपणी त्याला चालतीबोलती सोबत हवी असते. नावडती सोबत मिळाली की अपेशी तडजोड सुरू होते. कारण बेगडी माया फार दिवस तग धरू शकत नाही. कधी ना कधी तिला तडा जातोच. मोठेपणी माणसाला आपल्या बरोबरीची व आपल्यासारखी चालती बोलती सोबत हवी असते. ही अट थोडी शिथिल होऊ शकेल. पण सोबत मात्र चालती बोलती हवी. याला काही अपवाद सापडतील पण ते फारच थोडे ! हाताच्या बोटांवर मावणारे !

ही सोबत निरनिराळ्या तऱ्हेची असू शकते. कधी ते गुरु-शिष्य असतील, कधी पिता-पुत्र असतील, केव्हा प्रियकर-प्रेयसी असतील, केव्हा पती-पत्नी असतील, कधी बहीण-भाऊ तर केव्हा ही सोबत मित्रत्वाची असेल ! असे का व्हावे ? माणसाला एकटयाला का राहता येऊ नये ? तर प्रत्येक माणूस कुठे ना कुठे कच्चा असतो. कोणाचं तरी बळ त्याला पाठीशी हवं असतं. "आता आम्हीं मोठे झालो. आमचे निर्णय आम्ही घेऊ शकतो." असे माणूस म्हणतो पण ते म्हणणं फार वरवरचं असतं, ती एक पोकळ समजूत असते. ती माणसाची भूल असते. आपल्या 'हो' ला त्याला कुणाची तरी दाद हवी असते. दुजोरा हवा असतो. कुणाचं तरी अनुमोदन हवं असतं. कुणाचा तरी ताकदवान होकार हवा असतो. त्या निमित्ताने आपण घेतलेला निर्णय बरोबर आहे हे सांगणारा सोबती हवा असतो. स्वैर जगून मिळणारं सुख अनेकदा धोकादायक ठरतं. अविचाराची पावलं नेहमीच अधीर असतात. जीवनाचे भकास, भडक व

उद्रेकी आविष्कार पाहण्यास, जीवनानुभवांना सामोरं जाण्यास माणसाला सोबत हवी असते.

सोबत अनेक कारणांसाठी लागते. कधी आपलं म्हणणं ऐकून घ्यायला श्रोता लागतो. त्या निमित्ताने काही काळापुरती सोबत लागते. माणसाला आपले अनुभव दुसऱ्याला सांगितल्या-वाचून चैन पडत नाही. हे सर्वच अनुभव मोलाचे असतात असे नाही. कितीतरी वारक्यासारख्या, छोट्या-छोट्या निरर्थक गोष्टी आपण एकमेकांना सांगत असतो. ही माणसाची प्रवृत्ती आहे. तो त्याचा जन्मदत्त स्वभावच आहे. लेखकाला आपलं लिखाण दुसऱ्याला वाचून दाखविल्याशिवाय चैन पडत नाही. त्याशिवाय आपल्या लिखाणाचं चीज झालं असं वाटत नाही. श्रोत्यांची दाद ही कुठल्याही कलावंताची भूक असते. तिच्या तृप्तीसाठी तो सतत धडपडत असतो.

कित्येकदा कामासाठीही सोबत हवी असते. गप्पागप्पांत हातातली कामे चटकन निसटतात. पापड, शेवया अशी तासन्तासाची किचकट अन् चिकट कामे करायला बायका चारचौघींना सोबत बोलावितात. एकटीला ही कामे कंटाळवाणी होतात. चार हातांची सोबत त्यासाठी लागते.

केव्हा केव्हा लांबलचक रस्ता चालायलाही कुणाची तरी सोबत हवी असते. लांबलचक रस्ता चालता बोलता लवकर संपतो. कसा संपतो ते कळतही नाही. तीच वाट एकट्याने चालतो म्हटले तर "अजून चालतोची वाट...!" असे होऊन जाते.

प्रवासातही कुणाची तरी सोबत हवी असते. आपली नजर ओळखीचा चेहरा शोधतच असते. सोबत मिळाली तर केवढा आनंद होतो. बोलण्यावोलण्यात स्टेशनामागून स्टेशनं उलटतात. प्रवासाचे क्लेश जाणवत नाहीत. पाणी पिण्यास, स्टेशनवरची शोभा पाहण्यास वा अन्य काही कारणास्तव खाली उतरले तरी सामानाची काळजी राहत नाही. प्रवास सुखद होतो.

कधी गरज असते ती हक्काच्या, कायमच्या सोबतीची! जिच्याजवळ आपलं मन मोकळं करता येईल, आतडीकातडी उलगडून दाखविता येतील, आतल्या आत कोरून कुरतडून उध्वस्त करणाऱ्या साकळलेल्या दुःखांनाही जेथे आवाज मिळेल, शिवाय शब्दांची अर्थकक्षा सांभाळण्याची गरज उरणार नाही, बोलताना मनावर कुठलाही ताण येणार नाही, अशी सर्वस्वी आपल्या माणसाची सोबत लागते.

केव्हा केव्हा सोबतीला एखादे पुस्तक, रेडिओ चालतो. बरेचदा माणसे कोणी सोबत नसले तर स्वतःशीच बुद्धिबळे, पत्ते खेळताना आढळतात. पण अशा प्रकारची सोबत पसंत करणारी माणसे फार मोजकी असतात.

काही परिस्थितीत मनाची, आपल्या विचारांची सोबत पुरेशी होते. एखादी वाईट गोष्ट घडली आणि सहानुभूतीचा, समजुतीचा ओलावा कुठूनच मिळत नसला—कुणाचीच सोबत नसली तर आपले मनच आपली समजूत घालते. आपल्याला सोबत करते. "जाऊ दे! यातून काही चांगले निष्पन्न व्हायचे असेल!" मन शांतावते. आपलाच आपल्याला दिलासा मिळतो.

रात्र पडली आहे. सगळीकडे अंधारच अंधार ठासून भरला आहे. पण रस्ता चालून न्यायचा आहे. जीव थरथरला आहे. हातापायातील जीव गळून जाण्याची पाळी आली आहे. मग मनातल्या मनात रामनामाचा धावा सुरू होतो. ही रामनामाची सोबत त्याला मानसिक बळ देते, घरी पोचविते.

प्रत्येक माणसाला कशाची ना कशाची सोबत लागतेच! कारण त्याला एकट्याला करमत नाही. कंटाळा येतो. जीव नकोसा होतो. एकाकीपण खायला उठतं. काही काळ माणसाला एकटं राहायला आवडेल पण नेहमीच नाही. कारण 'सोबत हवी' ही माणसाची आदिम वृत्ती आहे. आपल्याला कोणाची तरी सोबत आहे हा विचारच माणसाला भरभक्कम बळ देऊन जातो. त्यामुळे जगण्यास आवश्यक तो दिलासा मिळतो. अशी आहे किमया "सोबतीची!"

⊕ ⊕ ⊕

"अे ! ऊठ ना !" ती साडीला लागलेलं गवत झटकत होती. बऱ्याच दिवसांनी साडी नेसली होती. ती साडीत सुरेख दिसायची. पण तिला जीन आणि पोल्काडॉटेड् शर्टस् आवडायचे.

"बस ग अजून जरा वेळ ! किती वर्षांनी बागेत आलोय !"

"आधीच उशीर झालाय, बघ ना किती वाजले !" तिने मला घड्याळ दाखविले. खरंच खूपच उशीर झाला होता. आजकाल ती घरी गेली की मला काही सुचायचंच नाही. मग मी अभ्यास कसा करणार ?

"तू माझ्या रूमवर येऊन बसून रहाशील ?"

"कशाला ?"

"अभ्यासातून कंटाळा आला की मी तुझ्याकडे बघत राहीन !"

"आणि माझ्या अभ्यासाचं काय ?"

"तूही अभ्यास कर ! आणि आर्टस्‌ला असा काय अभ्यास असतो ?"

"मग तूच का नाही आर्टस् करत ! अभ्यास करायला नको !"

"तू विषय बदलू नको ! मी अभ्यास करताना समोर बसशील !"

"तुझ्या खोलीवर येऊन !"

"हो !"

"तू असंच का करीत नाहीस ?"

"कसं ?"

"तूच आमच्या घरी येत जा अभ्यासाला ! आणि हो तुला एक महत्त्वाची गोष्ट सांगायलाच विसरले. काय गाढव आहे रे मी !"

"त्याबद्दल मला कधीही शंका नव्हती ?"

"म्हणजे मी अितकी का गाढव आहे ?"

"तू फक्त 'काय गाढव आहे रे मी' असं म्हणालीस, तुझ्या गाढवपणाची डिग्री सांगितली नाहीस !"

"हे असलं बोलणं मला कळत नाही !"

"म्हणजे तू किती प्रमाणात गाढव आहेस ते सांगितलं नाहीस. तुझ्या गाढवपणाचं मापन कसं करायचं ? ते सांगितलं नाहीस. व्हिस्कीच्या बाटलीवर फॉर्टी प्रुफ, सिक्स्टी प्रुफ असं लिहिलेलं असतं; तशी तू किती गाढव आहेस ते कुठं लिहिलंय ?"

"मी काय व्हिस्कीची बाटली आहे का ? तू लौकर करना M. Sc. मग लेक्चरर हो ! चांगलं लेक्चर दिलंस !"

"तू व्हिस्की पेक्षाही भारी आहेस. हंड्रेडपर्सेंट अल्कोहोल ! आणि विद्यापीठ परीक्षा ठेवतं किंवा पुढं ढकलतं म्हणून, नाहीतर आजही अेमेस्सी होतो."

"तू कित्ती छान बोलतोस रे !"

"पण तू मला काही तरी सांगणार होतीस ना, महत्त्वाचं, विसरलेलं !"

"अय्या ! काय गाढव आहेरे मी ! काल गम्मतच झाली. मी दोन दिवस विसरले, पण आजही नको ना रे !"

"काय आहे ते लौकर सांग ! फालतू कटकट !"

"चिडतोस कशाला ?"

"मग काय तुझ्या पाया पडू, बाई माझे, मला गम्मत सांगेपर्यंत तुझे पाय सोडणार नाही म्हणून !"

"पण आता घरी जायला हवं, चल ! जाता जाता सांगते." आम्ही निघालो.

"तू रागावलास की सुरेख दिसतोस ! आणि विनोदीही बोलतोस !"

"तू मूर्ख आहेस !"

"खरंच तू माझ्या पाया पडलास तर काय गम्मत येईल नाही ?"

"मी तुझ्या पाया पडू, कशाला ?"

"मग अडलंय माझं खेटर ! तुला गम्मत सांगायला !"

"यू आर गोअिंग बॅक ऑन युवर वर्डस् !"

अनुक्रमणिका

"काय 'गोॲिग बॅक' केलंस रे" ?

"आपण घरी जाताना तू मला गम्मत सांगणार होतीस !"

"मग तू गम्मत सांगायच्या आधी माझ्या पाया पडणार होतास !"

"हुड्‌त् ! बापाच्या पाया नायं पडलो कधी !"

"बघ आता हू अिज गोंॲिग बॅक ?"

"तुझ्या डोक्यात भेजा नावाची चीज आहे का ?"

"चिडायला काय झालं ?"

"मग मी शुद्ध मराठीत 'मग काय तुझ्या पाया पडू का ?' असं औपरोधिक सुराने विचारलं होतं याचा अर्थ मी पाया पडीन असा होत नाही !"

"तुझ्या प्रश्नाचं उत्तर मी 'हो ! पड पाया' असं दिलं असतं तर ?"

"दिलंस का ? ही पश्चात बुद्धी काय कामाची ?"

"तू सायन्सला असून कसे जडजड शब्द वापरतोस रे !"

"बरं बाअी, ही अक्कल मागून सुचून काय कामाची !"

"आता बरं वाटलं ! अय्या, समोरनं बाबाच येतायत् की !"

"मग आता ?"

"तीच तर गम्मत !"

मी स्तब्ध. तिचे बाबा येताहेत. ठीक आहे मी. दाताखाली ओठ दावतो. "स्साला, बघू काय होतंय ते !"

"डॅडी, हा रंजन, मी तुम्हाला काल सांगितलं तो !"

"हॅलो, हौडूयूडू !"

"ग्लॅड टू मीट यू, सर !" अैन वेळी आमचे दगा देणारे मॅनर्स पण आज ते उपयोगाला आले होते.

"आमच्या घरी निघालात की काय ?"

"हो, आधी रविवार ठरला होता, पण हाच म्हणाला शुभस्य शीघ्रम् !" तिने हा बॉम्ब टाकला. मी असं काहीच म्हणालो नव्हतो.

"मी असं कुठे म्हटलं ? आणि तू रविवार-बद्दलसुद्धा काही बोलली नव्हतीस !" सत्य सदा बोलावे सांगे गुरु आणि आपुला बाप ! या वचनाच्या आधारावर मी बोललो. तिने डोळे मोठे करून माझ्याकडे बघितले. "पण आत्ता आलास तर काय बिघडलं !"

"तुम्ही तुमचं भांडण उरकून घ्यायचं बघा ! मला जरा जायचंय ! आज मंगळवार. आपण शुक्रवार वर वाद तोडू ! आय शॅल बी अेक्स्पेक्टिंग यू ऑन फ्रायडे ॲट सेवनथर्टी अिनद अिव्हिनिंग !" तिचे बाबा मी काही बोलायच्या आत म्हणाले.

"ओह, यस सर, थॅंक्स अलॉट !"

"आय ॲम मेकींग धिम अ क्राउड, काय ?" असं म्हणत ते चालायला लागले. आता आम्ही दोघं अेकमेकांच्या कंपनीला. "गुड नाईट सर !" मी म्हणालो.

"गुड नाईट, चिरिओ !" असं म्हणत ते पुढे निघून गेले.

"नालायक नाहीतर, काय वाट्टेल ते बोलतेस !"

"मी काय बोलले", तिच्या डोळ्यांत हसू होते. मला चिडवल्यावर आणि त्यात यशस्वी झाल्यावर नेहेमी असते तसे.

"गळा दाबून जीव घेईन, हसतेस काय ?"

ती आता खो खो हसू लागली.

"तू आता माझ्यावर चीड, बोलला नाहीस तरी चालेल. तुला आता शुक्रवारी आमच्याकडे यायलाच हवं !"

"अडलंय माझं खेटर !"

"म्हणजे बाबांना सुद्धा तू टांग लावणार ?"

"टांग लावणार हा शब्द तुझ्या तोंडात शोभत नाही !"

"हॅं ! त्याला काय झालंय ?"

"मला हे अजिबात आवडत नाही !"

"तुला आवडलं न आवडलं तर मला काय त्याचं ! तुला शुक्रवारी यायलाच हवं !"

"तुला मी अखेरचं विचारतोय तू मला काय ते सांगणार आहेस की नाहीस !"

"नाही सांगत जा !"

"मग तुझा माझा संबंध संपला! मागच्या वेळेलाच मी तुला सांगितलं होतं मला हे असं आवडत नाही!"

"म्हणूनच मला तू आवडतोस!"

"रोहिणी, मी तुला कैक वेळा सांगितलंय.."

"बरं बाबा सांगते आधी राग गेला म्हण!"

"असा काय म्हणून राग जातो का?"

"मग कसा जाईल?"

"तू फालतू वेळकाढूपणा करू नकोस! मला घरी जायला उशीर होईल!"

"घरी गेल्यावर माझी सासू तुला कुठं उलथला होतात असं विचारेल, अेवढंच ना?"

"हो ना, ते तर... थांब, काय म्हणालीस!"

"हा ऽहाऽऽऽहा! कशी गम्मत झाली."

"रोहिणी, काय म्हणालीस, परत म्हण ना!"

"आता गेला वाटतं राग!"

"पण, थांब जरा, मला पाणी दे!"

"आता गम्मत अैकायला हवी!"

"ओह गॉड्! पण आपण या विषयावर कधी बोललेलो नाही, तरी!"

"तू माझ्याशी लग्न करशील का? हा फेमस प्रश्न विचारला नाही आपण, मी तुला किंवा तू मला!"

"करेक्ट, पण तू हे ठरवलंस कसं?"

"त्यात काय? मी बाबांना आणि आईला म्हटलं मी लग्न ठरवलंय!"

"मग ते काय म्हणाले!"

"ते नेहेमीच म्हणायचे, तू लग्न ठरवलंस तर परस्पर करू नकोस आम्हांला आधी कल्पना दे!"

"ते चेष्टेनं झालं ग! पण तू त्यांना लग्न ठरवल्याचं सांगितल्यावर ते काय म्हणाले?"

"तोही नेहेमीचाच प्रश्न! मुलगा कसा आहे?"

"मग तू काय म्हणालीस!"

"दुष्ट, रागीट, नालायक आहे! सिग्रेट ओढतो!"

"हलकट लेकाची!"

"शिव्या देतो!" डोळ्यांतले ते अवखळ हास्य दिव्याच्या प्रकाशात चमकणारे!"

"तरी ते हो म्हणाले!"

"तरीसुद्धा तू त्याच्याशी लग्न ठरवलं असलंस तर त्याच्यात नक्कीच काही गुण असणार!"

"आता मी नाही म्हणालो तर?"

"तू म्हणून तर बघ!"

"समजा म्हंटलं तर!"

"तुला पुन्हा रोहिणीशी बोलतासुद्धा येणार नाही!"

"काय?"

"थोडं चुकलं?"

"काय?"

"तुला पुन्हा तुझ्या रोहिणीचं नखसुद्धा दिसणार नाही!"

"मग मी अिथे उभा राहून भिकाऱ्याच्या वेशात, मुकेशच्या आवाजात गाणं म्हणीन!"

"हिंदी पिक्चरसारखं!"

"माझा लोक अिथे पुतळा उभारतील!"

मग आम्ही खदखदून हसलो उगीचच! आणि तो दुसरा दिवस.

रोहिणी तिच्या आवडत्या पंजाबी ड्रेसमध्ये. शुक्रवार होऊन गेलाय. आमच्या आओवावांचं नि रोहिणीच्या आईवाबांचं जोडा लक्ष्मी नारायणांचा यावर एकमत झालंय. परीक्षा संपली की लग्न हेही नक्की झालंय.

आम्ही पूर्वीसारखे एकमेकांना भेटतोय. पिक्चरला जातोय. उशीर झाला तर घरची मंडळी गालातल्या गालात हसताहेत. दिवस मजेत चाललेत अशापैकी तो दुसरा दिवस. अनेक दिवसांपैकी.

सुरवात नेहेमीप्रमाणेच. "मग तू येणार नाहीस तर?" तिने विचारलं होतं.

"नाही, मला अभ्यास आहे!"

"पण चल ना रे!"

"अेकदा सांगून समजत नाही का!"

"पण मग त्यांना काय वाटेल!"

"त्याच्याशी माझा काय संबंध?"

"तू येणार नाही म्हणून तर त्यांना वाईट वाटेल ना!"

"मग माझ्या सोर्या गैरसोर्या आधी का नाही विचार केला. रोहिणी तुला मी कैक वेळा सांगितलंय परस्पर कांही ठरवत जाऊ नकोस म्हणून!"

"पण मी तरी काय करणार? ते म्हणाले तुझं अेवढेसुद्धा अैकणार नाही का तो?"

"मी असं करतो यावर्षी परीक्षा वगैरे सोडून देतो नि तुमच्या सर्व भंगार नातेवाईकांच्या पाया पडायला येतो."

"माझे नातेवाअीक भंगार काय?"

"प्रश्नच नाही, साला कुणीतरी लांबच्या आत्याच्या मावस भावाच्या चुलत मेव्हणीचा चुलता त्याच्याकडे चहाला जायचं का तर तो फॉरेनहून आला."

"मग मोठे आहेत ते!"

"आजकाल कुणीही टिनपाट माणूस फॉरेनला जातो.!"

"मग तू का नाही गेलास!"

"मला कधीही असं आतून वाटलं नाही, जाअीनही पुढे मागे!"

"आपण जाताना स्वित्झर्लंडला जाअू, झुरिच वगैरे बघू! फार सुरेख आहे म्हणत होते काका!"

"बाय दॅट टाईम माझ्याकडे काळा पैसा साठला तर झुरिचलाही जाअू!"

"काकांचा पैसा काळा काय?" तिने माझा हात झिडकारत म्हटले. ती खुर्चीपासून दूर झाली."

"मी असं म्हटलं का?" मी तिचा हात धरून तिला परत आणलं नि खुर्चीत वसवलं.

"रोहिणी, ऊद्या माझं सेमिनार आहे; मला तयारी करायचीय! तू इथेच वसून रहा!" मी हनुवटी तिच्या डोक्यावर घासली. दाढीच्या वाढलेल्या खुंटांत तिचे केस अडकून ओढले गेले.

"शी! माझा भांग विस्कटला की!"

"विस्कटला, हे बघ आता तुझ्या बरोबर यायचं म्हणजे दाढी करायला हवी, उद्यासाठी राखून ठेवलेल्या पँटची ईस्त्री मोडायला हवी आणि तिथे जाऊन ऐकायचं काय तर 'तिकडे म्हणजे काय बुवा, इकडे अगदीच ह्यं!' हेच ना! मला त्याचा कंटाळा येतो."

"तू काही बोलू नकोस! मी जाते!"

"चाल्कीम कुठे वस! आणि लिपस्टिक लाव् नको म्हणून किती वेळा सांगायचं!"

"चांगलं दिसतंय आज, काकूने आणलंत, तिकडून."

"पण त्याला चव चांगली नाही!"

"शी, नालायक, ओठावरून जीभ काय फिरवतोस!"

"माझ्याच फिरवली ना! आणि पावडरचा वासही काहीतरीच आहे! तू मेकअप न करताच चांगली दिसतेस!"

"असू देत, तुझ्या सिग्रेटच्या तोंडाचा वास किती घाण येतो! शी, ओकारी येते नुस्ती!"

"कोरडी!" आणि तिने मारलेली पर्स मी धरून ठेवली. मग आम्ही नुसतेच वसून राह्यलो. गुटुर्ऽऽगुम करणाऱ्या पारव्यांसारखे.

तिसऱ्या दिवशी खूपच खूप पाऊस होता. सकाळ उजाडलीच नाही. दाट पावसाचा पडदा, सूर्याच्या सहस्र रश्मींपैकी अेकही रश्मी त्या पडद्याला भेदून पृथ्वीवर येऊ शकत नव्हता, अशी गच्च दमट सकाळ होती ती. आणि रात्रसुद्धा. मला पीअेच्. डी. साठी फेलोशिप मिळाली होती. आम्ही सिनेमा बघितला होता.

आता ती पुढच्या वर्षी अेमे होणार होती की मग लग्न. मी त्या पावसाकडे बघत अस्वस्थ झालो. घरी खुशालीचं पत्र लिहिलं, सिग्रेट ओढली. वाचनात लक्ष लागेना! कॉटवर पडलो. पुन्हा उठलो. कॅलेंडरवरची तीनचार जुनी पानं फाडली. नव्या महिन्याचे दिवस बघितले. परत चहा प्यायलो. शी!. बोअर व्हायला झालं, चपला घातल्या. रेन कोट घेतला सायकल काढली. निघालो कुठे? हं! अर्थात रोहिणीकडे!

"मला वाटलंच तुम्ही याल म्हणून?"

"कां? रोहिणी आत्ताच तुमच्याकडे गेली."

"मग मला नाही दिसली?"

"रिक्षाने गेली; येईलच ती!" या श्रीमंतांच्या पोरी म्हणजे. पण थोडं डोकं चालवलं असतं तर ती खोली उघडून बसली असती! मी तर तिला किल्लीच देणार होतो पण हरवेल म्हणाली. तुफान

वेगाने सायकल हाणीत मी खोलीवर पोचलो. ती नव्हती. आत आली चिठ्ठी "मी येऊन गेले. तू नव्हतास बस् अेवढंच. परत फिरलो. यावेळेस भेट झाली. बाय धिस टाईम मी चिंब ओला नि मग पाऊस थांबला. तिच्या खोलीत तिची साडी लुंगीसारखी लावून बसलो. अंगावर तिचाच नाईट गाऊन. तिने आलं घालून चहा आणला. नि मग माझं रूप बघून हसू लागली.

"तू माझ्याकडे आणि मी तुझ्याकडे" ती हसता हसता म्हणाली.

"रूमवर का थांबली नाहीस !"

"हिंदी पिक्चरमधली घोटाळा व्हायची सिच्युएशन होती ना !"

"अेवढा माझ्यावर विश्वास नाही !"

"आमची आजी म्हणायची, आगीशेजारी लोणी नि बाओजवळ पुरुष पाघळतातच !"

"तुझी आजी चतुर होती !"

"माझीच आजी ती !"

"हॉऽऽ हॉऽऽ हॉं !"

"अेऽऽ आपण भांडायचं का ? बऱ्याच दिवसात भांडलो नाही !"

"कां आज रडायचंय वाटतं ?"

"हो आणि मग तुझ्या कुशीत शिरायचंय, तुझ्याकडून डोकं थोपटून घ्यायचंय !"

पण मग भांडायला विषयच सुचेना ! खूप विषयांवर सुरवात केली पण या विषयांवर भांडण झालं तरी होतं किंवा त्यांत आम्हाला गोडी वाटत नव्हती. मग मी चिडलो. "काहीतरी फालतू आयडिया काढतेस बघ !"

"माझ्या आयडिया तेवढ्या फालतू ! तुझ्या फार ब्राईट !"

"ही भांडायची आयडिया तरी नक्कीच फालतू होती. काय मस्त दिवस आहे म्हणे आपण भांडू !" तोंड वेंगाडत मी म्हणालो.

"पुन्हा तू असं चिडवलंस ? मागे काय म्हणाला होतास !"

"पण त्यावेळेस मी मूर्खासारखं बोलणार नाही असं तू म्हणाली होतीस."

मी काय आत्ता मूर्खासारखं बोलले काय ?"

"मग काय शहाण्यासारखं बोललीस काय ?"

तिच्या आईने जेवायला हाक मारली. जेवताना आमचं भांडण चालूच होतं. तिचा भाऊ म्हणाला, "माझा शर्ट दिला असता मी तुम्हाला !"

"हं ! मग त्यात गम्मत काय ऱ्हायली ?"

"आता कोण आचरटासारखं बोललं !"

"विनोद समजला नाही की त्याला आचरट-पणा म्हणायचं काय ?" यानंतरचे आमचे भांडण माझ्या शिकांत बुडून गेले. मग तिने माझ्या छातीला गळ्याला नाकातून आतून बाहेरून, कपाळाला व्हिक्स लावले "मी पण लावू का तुला व्हिक्स !" यावर गालावर चापट मारून ती निघून गेली. मी तिच्याच अंथरुणावर तिच्या पांघरूणात झोपी गेलो. उठलो तेव्हा तापाने फण-फणलेला. ती माझ्या उशाशी. खोलीत बदला-बदल. हँगरला माझे कपडे. ती दुसऱ्या खोलीत रहायला गेली. वंडरफुल सेवा केली आणि डॉक्टर गेल्यावर रडली. "मी भांडण करू या म्हणायला नको होतं रे !"

सासू-सासरे, मेव्हणा अर्थात भावी. हरतऱ्हेची औषधं. मग आईबाबा आले. टायफॉईड हा रोग अेकंदरीने त्रासदायक पण मी तो अेंजॉय केला. बरा झालो.

या आजारपणातही बऱ्याच स्मृतींना उजाळा मिळाला. उदाहरणार्थ आमची पहिली भेट. तिनेहून मला दिलेली रॅकेट. त्यामुळे मी जिंकलेली चॅंपियनशिप ! तिने मला पद्धतशीर जाळ्यात खेचलं होतं. माझ्या रॅकेटचं रबर अैन वेळेस काढून टाकलं होतं. आणि वर माझ्यासाठी तरी जिंकायला हवं असं सांगितलं होतं.

माझ्यात तू पाहिलंस तरी काय ? या प्रश्नाला मात्र तिच्या जवळ उत्तर नव्हतं म्हणा. या व अशा अनेक गोष्टी. मी बरा झालो. परत खोलीवर जाऊन राहू लागलो. तिसरा दिवस संपला.

चवथा दिवस नहायचा ! हे पूर्वापारचं सत्य आहे. कावळा शिवो की न शिवो. तसाच तो दिवस आमचा ! नहायचा ! अेकमेकांच्या प्रेमांत. धर्मानं मला तिच्या कौमार्यभंगाची

अनुक्रमणिका

परवानगी दिल्यानंतरचा. चारचौघांच्या साक्षीने आमचं लग्न झाल्यावरचा. इतके दिवस आवरलेल्या भावनांचे बांध फोडायचा. त्या रात्री इतर लोक करतात तेच आम्ही केलं. त्याला महत्त्व नाही. म्हणजे इतरांच्या दृष्टीने. 'माझ्या आणि तिच्याही आयुष्यातील तो अवर्णनीय अनुभव त्याचं वर्णन कसं करायचं' त्या दिवशी आम्ही एकमेकात बुडून गेलो. सामावलो एकरूप झालो. वगैरे वगैरे. तो चौथा दिवस नहायचा !

आता पाचवा दिवस 'जायचा' 'जायचा' म्हणजे वर जायचा नव्हे तो यायचा ! दिवस जाणे हे न्हायल्यावर ओघाने येणे. अेक नैसर्गिक तार्किक क्रिया. अमूक केलं की अमूक होतं वगैरे वगैरे. मग तिची खूप काळजी घेणं आलंच. दर महिन्याला वजन, नाव नोंदविणे. डॉक्टर सर्व ठीक आहे म्हणेपर्यंत देवाचा धावा करणे. औषधं आणणे. फिरायला जाणे. वाढत्या पोटाकडे कौतुकाने बघणे. डोहाळजेवणात भाग घ्यायला पाठवणे. जास्त खाऊ नकोस. पथ्य सांभाळ हे सर्व या गेलेल्या दिवसाचे. आपल्या स्वतःच्या कर्तृत्वाचे कौतुक न्याहाळायचा हा दिवस. स्वतःच स्वतःवर खूश व्हायचा दिवस. बंद मुठीत आपलीच बोटे लपवून मधले बोट ओळखलेस तर मुलगा नाहीतर मुलगी असे खेळ खेळायचे ते याच दिवशी. आठव्या महिन्यात प्रवास करायचा नाही. अमक्या दिवशी तमुक करायचे नाही. ग्रहणात शिवणकाम करायचे नाही. उपास लागेल पण तो सोडायचा कसा ? आणि मग तिने माहेरी रहायला जाणे आपण तळमळणे. एक वंडरफुली अनोखा दिवस. या पाचव्या दिवसानंतर सहावा दिवस व्हायचा. हाच तो महत्त्वाचा दिवस. ज्यात स्वतःला काहीच करायचं नसतं. परमेश्वराने पहिल्या पाच दिवसात सूर्य, तारे, पृथ्वी, वनस्पती, समुद्र, पाणी, पशू, पक्षी निर्माण केले आणि सहाव्या दिवशी आपले सर्व कौशल्य पणाला लावून त्याने मानवाला जन्म दिला तोच हा सहावा दिवस ! आतुरतेने वाट पहायचा. मुलगा झाला की मुलगी. पेढे की बर्फी ! आम्हांला पार्टी हवी बुवा ! नाव काय ठेवणार ! हरकत नाही पहिली बेटी धनाची पेटी ! वगैरे. सहावा दिवस हा कामाचा शेवटचा दिवस. पुढची पिढी आता सुरू.

सातवा दिवस विश्रांतीचा. अशातऱ्हेने सृष्टीतील सर्वांत श्रेष्ठ निर्मिती झाल्यावर परमेश्वराने आपल्या या पुत्राला पृथ्वीवरील नंदनवनात सोडले आणि आपले सर्वच्या सर्व हात झटकून पँटीला किंवा जे काय वस्त्र उदाहरणार्थ पितांबर वगैरे असेल त्याच्या बुडाला पुसले आणि च्यायला ! "थकलो बुवा !" असे म्हणून त्याने विश्रांती घेतली तो हा दिवस. याच दिवशी त्याला आपल्या पुत्रासाठी स्त्रीची निर्मिती करावी लागली जे हेत्ते कालाचे ठायी यानंतर परमेश्वर थोड्याच वेळात झोपला आणि घोरू लागला. त्याने परत डोळे म्हणून उघडले नाहीत.

मग सध्या सृष्टीचा कारभार बघतं कोण ? माननीय श्री परमेश्वर यांनी नेमलेले अधिकारी. आता परमेश्वर उठणं शक्य नाही म्हणून ऑन बिहाफ ऑफ द परमेश्वर बाय द ॲथॉरिटी व्हेस्टेड इन देम बाय द परमेश्वर ते आपापल्या कुवती प्रमाणे कारभार हाकतात. त्यांच्या ऑफिसात वेगवेगळे तक्ते टांगलेले असतात नि सात दिवसांचे ब्लूप्रिंट्सही असतात.

मी त्यांना विचारतो "अहो, पण हे तुम्ही जे मला सांगितलंत तसं घडत नाही आहे ! कुणी लौकर मरतोय, कुणाला कॅन्सर होतोय, कुणाचं दिवाळं निघतंय, कुठे अत्याचार घडताहेत, युद्ध तर रोजच, खून, मारामाऱ्या, भ्रष्टाचार वगैरे सतत चालू आहेत."

"याचं कारण ते लोक देवाला अभिषेक करत नाहीत, दक्षिणा ठेवत नाहीत".

"असं म्हणता का तुम्ही ? मग मला आता हे सगळ्यांना सांगायलाच हवं पण का हो ममजा सगळ्यांनी अभिषेक केले तर या गोष्टीप्रमाणे सर्वत्र आबादीआबाद होईल का ?"

"व्हॉट नॉन्सेन्स. ते एक ॲब्हरेज चित्र आहे. गोळा बेरीज. त्रास देऊ नका बघू आता. मला आता कामं आहेत." तो फायलींची चाळवाचाळव करीत. शेजाऱ्याला म्हणाला. "नॉन्सेन्स साला, हे पृथ्वीवरील परमेश्वराचे पुत्र फार त्रास देतात! सुखी जीवन दिलं तर दुःख शोधत हिंडतात !"

"हो ना ! त्याच्या सहकाऱ्याने उत्तर दिले" आणि दोघेही फायली पांघरून परमेश्वराप्रमाणेच निवांत झोपी गले. सॉरी, त्यांनी समाधी लावली.

"नॉन्सेन्स, नॉन्सेन्स, नॉन्सेन्स" झोपेतही त्यांच्या श्वासांतून त्यांच्या परमेश्वराचे नाव निघत होतेच. मी मग शांतपणे निघून आलो. या सृष्टीला संदेश द्यायला मला ठाउक आहे ते अैकून सगळे जण म्हणणार आहेत. 'सिली नॉन्सेन्स' पण तेच सत्य आहे.

बोला नॉन्सेन्स महाराज की जय !

⊕ ⊕ ⊕

वा. वि. मिराशी / **रामगुप्ताची मनोव्यथा**

परवाची गोष्ट. नागपूरच्या 'युगवाणी' मासिकाचा जून-जुलै, १९७८ चा जोड अंक दुपारी येऊन पडला होता. तो रात्रीचे भोजन झाल्यावर बिछान्यावर पडून वाचू लागलो. वाचता वाचता डोळा लागला. झोपेत असता एक राजपुरुष समोर उभा असलेला दिसला. त्याचा पोषाख गुप्तकालातल्या सारखा होता. पण मुद्रा खिन्न दिसली. मी त्याला नाव गाव विचारून खिन्नतेचे कारण विचारले. तेव्हा तो म्हणाला, "संशोधक महाशय, मी आपणांस अपरिचित नाही. आपण आपल्या संशोधनाने माझ्याविषयी सत्यस्थिती प्रकाशात आणून माझ्यावर महान् उपकार केले आहेत.[१] पण आता माझ्यावर एक मोठे संकट कोसळू पाहत आहे. त्यातून मला वाचवा". मी त्या संकटाविषयी विचारले, तेव्हा तो म्हणाला, "तुमच्या नागपूरात श्री. बाळकृष्ण दाभाडे नावाचे थोर कलाभिज्ञ व 'नामूलं लिख्यते किंचित्' या बाण्याचे संशोधक आहेत. त्यांनी[२] असा शोध लावला आहे की माझी पुतणी प्रभावतीगुप्ता ही विष्णुभक्त होती, पण रामभक्त नव्हती. आणि याचे प्रमाण म्हणून त्यांनी असे दाखविले आहे की तिने आपल्या मुलांची नावे 'दिवाकरसेन' आणि 'दामोदरसेन' अशी ठेवली होती. ती रामभक्त असती तर तिने त्यांची नावे 'रामसेन'सारखी रामनामांकित ठेवली असती. आता उद्या ते असाही निष्कर्ष करतील की, मी माझे वडील पराक्रमाङ्क परमभागवत महाराजाधिराज समुद्रगुप्त यांचा पुत्र नसून मी त्यांच्या निधनानंतर त्यांचे राज्य बळकाविले होते. मी त्यांचा पुत्र असतो तर त्यांनी माझ्या जन्मप्रसंगी भगवान विष्णूचे एखादे नाव मला ठेवले असते. तेव्हा त्यांचे अकाटय अनुमान हे राहील की मी दुसऱ्या कोणाचा तरी पुत्र असून विष्णुभक्त समुद्रगुप्त महाराजांच्या निधनानंतर त्यांच्या पुत्रांना दूर सारून मी त्यांची गादी बळकाविली होती. माझ्या चारित्र्यावर हा मोठा कलंक होईल. तसेच माझे गुप्तवंशीयत्वही असिद्ध होईल. ते माझ्या अभिमानाचे स्थान आहे. त्यांच्या या उपद्व्यापामुळे मी अतिशय खिन्न झालो आहे."

प्रातःकाळी जागा झाल्यावर मला त्या स्वप्नाची आठवण झाली. आणि मी त्या 'युगवाणी'च्या अंकातील "प्रभावतीगुप्तेची व्यथा" हा लेख पुनः काळजीपूर्वक वाचला. तेव्हा आपण आपल्या वाकाटकविषयक संशोधनात अक्षम्य चुका केल्या एवढेच नाही तर 'आपल्या प्रमेयास उपोद्बलक, नसणाऱ्या गोष्टी चातुर्याने टाकून' इतिहासातील व्यक्तीला विकृत स्वभावात रंगविले याची जाणीव झाली. हे आक्षेप भयंकर आहेत. गेल्या चाळीस वर्षांत सत्यापलापाचा आरोप कोणीही केला नव्हता. तेव्हा त्याचे कठोर परीक्षण करून सत्य काय आहे हे पाहिले पाहिजे.

श्री. दाभाडे यांचे मुख्य निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.––

(१) प्रभावतीगुप्तेचा ऋद्धपूर ताम्रपट, ज्यावर आमच्या रामटेकवादाची भिस्त आहे, तो बनावट आहे. कारण (१) त्याच्या आरंभी राजमान्यतादर्शक 'दृष्टम्' शब्द नाही; आणि (२) ज्या ब्राह्मणांना त्या ताम्रपटात उल्लेखिलेले दान दिले होते त्यांची नावे नाहीत.

(२) प्रभावतीगुप्ता ही 'भगवद्भक्त' म्हणजे विष्णुभक्त होती. तिने आपल्या प्रभावाने आपल्या पतीला भगवान् विष्णूचा उपासक बनविले होते. ती रामभक्त होती असा कोठेही उल्लेख नाही. तिची दाने प्रबोधिनी एकादशीसारख्या विष्णुभक्तांना पूज्य वाटणाऱ्या तिथींसच दिली होती. एकही दान रामनवमीस दिले नव्हते.

---

१. संशोधनमुक्तावलि (सं. मु.), सार ६, पृ. १२२ इ.; सर ८, पृ. १४० इ.

(३) तिने आपल्या मुलांची नांवे 'दिवाकरसेन' आणि 'दामोदरसेन' अशी ठेवली होती. ती 'रामसेन'सारखी रामनामांकित नाहीत.

तेव्हां श्री. दाभाड्यांचा निष्कर्ष हा की, ऋद्धपूर ताम्रपट बनावट आहे आणि प्रभावती-गुप्ता ही विष्णुभक्त होती, रामभक्त नव्हती. ही चर्चा उकरून काढण्याचा अन्त:स्थ हेतु हा की कालिदासाच्या 'मेघदूता'त वर्णिलेला रामगिरी रामटेक नसून मध्य प्रदेशाच्या पूर्वीच्या सिरगुजा संस्थानातील 'रामगड' होय.

आता आपण या प्रमाणांचे चिकित्सक परीक्षण करू.

पहिला प्रमाणाचे परीक्षण

(१) 'दृष्टम्' हा शब्द पूर्ण झालेल्या ताम्र-पटांच्या आरंभी आढळतो हे खरे आहे. दुर्ग व बालाघाट येथे सापडलेल्या वाकाटकांच्या ताम्र-पटांतील अपूर्ण लेखांच्या आरंभी तो दिसत नाही. पण त्यावरून तो शब्द जेथे आढळत नाही तो ताम्रपट बनावट आहे असे सिद्ध होत नाही. तो न आढळण्याची कारणे अनेक असू शकतात. यासारखेच दुसरे एक उदाहरण पाहा. 'सिद्धम्' हा मंगलवाचक शब्द वाकाटकांच्या बहुतेक ताम्र-पटांच्या आरंभी आढळतो, पण द्वितीय प्रवरसेनाच्या शिवनी ताम्रपटाच्या[2] आरंभी तो आढळत नसल्या-मुळे तो ताम्रपट बनावट असे कोणी मानीत नाही. लेखकाच्या निष्काळजीपणामुळे पुष्कळदा कोरीव लेखांत चुका राहून जातात. याचा अनुभव तसल्या लेखांचा अभ्यास करणाऱ्यांस अनेकदा येतो. आम्ही अशी अनेक उदाहरणे आपल्या संशोधनपर लेखांत दिली आहेत. एक दोन नमुन्यादाखल देतो. नाशिक येथील शदावंशी उषवदाताच्या लेखात 'कुशणमूल' असा शब्द आला आहे तेथे 'कुशलमूल' असे पाहिजे.[3] 'कुशणमूलाने' गेली पन्नास-पाउणशे वर्षे विद्वानांना चकविले होते. दुसरी अशीच चूक अलीकडे आमच्या नजरेस आली आहे. काठेवाडातील मूलवासर येथे एका वाणिजक नामक गृहस्थाने स्वत:च्या मित्राकरिता प्राणार्पण करणाऱ्या आपल्या पुत्राच्या नांवाने यष्टि (स्मारकशिला) उभारली, पण निअवर्गील लेखात त्या मुलाचे नावच घातले नाही[4] ! केवळ काही मजकूर गाळल्यानेच चुका होतात असे नाही. काठेवाडातील मेवामा येथील यष्टिलेखात लेखकाने एक ओळ पुन: लिहिल्यामुळे विद्वानांना गेली पन्नास वर्षे भ्रमात टाकले होते. ती चूक आम्ही नुकतीच दाखवून दिली आहे. तेव्हा ऋद्धपूरच्या ताम्रपटात आरंभी 'दृष्टम्' शब्द नसल्यामुळे आणि दान दिलेल्या ब्राह्मणांची नावे गळल्यामुळे तो ताम्रपट बनावट ठरत नाही.[5] तो प्रसिद्ध झाल्यावर गेल्या पन्नास वर्षांत त्याला कोणी बनावट म्हटले नाही. त्यातील 'रामगिरि-स्वामिन: पादमूलात्' हे रामगिरीवरील राम-चंद्राच्या पादुकांचा उल्लेख करणारे शब्द आपल्या प्रमेयास गैरसोईचे असल्यामुळे त्या ताम्रपटाला बनावट म्हणणारे श्री. दाभाडे हेच पहिले संशोधक !

ऋद्धपूर ताम्रपट बनावट मानला तरी रामटेक-द्योतक 'रामगिरि' श्री. दाभाडे यांचा पिच्छा सोडणार नाही. कारण चार वर्षांपूर्वी मांढळ येथील उत्खननात सापडलेल्या द्वितीय पृथिवीषेणाच्या ताम्रपटात त्या ठिकाणाचा उल्लेख 'रामगिरि-स्थानात्' असाच केला आहे.[6] रामगिरीवर ज्याच्या पादुकांची पूजा केली जात होती तो भगवान् रामचंद्रच असला पाहिजे हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे.

---

२. वाकाटक नृपति आणि त्यांचा काल, पृ. २२५ इ.

३. सं. मु. सर ८, पृ. २२५ इ.

४. डी. आर. भांडारकर व्हॉल्यूम, पृ. १७५.

५. एखादा ताम्रपट बनावट आहे काय हे ठरविताना त्याची लिपी, त्यातील वंशावळ, त्यातील कालनिर्देश करण्याची पद्धती ही लक्षात घ्यावी लागतात. या बाबतीत ऋद्धपूर ताम्रपट मुळीच संशयास्पद नाही.

६. विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक, १९७७, पृ. १६.

दुसरा प्रमाणाचे परीक्षण

(२) प्रभावतीगुप्ता भगवद्भक्त म्हणजे विष्णुभक्त होती, रामभक्त नव्हती, असे श्री. दाभाडे म्हणतात.[७] पण राम हा विष्णूचाच अवतार ना? गुप्त-कालीन कवि कालिदास 'रघुवंशा'च्या दहाव्या सर्गात भगवान् विष्णूने देवांची प्रार्थना ऐकून आपण पृथ्वीवर अवतार घेऊ असे त्यांना आश्वासन दिल्याचे वर्णन करतो. प्रभावती-गुप्तेचा पुत्र द्वितीय प्रवरसेन आपल्या 'सेतुबंध' काव्यात रामाचे विष्णुरूपाने वर्णन करतो. (सेतुबंध, २, ३८; ६, १० वगैरे गाथा पाहा). गुप्त कालात विष्णूच्या अनेक अवतारांची देवालये होती. राम व कृष्ण यांत भेदभाव केला जात नसे. प्रवरसेनाने आपल्या मातेकरिता प्रवरपुर (सध्याचे पवनार) येथे बांधलेल्या देवालयाला लावलेल्या शिल्पपट्टांपैकी काही रामावतारातील तर काही कृष्णावतारातील होते हे आता माहीत झाले आहे. किंबहुना, तेथे श्री. विनोबाजींच्या आश्रमाच्या परिसरात गौतम बुद्धाची सुंदर मूर्ती सापडली आहे. तेव्हा प्रभावतीगुप्ता विष्णुभक्त होती, रामभक्त नव्हती, असा कीस काढण्यात अर्थ नाही.

रामगिरीवर (रामटेक येथे) भगवान् रामचंद्राच्या पादुका नसून विष्णूच्या होत्या हे सिद्ध करण्याकरिता श्री. दाभाडे यांनी जी प्रमाणे पुढे मांडली आहेत ती हास्यास्पद आहेत. त्यांतले एक प्रमाण हे की रामटेकच्या देवळात जाण्याकरिता जो मुख्य दरवाजा लागतो त्याला 'गोकुळ दरवाजा' असे सध्या नाव आहे. आत रामाची मूर्ति असती तर त्याला 'अयोध्या दरवाजा' असे नाव पडले असते. दुसरे प्रमाण हे की सध्या गोकुळ अष्टमीला आतील मूर्तीच्या पदकमलांचे दर्शन घेण्यास भाविक लोक जातात.[८] तेव्हा आतील मूर्ती रामाची असणे शक्य नाही. ही प्रमाणे वादाकरिता मान्य केली तरी त्यांवरून आतील पूर्वीची मूर्ति कृष्णाची होती असे फार तर म्हणता येईल. ती विष्णूची होती असे अनुमान करता येणार नाही म्हणजे 'भक्षितेऽपि लशुने न शान्तो व्याधिः ।' असा प्रकार झाला!

वास्तविक रामटेकच्या देवळात कोणत्या देवाच्या पादुका प्राचीन काळी पूजिल्या जात होत्या हे सध्याच्या लोक समजुतीवरून ठरविणे योग्य होणार नाही. वाकाटकांच्या काळाला आता दीड हजार वर्षे झाली. तत्कालीन परिस्थिती सद्यःकालीन समजुतीवरून ठरविणे शक्य नाही. कालान्तराने जनसामान्यांच्या समजुतीत बदल घडून येतो. एक उदाहरण देतो. नाशिक जवळच्या टेकडीत कोरलेली काही उत्कृष्ट बौद्ध लेणी आहेत. त्यांना तेथील लोक 'पांडव लेणी' म्हणतात. त्यांतील भगवान् बुद्धाच्या मूर्तींना ते धर्म, भीम, अर्जुन अशी नावे देतात. दाभाडयांची तर्कपद्धती अवलंबिली तर प्राचीन काळी ती लेणी पांडवांनी कोरविली होती असे म्हणावे लागेल. रामटेकच्या गोकुळ दरवाज्यावरून काढलेले निष्कर्ष या प्रकाराचे आहेत.

---

७. 'भगवत्'पदाने केवळ विष्णु निर्दिष्ट केला जात नाही. ते विशेषण विष्णूचे विविध अवतार, शिव, जिन व बुद्ध यांचेही असू शकते. पतंजलीच्या महाभाष्यात 'शिव-भागवताः' याचा अर्थ 'भगवन्तं शिवमुपासते ते' असा दिला आहे. तेव्हा 'भगवत्' पदाने विष्णूच्या अवतारांचाही उपासक दर्शविला जातो.

८. याविषयी आम्ही रामटेकला काही काळ राहिलेले आमचे स्नेही श्री. आ. रा. देशपांडे यांना त्यांनी स्वतः रामटेकास जाऊन आणि तेथील पुजाऱ्यांना भेटून याविषयी चौकशी केली. त्यांचे उत्तर या लेखाच्या शेवटी दिले आहे. त्यावरून हे स्पष्ट दिसेल की रामटेकच्या राम-मंदिरातील मूर्ती रामाचीच असून काही कृष्णभक्तांच्या करिता कृष्णजन्माष्टमीस तिला कृष्णाचे रूप उत्सवापुरते दिले जाते. त्यावरून पुरातन काळी ही मूर्ति कृष्णाची मानली जात असे, असे अनुमान काढणे म्हणजे सूताने स्वर्गास जाण्यासारखे आहे.

प्राचीन काळी रामगिरीवर (रामटेक येथे) कोणत्या देवाचे देवालय होते हे ठरविण्याकरिता सध्याच्या जनसमजुतीचा पोकळ आधार घेण्याची जरूरी नाही. त्याला भक्कम पुरावा उपलब्ध आहे. रामटेकचे प्राचीन नाव 'रामगिरी' होते हे श्री. दाभाडे कबूल करितात. त्याचा स्पष्ट उल्लेख रामटेकच्या लक्ष्मण देवालयातील रामदेवराव यादवकालीन ख्रिस्तोत्तर तेराव्या शतकातील शिलालेखात (ओळ ४५) आला असल्यामुळे तो कबूल केल्याशिवाय त्यांना गत्यन्तर नाही. तेच नाव वाकाटकांच्या ऋद्धपुर व मांढळ या ठिकाणी मिळालेल्या ताम्रपटांत आले आहे. 'रामगिरि' या नावावरून तेथील देवालय भगवान् रामचंद्राचेच असले पाहिजे हे कोणीही निराग्रही मनुष्य कबूल करील. गुप्त-वाकाटककालीन कवि कालिदास (ख्रिस्तोत्तर सुमारे सन ४००) तेथील पर्वताचे 'वन्द्यैः पुंसां रघुपतिपदैरङ्कितं मेखलासु'[१०] असे वर्णन करतो. त्यावरून तेथे श्रीरामचंद्राच्या पूज्य पादुकांचे देवालय होते हे सुस्पष्ट आहे. पूर्वोक्त यादवकालीन शिलालेखात रामटेक येथील अनेक देवळांचे उल्लेख आले असले तरी तेथील मुख्य देवालय रामचंद्राचेच होते हे तो लेख वाचणाऱ्यास स्पष्ट दिसेल. त्याच काळात गुजराथेतून या स्थळाच्या यात्रेकरिता आलेल्या महानुभावपंथसंस्थापक श्रीचक्रधरांच्या प्रवासवर्णनाच्या स्थानपोथीत रामटेक येथील राम व लक्ष्मण यांच्या देवळांचे व सीतेच्या न्हाणीचे सध्याप्रमाणेच वर्णन आहे.[११] हे सर्व उल्लेख विदर्भ संशोधन मंडळाने वीस वर्षांपूर्वी प्रसिद्ध केलेल्या 'मेघदूतातील रामगिरि अर्थात् रामटेक' या पुस्तकात आढळतील. या भक्कम पुराव्यासमोर 'गोकुळ दरवाजा' आणि 'कृष्णजन्माष्टमीचे पादुकादर्शन' यांवर आधारलेले श्री. दाभाड्यांचे तथाकथित विष्णु देवालयविषयक तर्कट कितपत टिकते हे वाचकांनी ठरवावे.

प्रभावतीगुप्ता रामभक्त असती तर तिने आपले ताम्रपट प्रबोधिनी एकादशीस न देता रामनवमीस दिले असते असे श्री. दाभाडे म्हणतात. त्यांना विचारावयाचे की तिचे सर्व ताम्रपट त्यांस मिळाले आहेत काय? आतापर्यंत तिचे फक्त दोन ताम्रपट— पुणे व ऋद्धपूर येथे सापडलेले—प्रसिद्ध झाले आहेत. ते दोन्ही कार्तिक शुद्ध द्वादशीस प्रबोधिनी एकादशीच्या उपवासाच्या पारण्याच्या प्रसंगी दिले होते. प्राचीन काळी रामभक्त लोक एकादशी तिथि पवित्र मानीत नसत अशी श्री. दाभाड्यांची समजूत झालेली दिसते. त्यांनी लक्ष्मणाच्या देवळातील यादव-कालीन लेखामधील एकादशीविषयक — विशेषतः कार्तिक महिन्यातील एकादशीविषयक पुढील श्लोक पाहावे—(ओळ ४२)[१२]

एकादशीवासरवासभाजां तीर्थे शुभार्थे दशकण्ठशत्रोः ।
मुक्तिर्वराकी करपञ्जरस्था करोति सेवां गृहसारिके व ।।
यत्कार्त्तिके मासि नरो निमज्ज्य श्रीरामतीर्थे दशकंधरारिम् ।
भक्त्या प्रपश्येन्न शरीरकोशे कीटत्वमायाति तदन्तरात्मा ।।

या शिलालेखात रामनवमीचा उल्लेख नाही, पण कार्तिकी एकादशीचा पवित्र तिथि म्हणून निर्देश आहे. तेव्हा प्रभावतीगुप्तेने त्या तिथीस ग्रामदान केले म्हणून ती विष्णुभक्त होती, रामभक्त नव्हती, असे अनुमान करता येणार नाही.

प्रभावतीगुप्तेने रामनवमीस दिलेला ताम्रपट आतापर्यंत मिळाला नाही, पण तिने दिलेली दोन्ही दाने रामगिरि येथे भगवान् रामचंद्राच्या पादुकांसमोरच केली होती हे तिची रामभक्ति सिद्ध करण्यास पुरेसे प्रमाण आहे.

तिसऱ्या प्रमाणाचे परीक्षण

(३) प्रभावतीगुप्तेने आपल्या मुलांस 'रामसेन यासारखे नाव कसे ठेवले नाही' असे श्री. दाभाडे विचारतात. त्याला उत्तर हे की प्राचीन काळचे लोक आपल्या मुलांस आपल्या इष्ट देवतेचीच नावे ठेवीत नसत. हे अनेक उदाहरणांवरून दाखविता

---

९. मेघदूतातील रामगिरी अर्थात् रामटेक (मे. रा. अ. रा.), पृ. ९६.
१०. मेघदूत (सं. का. वा. पाठक), श्लो. १२.
११. मे. रा. अ. रा., पृ. ११४.
१२. पूर्वोक्त, पृ. ९६

येते. समुद्रगुप्त परमभागवत म्हणजे विष्णूचा निष्ठावान् उपासक होता. त्याने आपल्या मुलांचे नाव 'रामगुप्त' ठेवले होते हे आता सिद्ध झाले आहे. तो रामगुप्त त्याचा पुत्र नसून त्याने त्याच्या निधनानंतर त्याचे राज्य अन्यायाने बळकावले होते असे मानण्यास काडीचाही आधार नाही. त्याच्याप्रमाणे त्याचा पुत्र द्वितीय चंद्रगुप्त हाही परमभागवत होता, पण त्याने आपल्या मुलाचे नाव 'कुमारगुप्त' असे कार्त्तिकेयद्योतक ठेविले होते. आश्चर्याची गोष्ट ही की प्रभावतीगुप्ता रामभक्त होती, असल्यास तिने आपल्या मुलांची नांवे रामद्योतक कशी ठेवली नाहीत असे विचारणारे दाभाडे तिने स्वत: विष्णुभक्त असूनही त्यांची नावे दिवाकरसेन व दामोदरसेन अशी अनुक्रमे सूर्यद्योतक व कृष्णद्योतक कशी ठेवली हे सांगत नाहीत. आपल्या विधानांतील 'वदतो व्याघात' त्यांना जाणवत नाही !

तेव्हा 'आपल्या प्रमेयास उपोद्बलक नसणाऱ्या गोष्टी कोण टाळतो आणि ऐतिहासिक व्यक्तींना विकृत स्वभावात कोण रंगवितो' हे वाचकांनीच ठरवावे.

गेल्या चार-पाच वर्षात निरनिराळ्या कालिकांत विपर्यस्त लेख लिहून श्री. दाभाडे यांनी रामटेक पक्षावर टीकेची झोड उठविली आहे. सामान्य वाचकांचा बुद्धिभेद होऊ नये म्हणून त्यांच्या विनवुडाच्या आक्षेपांना उत्तर द्यावे लागते. 'मेघदूतात वर्णिलेला रामगिरी रामटेक होय' हे प्रमेय आता दृढमूल झाले आहे. त्याला सर्व विश्र्वात संशोधकांची संमति मिळाली आहे." ते तुमच्या पोकळ आक्षेपांनी विचलित होणार नाही, असे त्यांस स्नेहभावाने सुचवून हा प्रदीर्घ लेख समाप्त करतो.

१३. पूर्वोक्त, पृ. ११–७–१८ वर उद्धृत केलेली रा. ब. का. ना. दीक्षित, डॉ. काशीप्रसाद जायसवाल, डॉ. अ. स. अळतेकर, प्रा. नीळकंठ शास्त्री आणि रमेशचंद्र मुजुमदार यांचे याविषयी अभिप्राय पाहा. अलीकडे (सन. १९७६ मध्ये) गोहट्टी युनिव्हर्सिटीचे माजी कुलपति प्रा. कृष्णकान्त हांडिकी यांनीही प्रवरसेनाच्या सेतुबंधकाव्याच्या इंग्रजी भाषांतराच्या प्रस्तावनेत (पृ. २३) हेच मत व्यक्त केले आहे.

(आमच्या चौकशीस श्री. आ. रा. देशपांडे, कवी अनिल यांचे उत्तर खाली दिले आहे)

दिनांक १–१०–७८

मी रविवार दिनांक २ सप्टेंबर, १९७८ ला सोलापूरच्या काही स्नेह्यांना रामटेक दाखविण्यास गेलो होतो. संध्याकाळी सध्याचे राममंदिराचे मुख्य पुजारी श्री. पंडे यांची भेट घेतली आणि राममंदिरात गोकुळ अष्टमीला श्रीकृष्णजन्माच्या वेळी काय करतात व प्रथा काय आहे हे विचारले. त्यांनी सांगितलेली प्रथा अशी—

रामटेक परिसरात विशेषत: शेतकरी, गवळी, गवारी इत्यादी लोकांत गोकुळ अष्टमीला कान्होबा बसविण्याची प्रथा आहे. हा दोन दिवसांचा उत्सव असतो व तो गणपति उत्सवासारखाच थाटाने साजरा करतात. नवमीस मिरवणुकीने कान्होबाच्या मूर्तीचे विसर्जन करतात.

कृष्णजन्म राममंदिरात तसेच गोकुळ दरवाजाच्या आत वेगळे कृष्णमंदिर आहे, तिथेही साजरा होत असतो. त्या दिवशी राममंदिरातल्या रामाच्या मूर्तीलाच बाळकृष्णाचे रूप देण्यात येते, त्या मूर्तीची वेषभूषा अशी करण्यात येते की तो बाळकृष्णासारखा दिसावा. त्याचे पूजन त्या दिवशी कृष्ण म्हणून करण्यात येते. मंदिरात प्रस्तरावर कोरलेल्या अचल पादुका नाहीत. पूर्वी कधी असतील तर त्यांवर मूर्ती स्थापन केल्या असाव्या. आता चांदीच्या पत्र्याने मढवलेल्या खडावासारख्या चल-पादुका आहेत. त्या कृष्णजन्माष्टमीला कृष्णाच्या पादुका समजल्या जातात. अशी ही प्रथा आहे.

मी स्वत: असा प्रकार मेहेकर येथील शारंगधराच्या देवळातही पाहिला आहे. मूळ शारंगधराच्या मूर्तीला मत्स्यजयंतीच्या दिवशी मत्स्यावताराचे रूप दिले होते.

गोकुळ दरवाजा हे गोपुरद्वार असावे. ते वर गोपुरासारखे आहे. 'गोपुर'चे 'गोकुळ' झाले असावे.

आ. रा. देशपांडे

⊕ ⊕ ⊕

योगेन्द्र मेश्राम / हाडाचा लेखक

एक हाडाचा लेखक. शुद्ध, जातिवंत. हाडाचा ! लोक त्याला उगीच वेडा म्हणतात. वेडे ! लेखक वेडा असतो, हे काय सांगायला पाहिजे ? कशाचे तरी वेड लागल्याशिवाय लेखक तो कसला ? . .त्याचं साहित्य-जगात किती मोठं नाव होतं, हे लोकांना कोणी सांगायं !

त्या लेखकाला मरणाचे फार आकर्षण. फार म्हणजे फारच. 'आपुल्या डोळां'— आपल्या नव्हे, लेखकालाच काय, कोणाही माणसाला आपल्या मरणाचे आकर्षण म्हणजे मरण्याची ओढ म्हणजे आवड किंवा म्हणजे उत्सुकता वगैरे कशी असणार ? अर्थात स्वत: मरायची आवड वा उत्सुकता त्याला नसून दुसऱ्याचे मरण अनुभवण्या-पाहण्याची उत्सुकता त्याला लागलेली.

दुसऱ्या कुणाचेच मरण त्याने अद्यापपर्यंत पाहिले नव्हते, असे नाही. समाजाचे मरण— कशाला, घरातलेच आपल्या आजोबांचे नरम नरम बिछान्यात हूं का चूं न करता आलेले मरण, आजोबां-हूनही भाग्याची वर्षापूर्वी झालेली बापाची मौत त्याने प्रत्यक्ष पाहिलेलीय. तो देहाने दु:ख देऊन गेला पण मेल्यासारखा मेलाच नाही, याचेच दु:ख त्याला अधिक झाले होते. त्याला असे सुवासिक 'रेडिमेड मरण' नकोय.

तो जातिवंत हाडाचा लेखक असल्यामुळे एखाद्याच्या मरणाचा म्हणजे तो मरतानाच त्याला प्रत्यक्ष अनुभव हवाय. तो अनुभव मिळाला तर आपल्या संशोधनातून कदाचित मृत्यूवर विजय-सुद्धा मिळविण्याची प्रेरणा शरीर विज्ञान-शास्त्र-ज्ञांना मिळावी, हा त्याचा उद्देश असावा.,. . . मनुष्य मरतो, पण तो कसा मरतो ? हाच त्याला अलीकडे ध्यास लागलेला. आता हे स्वत: मरून पाहिल्याशिवाय कसे कळायचे ? छे, हेही चूकच. मेल्यावर मरून पहायचे—पहाणार कोण ? मग लिहिणार कोण ? मरण पहायला जिवंत राहायलाच हवं.— त्याचा हा बिनतोड तर्क. एकंदरीत त्या लेखकाला (आप) 'मरण्याचे' आकर्षण नसून (पर) 'मरणाचे' होते.

मरण म्हणजे इतरांना मरणवत् दु:ख देणारी गोष्ट. म्हणून मरणारा साऱ्यांना दु:ख देऊन स्वत: मात्र सुखी होतो, असे म्हणतात. ते सुखबिक कोणते ते त्या मृतात्म्यालाच ठावं किंवा त्याच्या भुताला ! पण मरण म्हटलं की सर्वात मोठं दु:खात दु:ख ! तेव्हा मरण स्वत: कसं असेल,— तर खूप मोठं— अशुभ—भयानक ! भयंकर यातना वेदना शरीराला देऊन जाणारा असं असावं, अशी त्याची कल्पना.

या त्याच्या कल्पनेप्रमाणे दुर्योगाने आतापर्यंत त्याला असले कुठलेच मरण पहायला भेटलेले नाही. . पण हे कसे ? मनुष्य मरतेवेळी तडफडतो, धडपडतो ते जिवंत राहण्यासाठीच की ! ती जिवंत असतानाची जिवंतपणाची यातना झाली. मरणाची मरतानाची कुठेय ? मरण्यासाठी मरणाची ती तडफड थोडीच असेल ? पण हा तर्क अधिक ताणणे त्याला उगीच वाटते. मरण म्हणजे दु:ख. दु:ख म्हणजे यातना. यातना म्हणजे . . . बस, माणूस तडफडून तडफडून मरत असताना पहायचंय आपल्याला. त्या एका अनुभवासाठी ! हे त्याचे उच्च ध्येय.

तो असामान्य लेखक हे खरंय. ईश्वर अध्यात्मा-वर त्याचा तसा विश्वास कमी. अर्थात तो विज्ञानवादी बुद्धिवादी लेखक. म्हणून 'माणूस आणि माणसाचे जीवन-वास्तव' हा त्याच्या लेखनाचा विषय. आतापर्यंत मनुष्याच्या जन्म आणि जीवनावर त्याने लिहिलेले वाङमय जगात इतके गाजले की, इतके गाजले की. . .विशेषत: त्याच्या जीवनकथांनी सगळ्या विद्वान साहित्यि-कांचे लक्ष वेधलेलेय. त्याची एकेक कथा म्हणजे जीवांच्या हाडामासाने, स्नायूंनी, प्राणपेशींनी

गुंफलेली, श्वासांनी विणलेली—मानवी—जीवनाचे जिवंत जाळेच ! तिचा विशेष म्हणजे गूढता, गांभीर्य, रहस्यमयता. लेखकाने एकेक धागा कथेतून अशा खोलवर नेऊन गुंफलेलाय, की— ती अजूनपर्यंत कुणालाच पूर्ण उलगडलेली नाही, अगम्य-गूढ अशा ईश्वर स्वरूपासारखी ! ती पूर्ण उलगडता आली तर ह्या जगाचे व जीवनाचे एका नव्या ज्ञानाचे दालन हाती लागल्याविना राहणार नाही, असा त्याच्या असामान्य कथा-साहित्याची समीक्षा करणाऱ्या असामान्य टीका-कारांचा अभिप्राय आहे.

हा जीवनाच्या जाणिवेतून त्याने केलेला यशस्वी वाङमयीन प्रयास. आता जीवनान्तराचा म्हणजेच मृत्यूच्यानंतरच्या अज्ञात भागाचा थांग घेण्या-करिता मृत्यूच्या रहस्यापासूनच त्याने सुरुवात केलेलीय. हा त्याच्या अचाट प्रतिभेचा जीवनाच्या नेणीवेतून उड्डाण करण्याचा महान कलायत्न. त्याची ही जाणीव नेणीवेच्याशोधा'ची भाषाच सामान्यांना आकळत नसे. पण त्याच्या मते नेणी-वेचा हा शोध म्हणजे विज्ञानामागच्या विज्ञानाचा आजवर अघटित असा आविष्कार त्याला घडवावयाचाय. तो विज्ञाननिष्ठ लेखक ना ! म्हणूनच अति दु:खमय, अति अगम्य अशा 'मरणाचा' अनुभव त्याला हवा आहे.

त्यासाठीच तो जीवाचे रान करून गेल्या कित्येक दिवसांपासून सारखा शोधात आहे.. रंजल्या गांजलेल्या, संसाराला विटलेल्या, उध्वस्त झालेल्या दलित-पीडित लोकांमध्ये, झोपडपट्टीतून गल्लीबोळातून आणि मजुरांच्या चाळीचाळीतून तो सारखा वावरतो आहे. वणवण करीत वस्त्या वस्त्या हिंडतो आहे. पण कोणाचीच असली शंभरी भरल्याचे त्याच्या नजरेस येत नाहीय्. त्यांच्यावर एवढे अन्याय-अत्याचार होतात— आहेत तरी कोणी उफाळून उठत कसा नाही मारायला वा मरायलला ?

त्याला दलित साहित्य बोगस वाटू लागते. दलित कथेतली जी जीवघेणी जुगुप्सा प्रक्षोभ वगैरे संशयास्पद वाटू लागतो... खोटं वैतागाने विटून एकमेकांचा गळा आवळून मरणारे अथवा अत्या-चाराला चाकूने भोसकून मारणारे दलित लेखकाचे कुठायन ते नायक अन् नायिका ? दलित कथा कवितेमधला त्यांचा अनुभव त्यांचा नसेल का ? खोटा असेल का ? तसं असेल तर मग एवढं इतकं खरं ते कसं लिहू शकतात ? एकेक अचाट वास्तव. मनाला अस्वस्थ करून सोडतं ते— ! शेवटी वास्तव वास्तवच असतं. ते खोटं कसं असेल ? .सूर्यासारखं सत्य. जळतं नि जाळणारं विस्तवासारखं ! आपल्याला त्याच्या जाळाचा अनुभव नाहीय् हे खरं. पण. इथं तर लोक अवदशेनं—दु:खानं नुसती रडबोंब करीत आहेत. पण कुणी त्या यातनेनं तडफडून मरताना वा कुणाला मारताना कुणीच दिसत कसे नाहीत ? आपल्याला तर असाच अनुभव हवाय ना कुणी मरतानाचा !

काही दिवसापूर्वी तर त्याने अर्धवटांच्या सहवासात हो, रस्त्याच्या वेडतरांपासून फत्तर-मारीचा 'डोकेफोड' अनुभव घेतल्यानंतर आता पूर्ण वेड्यांच्या इस्पितळात 'विथ परमिशन' त्याने प्रयोग करून पाहिला.... हो, अर्धवटापेक्षा केव्हाही पूर्ण बरा ! ते बघा—

कठड्याच्या खोलीत बंद काही वेडे... तो गणपत, तो कैरू. तो म्हादू. तो भद्रू. तो—

"गणपतराव, तुम्ही .चिंता करू नका. तुम्ही लवकरच सुधरणार बरं !"

"व्हय व्हय."

"आन् मी ?"

"मी— ?"

"हो, तू — तू — तूपण."

"हां:ऽ, मी पण. हॅंऽहॅंऽहॅं !"

"तो पण — मीपण — मीपण ह्यांऽ ! आन् आपण ?"

"मी तुम्हां लोकांना बघायला आलो, तुमच्या-पास्नं शिकायला काय !"

"काय मनल्या— शीऽखायला ?" .शीखा शीखा !"

"तुम्ही लोक खरोखर चांगले आहात. शहाणे आहात."

"व्हय, आमी फत्तरं खातो न् जगतो. ढेकलं गोटे. " मारत नाही ना?" तुम्ही निष्पाप आहात. वेडे 'इनोशन्टच' असतात".

"कोन वेडे?— म्हंजी आमी येडे? कायरे, मी येडा काय— तू येडा काय?"

"कोन मनतो येडा? कोऽन मनलाऽ..." भद्रू आता कडाकडा दात वाजवत, सतत निद्रानाशाने झालेले लालधूर डोळे वटारत बोलला—

"तू येडा न् मी बी वेडा—कोन मनतोऽ?" आणि आपले दोन्ही हात मोकळे व्हावे म्हणून बांधलेल्या लोखंडी साखळदंडाने त्याने आपल्याच बोडक्यावर ते धरून आदळले..

लेखकाची मोठी द्विधा परिस्थिती झाली. त्याला हा प्रसंग आवडला नसला तरी हवा होता. भद्रूने परत एकदा आपल्याच डोकीत हाणावे म्हणजे... आणि लेखक त्या आशेने भद्रूकडे बघू लागला. ...पण त्याच्या मस्तकात आगाग झाली तसा तो म्हादूच्या अंगावर धावला. म्हादू केकाटत पलीकडच्या खोलीत पळून गेला.. .आणि भद्रूच्या डोळ्यापुढे तिरमिरी येऊन तो मटकन् खालीच लटकला.... तो क्षण तोंडाशी आला, येणार काय. लेखकाने लक्ष लावून पाहिले. पण.. पण—

"अरेरे ! अरे बाबा, ह्या यातनांतून तू पूर्ण मुक्त हो." "काजी सायेब काय मनल्या— मुत्तोहो!" गणपतने जवळ येऊन विचारले व तो 'ॲक्शन' करत म्हणाला—

"हो हो, मुत्तो— मुत्तो... हे पाहा—"

"ह्या पाहा—" दुसऱ्याने अनुकरण केले. हे शुद्ध, पूर्ण वेडे!

लेखकाला सारं व्यर्थ वाटलं. वेड्याशी कसं बोलायचं? कसं वागायचं? त्याला भलतंच अवघड असतात— वगैरे पेक्षा वेडे फक्त वेडे असतात. त्यांचा सगळा उरफाटा कारभार. साधं बोलावं तर ते ओरडतात— रागावतात. रागवावं तर हसतात. आणि आपण हंसावं तर ते मारायला धावतात. मरायला— पूर्ण मरायला कोणीच तयार नसतो....

असा अवघड अनुभव त्याला आला.. पण त्याने हात टेकले नाही. आपल्या ध्येयावर निष्ठा ठेवून मग तो सडकेला लागला. ध्येयपूर्तीसाठी तन-मन-धन...हां, तो घरचा चांगलाच धनिक माणूस. फिकर नॉट!... आता सडकेने चाललेलाय. त्याच्या बाजूनेच दोन मजूर माणसं मालकाकडून पुरा चुकता वसूल करायला चाललेले, घाईगडबडीत— बोलत बोलत....

"काही म्हन, मी हा जुलम—अत्याचार आता सईन करनार नाही. त्या सयतानाचा जीव घेईन, नायतर आपला तरी देईन."

"अरे शांत हो शांत हो! येवढा मनावर परिणाम करून घेणं बरं नाही. मी हाय नं. तू मागं रायजो. मी पुना त्याला समजून सांगून पाहीन." "

"नाय रे नाय, तो पापी असा आयकाचा नाय. त्याची पक्की बूद फिरली हाय. आता हद् झाली. आज एक घाव दोन तुकडेच करतो मी."

"शंबूका, नोकोरे! काही आयीक माझं. ती तगडी पार्टी हाये!"

"हाय तं राहू दे. याच्या वर मांडतो मी मी आज त्याला—"

त्या माणसाचा क्रोध-क्षोभ ऐकून लेखकाच्या मनात पूर्ण चंद्र उगवला. अशावेळी मध्ये बोलू नये हे खरं. पण अशी संधी कदाचित पुन्हा येणार ही नाही. तेव्हा—

तो अत्यंत मधुरपणाने शांतीने म्हणाला, "तुम्ही मला क्षमा करत असाल तर मी बोलू शकतो?'

"तुम्ही, तुम्ही... काय म्हणता, बोला!" एका साथीदाराने लेखकाकडे वळून चाल धीमी करत विचारलं.

"हेच की— तुमचं बोलणं कानावर पडलं अन् मला खूप काही वाटलं. असं वाटलं की..."

"सांगा सांगा सायेब, काय वाटलं?"

"कुणाला कशासाठी ' मरायचंए ते अगोदर सांगा पाहू."

"तसं नाही सायेब, याचं जरा ताळधावर ताळधावर राह्यलं नाहीय्. एका दुस्टानं बिचाऱ्यावर घरगृहस्थीवर लय अन्याव चालवलाय्."

"काही पैश्याबिशाची भानगड असली तर—"

"पैसेकू गोली मारोजी ! इनं जीवावर विज्जतीवर बितून रायलंय."

"असं ? मग सावध रहा. रिपोर्ट द्या. पेपरात द्या. मला सांगा. द्यायला. काय झालं सांगा. सरकार दखल घेईल."

"गरीब-गुरीबांसाठी-दलितांसाठी कोणी काही करत नाही सायेब, सगळं सांगून-करूनही. द्यात्यं ते देतच नाहीच पण आणकी असलं तें जवळचं छिनून घेण्याचे त्यायचे अंदरून काही न्यारेच डाव चाललेलं असतात. सायेब, आहो, अंगरेज गेलं कांगरेस आली. कांगरेस गेली आन् आता जनता आली,— आमा लोकावरचे अत्याचार गेले काय ? कोण्यातरी सरकारानं थांबवले काय ?— सांगा."

"नाही, हे खरंय."

"या राष्ट्रात सगळीकडंच दलित गरीब लोकाची सारकी लूटमार, बलात्कार, कापाकापी, जाळाजाळ चाललीय्. तरी हे सरकार हे अत्याचार बंद करत का नाहीय् ? समाजपुढारी नसे. आन् ह्या माजला लोक... पण सत्ता काय करू शकंत नाही. मनात ठाणलं तर ? पण इथं पाहा तर सगळीकडं अंधोर ! या अंधेरी 'राजात' हा नंगा नाच निस्ता तमाशा चालाय् !"

"तुझं सगळं खरं आहे, त्यात पूर्वापार चालत आलेलं सडेल समाजकारण आहे. काही राजकारण आहे."

"आहो, सगळेच कारणी आहेत. कामाचं कोणी नाही."

"जाऊ दे बाबा, तुझा घुस्सा समजून घ्यायला पाहिजे. पण. म्हणजे तुम्ही लोकं गरीब भोळे मजूर माणसं. आपल्याला कळायचं नाही ते."

"वारे वा सायेब, मग तुमी समजवून तरी द्या, कुटवरी लपवून ठेवणार ?"

"अरे बाबा, मलाही राजकारणात 'इन्टरेस्ट' नाहीय्."

"मग चुलीत घाला ते राजकारण !"

"हां, मीही तेच म्हणतो. काय सांगायचं... हे राज... एक येतं न् दुसरं जातं. उठला राघो बसला बोरीवर ! आजचं राजकारण म्हणशील तर ते एखाद्या बढचाल नि चंचल पोरीसारखं हरदम माणसं बदलत राहाते. ते तर ते,. पण हा समाज ! हा कधी सुधरणार नाही ! जाऊ दे. शहाण्या नि् विचारवंत माणसानं शाश्वत अशा मनुष्य जीवनाचा विचार केला पाह्यजेलाय— तुम्हा लोकांच्या गरीब दलितांच्या जीवन-मरणाचा. त्याचाच शोध आता घ्यावा म्हणतोय मी !"

"तुम्ही काही म्हणा—शोध घेत बसा, पण हे जे अत्याचार चालले—" "

"अरे बाबा, हे सगळं पाहून-वाचून नि ऐकून आमची तर अलीकडे झोपच उडलीय्."

"निस्ती झोप उडून काय होणार ? त्याच्यावर ठोस दवा झाली पाह्यजे. कायम रोख बसला पाह्यजे... दिन दलित गरीबांच्या माणूसकीच्या हक्कावर आजपावतं हा समाज पोताराच फासत फासत आला. आन् हे सरकार बी आता टाळून-डावलून राह्यलं, ते का ? हे उघडचाय, हे सगळ भेदभाव जातपातीमुळंच चाललंय् ! अजी महाराज, रोज आम्हा लोकावर कुटं न् कुटं अत्याचार हा होतोच. या घडीचं त्या घडीले आम्हा लोकांवर काय बिनल— आज काय न् उद्या काय होईल, सांगता सोय नाही. हे सहन शक्तीच्या पार. असे हे कुटवर चालू द्याचं ?"

मघापासून एकसारखा लाहीवाणी तुल तुल करणारा, मरण्या-मारण्याचं बोलणारा त्याचा तो साथीदार आता मध्येच चिडून घुमसून उठला— "तू भाषण देतोस का चालतोस ? तुला मार्जी-वाली काही केवा नाही. जराबीशी गय नाही. मी जातोयेऽऽ—" आणि तो असे ओरडतच धावत सुटला. तसा साथीदार धसकला आणि मागोमाग 'संबू- संबूकाऽ— अरे थांऽब थांऽब. एकटा जाऊ नोको थांब—" म्हणत हाकारतच पळाला.

प्रकरण हातघाईवरचे दिसते.. आता लेखक महाशय मनात आशा धरून त्यांच्याच दिशेने जलदीने जाऊ लागला. पण ते दोघं पहाता पहाता गायब झाले. याला दिशा उमजलीच नाही.

समोरच्या चौकाजवळ एका उंच इमारतीचे बांधकाम चाललेले. चार मजले चढलेले दिसत होते. आता पाचव्याचे काम चालू होते. माळ्या-

वर मजूर लोक काम करताना. पण हे काय, वरती ती धावपळ. गडबड कशाची? आणि तो मोठा उत्सुक होऊन लगबगीने गेला.

चौकात लोक घेरा करून जमलेले. पोलिस दंडयाने त्यांना मागे हटवत होते.. तो जाऊन मिसळला.. बापरे, दोन खून! लोकात धुसफूस चाललेली. अरे तो तो तगडा मुर्दा— या इमारतीचा मालक....

त्याच्या छातीत भलामोठा चाकू आरपार झालेला. थूय थूय रक्ताच्या उडत्या चिरकांड्या, शरीराची तडफड-हालचाल आता शांत होत आलेली. भेदरलेल्या डोळ्यांची आकाशाकडे टक —— स्थिर.

"आपण तो क्षण गमावला मरताना तडफडतानाचा ... अरे अरेरे! चुटपुटतच पुढे होऊन लेखक लक्ष देऊ लागला.

दुसऱ्याच्या चेहऱ्यामोहऱ्याचा पत्ताच नव्हता. छिन्नभिन्न! त्यानं म्हणे खुपसलं अन् तेवढ्यातच पोलीसची लारी आली. तो लपायला त्या इमारतीमध्ये शिरला. मागोमाग शिपाई. तो लपत पळत गेला. आणि काय होताय हे कळण्याआधीच चौथ्या माळ्यावरून तो चेंडू फेकल्या सारखा एकदम खाली कोसळला. मारून मेला म्हणे.

तो तोच असावा. मघाचा त्याचा साथीदार मोठ्याने कळवळत होता. त्याच्या शरीराचे चिरलेले फाटलेले-मोडलेले अवयव नि हाडं येंडबेंड झालेल्या धडाशीन तो उगाच जमवत होता.

विनाश विनाश! जमिनीवर व्यर्थ झालेला तो रक्ताचा प्रचंड नाश बघून लेखक कळमळला. देशासाठी समरांगणावर— कशाला, मेडिकलमध्ये गरजूंना आपलं एवढं रक्त दान करून ही माणसं नंतर मेली असती तर! या उच्च तत्त्वासाठी रक्ताचा तो व्यर्थ सडा पाहून तळमळणाऱ्या डोळ्यांपुढे अंधारी मारू लागली. पण मोठ्या हिय्येने त्याने सावरले. आपलं 'इप्सित' जागृत ठेवून तो आणखी जवळ गेला.

तो हाडामासाचा दर्प, ताज्या तवंग रक्ताचा वास त्याच्या नाकातोंडांत गेला. मेंदूत जाऊन भिनला. आणि त्याला एक नवाच साक्षात्कार झाला. मरणाचं रहस्य आता त्याच्या प्रतिभेच्या टप्प्यात दिसू लागलं. हा बदल— हा साक्षात्कार म्हणजे—

ती हाडं. हाडात सगळं काही. हाडं-हाडं. त्याला चटकन स्मशान आठवलं. मृतात्म्यांचं पवित्र जग म्हणजे स्मशान! तियेच नर चैतन्य आत्म्यांचा नेणीवेतून सचेत प्रवास चाललेला असतो. शांत, स्थिर, त्यांचा तो व्यापार आकळण्याला— बस् आता स्मशान —— स्मशान!

तो आपली सगळी तहानभूक विसरला. जगाचा त्याला विराग आला. लागलीच वैराग्यवृत्ती धारण करून तो मग सरळ स्मशानात गेला.

कालपासून. आता तो तिथे गडलेले मुर्दे उगदतो. फार करून त्यांच्या कवट्या शोधतो. छोटी कवटी, मोठी कवटी. मध्यम कवटी—म्हणजे त्या त्या आकाराची तिन्ही प्रकारच्या कवट्या सापडेपर्यंत त्याची धडपड थांबत नाही. त्या एकदाच्या हाती लागल्या, की त्याला कोण आनंद होतो! ब्रम्हांनंदच! तो मग त्या एकीकडे नेऊन त्या स्मशान-शांततेत एकेक करून — अभ्यासतो. एकेकीवर वेगळाले सूक्ष्म टिपण लिहितो. त्या तीन कवट्यांपासून त्याला तिन्ही जगाचं 'नॉलेज' मिळाल्याचा आनंद होतो. त्याची दृष्टी साफ नि व्यापक होते.

जग जिवंत आहे तोपर्यंत ते पक्षपाती राहणारच. पक्षपात घातपात म्हणजे या जगी विशेष गोष्ट नाही. मात्र माणूस— मग तो जुलूम अत्याचाराला बळी पडून तडफडून मरणारा असो, की अत्याचार वामाचार करूनसुद्धा ऐश व सुखासमाधानाने जगणारा असो, माणूस म्हणून तो पापीच! एक बळी का पडतो? दुसरा का पाडतो? याचं उत्तर माणसाजवळ नाही, यात न्याय-अन्याय वगैरे नसून माणूसजातीची अधोगती नि अपेशच आहे. अपेश हे पापच! हे पाप करून अंधेरी नगरीच्या चौपटी राजासारखं जगता येतं. नाहीपेक्षा किड्यामुंग्यासारखं...

त्यापेक्षा एक मरण पुण्य ते एक दिवस फळाला येईल! हे स्मशान. ह्या कवट्या ही

हाडं. या पवित्र-निष्पाप जगाला जगानं आजतवर उपेक्षितच ठेवलं. त्याचा असा शोध कोणी घेतला ? आपण तो घेणार... घेणारच ! ..

मग त्याने थैलीत त्या त्या कवटीच्या त्या त्या सापळयाची काही महत्वाची निवडक हाडे वासाची-गोळा करून आणली. कवटचांसह ती घरी नेऊन त्याला त्यावर संशोधन-लेख रहस्यकथा वगैरे लिहावयाचे होते.

कालपासून रात्रंदिवस असा सारखा स्मशान-शोध घेतल्यानंतर लेखक महाशयाने आता परता-गमनाची तयारी केली. स्मशानातच दुपार कलंडलेली. घर बरच लांबाय. तो जरा घाईनेच निघाला. शहरात आला. मुख्य रस्त्याच्या बाजूला एका आडव्या गल्लीतून चार पाच कुत्री एकमेकांवर भुंकत भुंकत रस्त्यावर आली. त्यातलं एक तंगडी उचलत काही शोधू लागलं. आणि त्याला हवी ती वस्तू दिसली. पहावे तिथे. तिकडे जाऊन कुत्र्याने तंगडं उचलून एका दगडावर धार मारली. 'शीवम्...पापम् ! भोसडीच्या भोसडीच्या—' दात ओट खात बाजूच्या पानठेल्यावरील एका माणसाने दगड फेकून मारला. पण त्या कुत्र्याला न लागता तो दगड त्या दगडालाच लागला अन् तेवढा शेंदूर डागेजला. तो माणूस आणखी चिडून 'तुझ्या मायची' घेत पुन्हा दगड घेऊन. .परिच्छेद पण त्याचवेळी 'धाड धाड' आवाजाकडे त्याचे लक्ष गेले. कान टवकारले. तो पानठेल्यावाल्याजवळ काही कुज-बुजला. त्याने लगेच दुकान बंद केले. ते दोघं व आणखी धास्तावून तिथे आलेली काही माणसं गल्लीतून इकडे तिकडे धावत गायब झाली. एकदोन पोलिस लाऱ्या मेनरोडने तिकडे भर्रकन् उडत गेल्या.

लेखक अवाक् होऊन पहात होता. गल्लीकडे पलीकडेच दलितांची वस्ती. वरती धुव्वा-धुराचे लोट. बरोबरच 'धडम्धाड' आवाज. हे काय, .अश्रूधूर अन् हा गोळीबार. बापरे ! पेटले ! पेटणारच होते...मुर्देच मुर्दे ! चला अहं, यावेळी तिकडे नको जायला. निस्तरल्यावर विझल्यावर 'डायरेक्ट' स्मशानात ! ..विचार करतच तो भीतीने घाईने रस्त्याला लागला.

एकदोन बब्बर कुत्रे त्या माणसांच्या मागे गल्लीतून धावत गेले होते. आणि मघापासून जवळ घोटाळत राहिलेले बाकीचे तीन चार आता लेखकाच्या मागे पडून भुंकू लागले. त्याने त्यांना दटावत हाडं हाडं— करत रगदलं. ते जरासे बाजूला गेले व तोंड वळताच पुन्हा—— त्याला काहीकेल्या ऐकेनात.. बिचारे भुकेले असतील. कुठेकाही तुकडाकोर मिळाला नसेल. या महागाईच्या जमान्यात — उष्टयावरसुद्धा कोणी कावळा बसू देत नाहीत. मग कुत्र्याचे काय ? तरी काही 'खास' कुत्रे मात्र माणसाच्या पंगतीला लागतातच. बापाचा माल ! या माणसापाशी त्यांच्या बाबतीत भेदभाव नाही हे खरे. समान हक्क. लोकात समाजवाद संचार-ल्याचेच हे लक्षण ! आजचा समाजवादी ऊर्फ समानवादी माणूस असा फार पुढारलेलाय. त्याला आपल्या दोन पायाची ओळख झालेलीए. आपल्या जातीची !

अरेच्या, ह्या कुत्र्यांना फार जुनी असल्यासारखी आपली एवढी ओळख कशीए ! त्याने दटावलं— 'चलो—हॅट हॅट. जा तिकडे !' पण कुत्रे हटेनात, भू : भू : भू ! आता ह्यांना आपण द्यावं तरी काय खायला— काय ? चिडत भीत भीत तो कुत्र्याकडे पहात पुटपुटत उभा राहिला. आणि कुत्रे त्याच्याकडे व काखेत लटकवलेल्या लांब मोठया फुगलेल्या थैलीकडे आसवास घेत— लाळेजून पहात ज्यास्तच भुंकू लागले. आणि लेखकाच्या आता— कुत्रे आपल्यामागे का लागले, हे लक्षात आले. तसाच जीव की प्राण समजून दोन्ही हातांनी थैली सावरून धरत तो पळू लागला. ते पाहून कुत्र्यांनाही अवसान चढले. त्याच्या दामदुपटीने धावून, त्याला मागून पुढून घेरून ते अंगावर चवताळल्यागत भुंकू लागले.

आणि तो आता हैराण होऊन थांबला... आता कसे करावे ! ह्यांना वास लागलेलाय. कुत्र्यांना जरासा वास लागला की. त्यातून ही नरम ताजी आहेत सोडायचे नाहीत. ह्यांना काय

ह्या माझ्या थैलीतल्या चिजांची कदर! कुत्रे अखेर कुत्रेच— जनावरं! ह्यांना माणसाची बरोबरी समजदारी.

पण त्याला अधिक विचार करायला आता सुधरलंच नाही, कारण कुत्र्यांनी आता 'डायरेक्ट' त्याच्या अंगावर आणि थैलीवर हमला चालू केला. तो घावरला— सारखाच किंचाळला आणि रडलेल्या सुरात ओरडत त्याने चटपट थैलीतील तीन चार हाडं काढून त्या कुत्र्यांपुढे टाकली— आणि त्यांचे भुंकणे एकदम बंद झाले. ते मागून पुढून चघळू लागले. ओढझिकर करून ती बाजूला नेली. पण तेथे आणखी काही दुसरे जवर कुत्रे पैदा झाले. काही कमजोर अवाटी झाले. तरी संख्या वाढतच गेली. हाडं त्यांना कमी पडू लागली. म्हणून आपसातच झगडून आता ते एकमेकांचे जोरजोराने चावे घेऊ लागले. लचके तोडू लागले — आणि पुन्हा जीव लावून भुंकू लागले. जित्याची खोड मेल्याशिवाय.

या वेळपर्यंत गांगरून गेलेल्या लेखकाची स्वारी आता पुढे निघून गेली होती. तीनचार 'अमोल' महत्वाची हाडं गेल्यामुळे त्याला कोणी चामडीच सोलून नेल्याएवढं दु:ख झालं. तो खालच्या मानेने चुकचुकत जात असतानाच लोकांची इकडे तिकडे होत असलेली धावपळ त्याने पाहिली. भराभर पोलीसच्या लाऱ्या इकडून तिकडे पळताना दिसल्या; तर काही अॅम्बुलन्स भरून मेडिकलकडे धावत होत्या, त्याच्या डोळ्यांपुढे लाशींचे-रक्ताचे लाल भडक चित्र उभे राहिले. तो शहारला,.. मरण स्वस्त होत आहे! उद्याचे आज— हेच ते पुण्य मरण! मयतींना आज उद्या पुरण्यात येणार! आठ दिवसांनी पुन्हा स्मशानात चांगल्याच तल्लख तल्लख कवटया — आपल्या हक्काच्या मुक्ति-लढ्यातल्या मारून मरणाऱ्या मर्द माणसाच्या कवटया आपल्याला संशोधनाला मिळणार! आणि त्यांची हाडं पण चांगली ताजी-तवाणी —वासाची असणार! त्या वासातून आपल्याला हवं ते. आपण जायचं. असे मनाशी ठरवत तो डोळे-कान टवकारून मोठ्या सावधगिरीने झपाझप जाऊ लागला.

तो मेडीकलचा चौक, त्याच्यामागे लेखकाचं घर, . . . आलो तर एकदाचे. कुत्रे पुन्हा लागायला नको. ते काय, तिथे ऑपरेशन थिएटरच्या बाजूला सडकीवर कसली माणसं जमलेलीयेत? पुन्हा काही भानगड आहे की काय! अरेरे, ती जखमी माणस . . . ती तळफळत असणार . . . जिवंत असायला! उद्याच्या मुक्तिसंग्रामात परत कामी यायला! माणसं मरतात. उर्मी कधीच मारल्या जात नाहीत. थडगे प्रेरणा देतात. थडग्यातून त्यांचा ..जीवनाचा शोध आपण घेतला. आता मरणाचा! मरणान्तरावरील जीवाचा नेणीवेत चाललेला प्रवास आता आकळावयाचा!

आता लोकात कुतूहल. कोणाय तो? एम्बुलन्स मधून बाहेर काढून ठेवलंय. . . कोणी निष्ठावंत पोलीस शिपाई दिसतो! हां, लूट-मारीत गवसलेली हात भट्टीची असल— खूप पिऊन वेशुद्ध पडलेलाय. मार बी पडला दिसतो. . . मेला की काय! एकदोघं लाशी जखम्यांना वाहुन नेणारे निम्न कर्मचारी त्याच्यापाशी थांबलेयत. त्याच्या छातीला, नाकाला, गळ्याला तपासतायत.

'अरे, गेला गेला. बात हवा चालत नाहीय्! अरेरे विचारा!'

'बिचारा काय हा माणूस! हा पापी माणूस. माणूस पापी! सगळीकडं पाप! हे पाप— ते पाप! जाऊ द्याहो, जगातलं एक आघोरी पाप कमी झालं!' लेखकाला माणसाविषयीची ही मनातली 'नफरत' लोकाजवळ ओरडून बोलून दावाविशी वाटली. पण बहादुराने सावरले. संवय होती. त्याच्या ललित कलाकृतीं-मध्ये नेमकेपणा नि संयम फार असे. त्यामुळेच ध्वनिसौंदर्याने त्या वाचकांना मोहून-खिळवून टाकत. अंत:करणाचा नुसता ठाव घेत.

एकानं 'कालू, ए कालू—' म्हणून घाईने हाक मारली. तसाच तो आतून जवळ आला. "मेला काय?"

"आता आता . . . !"

कालकाप्रसाद मयताजवळ गेला. हाताने नीट तपासले. त्याला काय समजलं न कळे, "जा तू लवकर सुई घेऊन ये." असे एका साथीदाराला

सांगून लगेच त्याने पोलीसाच्या शरीराला उल्टे पालथे केले. पुन्हा सरळ केले. त्याच्या छातीला हात घासला. साथीदाराने तयार करून आणलेली इन्जेक्शनची नळी त्याच्याजवळ दिली. कालवाने लागलीच शिपायाच्या निरस्पंद छातीत सुई टोचली. मग त्यच्या कमरीच्या दोन्ही बाजूला पाय ठेवून ओणवा होऊन त्याच्या छातीवर आपले दोन्ही हात घट्ट जमविले आणि त्याने एकदम 'पंपिंग' सुरू केली. .छाती दावत-सोडत. जोरजोराने मागेपुढे भाता हलवावा तसे तो करू लागला. हवा भरू लागला.... आणि अंदर एकाएकी खट्खण् हॅण्डल लागल्याचे त्याला समजले. खट् खट् खट् मशीन प्रथम अडखळत सुरू होऊ लागली. छाती हळूहळू धडधडू लागली. ड्धड्धड् चालू झाली. वेगावत आलेली कंपने मग चालूच राहिली.. त्याने मग पंपिंग करण्याचे बंद केले. आणि काय नवल थोडयाच वेळात तो दारूत मरून पडलेला पोलीस जिवंत झाला... त्याने हालचाल केली.

'अरे जिवंत झाला!'

'झाला?'

'हो, वाचला वाचला. मोठं नवलाय!'

"कमाल केली बुवा तुम्ही!"

"तुम्ही तर देवाचे बाप झाले! मेल्याला जितं करणं म्हणजे—"

"आरे नाही हो, कसचं काय— तो वाचायचा होता वाचला. आम्मी जरा येळंवर खटपट केली यवढंच!"

"हो, पण तुम्ही यावेळी इथं नसते तर त्याची 'मातीच' झाली असती का नाही?.... कोल्हे-कुत्रे हाडामासाला झोंबले असते.... तुमच्या रूपात माणूसच देव आहे बाबांनो! सर्व काही माणूस आहे. या युगाचा तो !"

आणि त्या भंगी जातीच्या गरीव गुणी कर्मचाऱ्यांचे गोडवे गात लोक निघून गेले. अंधारात आले होते.

आणि आतापर्यंत हा सर्व प्रकार डोळाभर पहात उभा असलेल्या लेखकाचे डोकेच फिरले...

आणखी घायाळांना भरून दोन एम्बुलन्स, पोलिसव्हॅन वगैरे आला. बाहेरून लांबची एक एस्.टी. पण आली. त्यातून गोळघा लागलेली— छाती— पोट — खांदे छेदलेली, डोके फुटलेली, मांड्या हातपाय मोडलेली बाया-माणसं, तरुण-मुलं बाहेर काढण्यात आली. एवढ्यातच दोनतीन बैलगाड्या भरून आल्या. चेंदून चेंदून मारली गेलेली माणसं-बाया-मुलं रॉकेल ओतून जाळलेली, कुशीत भाला भोकसल्याने मरणाचे क्षण मोजत असलेली एक नवतर तरुणी आन् तिचं शेजारीच चेंगरून मरून असलेलं वर्षाआतचं मूल आणखी किती कोण-काय काय— त्याच्यानं पाहावलं नाही आता तिथं राहावलं नाही...... मनात अलटीपलटी खाऊन विचाराचे काहूर उठलेले....

हा नाश जीवितांचा जीवनाचाच नाश आहे हा! मनुष्य जीवनाचे हे विडंबन! नाही-नाही, हा न्याय नव्हे— न्यायाचं सोंग आहे. तमाशा आहे. अन्याय जुलुमाचे हे उघड उघड वेशरम थैमान आहे. मानवतेचा धिंडवडा! माणसातल्या क्रूर लांडग्यांची ही धर्मनीति नि धूर्त स्वार्थी कोल्ह्यांची ही लबाडी! सगळं अंदाधुंद.. हे खोटं आहे. ही जीवनाची उपेक्षा आहे.. ह्या गरीब दलितांच्या जीवनमरणाचा प्रश्न सुटला काय— की मरणाचाच मार्ग त्यांच्या मोकळलाय?..

मरण मरण मृतात्म्यांचा प्रवास कुठाय-कुठे चाललेलाय? मरणाचा नि् मृत जगाचा अगम्य गूढ व्यापार-त्याचा तो व्यर्थ अभ्यास कशासाठी. कुणासाठी—उपयोग काय? सत्य-शीव कुठाय—दगडात? हो, दगडातच! माणसात कुठाय? अत्याचाराच्या महापुरात— हजारो निरपराध-निष्पाप लोकांना बुडवून मारणारं-कुचलणारं तत्त्व 'शीव' कस असेल? 'सत्य' कसं राहील? तरी त्याच क्रूर कुतत्त्वाचा चोहोकडे आविष्कार—त्याचाच मनामनावर पगडा बसविण्याचे हे पडयंत्री तंत्र आणि हा उद्रेक! नाश!

नाही नाही, हा सत्याचा-मनुष्यत्वाचा नाश आहे! अवडंबराचा विलास आहे! माणूसकीचा न्हास आहे! सुंदर काय आहे? सुंदराचा तर

जन्मच व्हायला आहे. हे, पुरातून ओंडक्यासारखं आदळत आपटत वाहत चाललेलं–गुदमरलेलं जीवन सत्य आहे. तो शिपाई दारूने मेलेला नसेल कदाचित, पण मरणार होता– तो वाचला, हे सत्य आहे, माणसा–माणसानं चाललेला जीवनातला हा भेसूर हलकल्लोळ सत्य आहे. तो संपलेला नाही. कदाचित संपणारही नाही. म्हणून.

लेखकाच्या डोळ्यांपुढे वारंवार ती जखमाळलेली, मरू लागलेली घायाळ जर्जर माणसं दिसू लागली. त्याला हंसू लागली अन् गिळू लागली. तो चक्रावला–घसफटला. डोळ्यांपुढचे ते दृश्य जाईना. दुःखाचा-मरणयातनांचा घास घेत तडफडणारी माणसं-बाया-पोरं! मुर्दे अन् स्मशान. स्मशान अन् मुर्देच-मुर्दे! ..हाडंकवट्या... त्यांच्या सभोवती नाचत भुताच्या चेहऱ्यांनी, त्याला हसू लागलेल्या. तो भांबावला थकला होता. वेड्यासारखा वागू लागला. त्याने चटकन् मोठ्या कष्टाने आणलेली थैलीतील कवट्या-हाडं बाजूच्या कुडीकचऱ्याच्या पेटाऱ्यात नेऊन टाकली. टिपणांची कागदं फाडून फेकून दिली. आणि मग तो हाडाचा लेखक रित्या हाताने व भरलेल्या ध्वस्त धुंदाळ मनाने घराच्या रस्त्याने चालू लागला.

रस्त्याच्या लायटांच्या उजेडात आखडत. लांबत जाणाऱ्या आपल्याच सावलीकडे दातओठ खाऊन पाहू लागला. थूःथूः करत पचापच थुंकला आणि पटापट पाय आपटत जाऊ लागला, चिडत पुटपुटत— 'खुंदू देत नाही? थांब, तुला घरी गेल्यावर खणूनच काढतो. तेव्हाच—'

⊕ ⊕ ⊕

(पृष्ठ १७७ वरुन)

ही सारीच प्रकरणे मुळातून पुनः पुन्हा वाचावीशी वाटतात. 'हृदयाची साक्ष पटली म्हणजे गुरू करावा' हा जसा एक अनुभव तसाच 'देवा! तुम्ही खरे संत आणि आम्ही तुमचे खोटे शिष्य' हाही दुसरा अनुभवच. दोन्ही आपापल्या परींनी रोचक असून ग्रंथाच्या रससेवनात बहार आणतात.

चरित्रग्रंथाचा गाभा

श्री कोलते यांचा स्वतः गुरूंबरोवर झालेला संवाद आणि त्यातून होणारा बोध हाही या ग्रंथाचा एक महत्वाचा भाग आहे. 'गुरुपौर्णिमेचा सोहळा', 'योगपर्वताची चढण', 'मानवी जीवनातील अत्युच्च शिखर' यांसारख्या प्रकरणांतून व्यक्त होणारा भक्तिभाव कोणत्याही गुरुभक्ताच्या मनाला चटका लावून सोडणारा आहे. विशेषतः 'मज सद्गुरू मिळोनी सुफलित जन्म झाला' या प्रकरणातील हृदयंगमता काही औरच आहे. आमच्या मते प्रस्तुतच्या चरित्रग्रंथाचा तो गाभा आहे.

आजच्या विज्ञाननिष्ठ युगात गुरुभक्तीची ज्योत तेवत ठेवणाऱ्या या चरित्रकर्त्याचे आम्ही अभिनंदन करतो.

चरित्रग्रंथाच्या गाभाऱ्यातील त्या अपार वात्सल्याचे प्रतिक अशा गुरुमूर्तीलाही आमचे विनम्र अभिवादन.

या चरित्रग्रंथाचे आरंभी सुप्रसिद्ध साहित्यिक कै. ग. त्र्यं. माडखोलकर, डॉ. श्री. भा. वर्णेकर, डॉ. अ. ना. देशपांडे, डॉ. मधुकर आष्टीकर, जनार्दनस्वामी व प्रा. राम शेवाळकर यांचे अभिप्राय मौलिक असेच आहेत.

⊕ ⊕ ⊕

अनुक्रमणिका

कविता

मानवी समर्थ हात / श्रीपाद गंगाधर कावळे

नष्ट झाले असेल लाटांचे धारिष्ट्य
एव्हढे समर्थ हात
आकाशातील सहस्र बाण झेलीत
अव्याहत झुंज भीषण रौरवात
ढवळलेले समुद्र
दिशांचे शोध घेत काळोख सारीत
अंतरे कापीत धुंदावलेले वादळी हात
विजांच्याही नजरा स्थिरावल्या असतील
सुकानूचे थकले नाहीत हात
अव्याहत झुंज भीषण रौरवात
समुद्र पक्षांना नकोत लांबवर झेपावणारे पंख
त्यांना हवेत दिशान्त शोधणारे
मानवी समर्थ हात.

फुटके धरण / भाऊ पंचभाई

मला जिंदगीची पर्वा कशाला ?
उभे हर घडीला मरणच इथे,
कुणाच्या चितेवर कशाला जळू ?
पावलो-पावली मी सरणच इथे . . .
तिची आस स्वप्निल काजळी सुखांची
पुढे रोज माझ्या गर्दी दीनांची,
तिचा दर्द, करमरा वातानुकूल नाही
कफल्लक असा मी की तंबुही नाही;
गगन चुंबत्या राजभवनास त्यांच्या
पाव्यातले मी भरणच इथे . .
तृणाची कशी बांधली झोपडी
नि जरासा कुठे दीर्घ श्वासावलो,
पारध्यांच्या सवे हिंडलो रानभर
रंजल्या-गांजल्यांच्या सवे रंगलो;
तिच्या शिशमहाली कशाला वळू
वाळलो, हर चुलीचे मी जळनच इथे . . .
कुठे जन्मभूमी ? कुठे देश माझा ?
कुठे राष्ट्रध्वज, नि कुठला दिलासा ?
ते वेलछी पोसती हर घडीला !
मला कोण येथे कसा आपलासा ?
कुठे नोंद घेऊ इथे चळवळींचे
बांधण्या आधी फुटते धरणच इथे . . .

सारे संदर्भ हरवलेय / सुलभा हेर्लेकर

कसे, कुठे, केंव्हा
किती भोळे प्रश्न
उत्तरासाठी हट्ट, मोरपिसांचे.
कळाया लागेल आत्ताच
लवतोय डोळा शुभशकुनाचा,
कृष्ण मावळतोय, राधा उसासते,
चंद्र, दीप मालवतोय.
कुणासाठी, कशाला, कां,
इथे तिथे सारा प्रश्नांचा प्रदेश
कशी येऊ रे उत्तरासाठी
सारे संदर्भ हरवलेय रात्रीच्या कुशीत.

कुहू ऽऽ / पद्मिनी बिनीवाले

समोरील झाडीतून
थरथरत जाते आहे एक हाक रानाच्या सीमेपार
वर्षानुवर्षे मी ही घालते आहे अशीच हाक
जिला 'ओ' येत नाही ।
कधी गाडीतून जातांना
खूप ओरडावं जीव खाऊन
अन् शब्दांचे तुकडे व्हावेत
समोरच्या डोंगरावर आपटून
धबधब्यावर पडलेले काही
कोसळल्या पाण्यावर
फेस फेस होऊन जावे
तशी फुटत जाते माझी हाक
आजुबाजूच्या आवाजात
धावत जावे वाऱ्यावर उडणाऱ्या कागदाच्या कपटया-
मागून
पळावे कापसाच्या म्हातारीमागे
हात वर करून
तशी धावतें आहे मी माझ्या हाकेमागून
'ओ' यावी म्हणून
कोणत्या अज्ञात प्रदेशात तो प्रतिसाद
ठेवला आहे पुरून
धावता धावता
नको ती सीमा तर नाही जाणार मी ओलांडून?

अनुक्रमणिका

तक्रार / रमेश ललगूणकर

उदास गुलमुशी आकाशाखालच्या
भरवाहत्या रस्त्यावरचे
मी एक अस्तित्वशून्य प्रेत
ज्यातून रक्त मास अस्थी
काढून फेकून दिल्या आहेत घरातल्या केरासारख्या—
रस्त्यावरच !
लोकांनी तुडवून आता ओळखूही येत नाहीत त्या.
असेच हवे होते मला.
नाही तरी तक्रार भरल्या रडगाण्याशिवाय
माझ्या मनाच्या बंद गल्लीतून
दुसरे सूर उमटतच होते कुठे ?
घरातले कपटे कधीच कचराकुंडीत टाकले नाहीत
मी, आणि रस्ता ओलांडताना
आडव्या आलेल्या आर्त आंधळ्या म्हातारीकडे
कानाडोळा करूनच पुढे गेलो.
काम न करण्या इतपत वृद्ध झाले म्हणून
आईवडलांचा त्याग केला आणि
शोधू लागलो कुठल्या तरी स्नेहशून्य प्रेमाचा आसरा
निदान मुलांनी तरी सोडून देऊ नये मला
उपेक्षेच्या उजाड वाळवंटात.
यातून मिळणार होते तेच
मला मिळाले का ?
अजूनही तक्रारीचा स्वर
वाटसरूंच्या पायांखालून ऐकू येतोच आहे.

वेदना / देवकीनंदन सारस्वत

वेदनेच्या त्या सुरांतुन, गीत गाते चांदणी
बाहुली ही नाचते कां, साथ देती खेळणी.

वाट जाते ज्या दिशांना, हासते तेथे भिती
दु:ख देते धुंद होऊन, भावनेला कां गति.
हळूच मोती गळून गेले, एक उरली विरहिणी

थांबतो कां हळूच येऊन, जीवनातिल पारवा
भरुनी आले तेच प्यालो, हळूच येता गारवा
रेष रेषेला मिळाली, चंद्र करितो आखणी

काळ फिरतो रोज दारी, हाती झोळी घेऊनी
दु:ख येते वेदनेसह, त्याच पाठी चालुनी
पाकळ्यांना गंध उरतो, फूल रडते ज्या क्षणी.

एकांत साजरा होतोय / रंजना विगम

एकांत साजरा होतोय फुलांच्या साक्षीने
भुरभुरत्या हिमाच्या शुभ्र पाऊस-विराणीने,
अधांतरी पक्षांच्या रत्यात्मक मीलनाने;
पानापानांच्या थिजल्या शीर-शीरीने
एकांत साजरा होतोय.
एव्हाना तुझ्या लुळ्या पायांना भरदार पांखरे
टोचू लागली असतील,
तुझ्या गर्भात पृथ्वीची व्याकूळ उलथापालथ सुरू
झाली असेल.
कदाचित . . . काळीज उलथून ढग मोकळा झाला असेल
पक्षी आला अन् निघून गेला . . .
माझ्या पुढ्यात गर्भाचा अवयवहीन निम्वारा !
उध्वस्त गर्भाच्या प्रांताप्रांतात एकांत साजरा होतोय.
मला जाता येत नाही पलीकडे—
माझ्या समोर लांबच लांब ग्लेशीयर्स.
मृत्यूला पदराखाली झाकून, जीवनाचा देखावा
मृत्यूच्याच डोळ्यांनी पाहात असतात त्या !
ह्या जीवंत बर्फाळ खंडावर, जीवंत मृत्यूचा एकांत
साजरा होतोय !!

कालपात्र / बाळकृष्ण बनौरे

किनाऱ्यांनी रक्षण करावे
निरंतर,
डोळ्यांत तेल घालून
असे समुद्र उरलेत काय ?

भुजा विस्तारून पर्वत-शिखांनी
वळवून घ्यावे आकंठ
आपल्या कुशीत,
असे श्रावण मेघ तरी
दिसतात काय ?

न ढळता आभाळाने
घ्यावे झेलून
दिशांच्या झोळीत
वादळ ऊर्जेचे,
असा सूर्य तरी आढळला काय ?

शब्दांनी खिळून रहावे पानोपानी
चांदण्यांच्या कालपात्रांत,
असा इतिहास घडला काय ?
घडेल काय ?

काळा झेंडा / कुसुमानंद

उगवत्या सूर्याच्या साक्षीने
त्याने अंथरून गुंडाळले
आणि चूळ थुंकली
पिकल्या पानाच्या तोंडावर...:
त्याने नामर्द म्हणून
त्यातील काहींचा धिक्कार केला
आणि तो पुढे निघाला
अंगात तांबडे जाकीट चढवून.
त्याच्या लालबुंद डोळ्यांकडे पाहून
चौकातील कुत्री भुंकू लागली
आपापल्या शेपट्या ढुंगणात लपवून.
तो झुलतच होता हत्तीसारखा
हातात काळा झेंडा घेऊन.

केस पिंजारून येतो
येतो हात उगारून
धगधगते शब्द घेऊन
वापरतो घोळवून घोळवून.
म्हणाल तसे येतो
बोला म्हटलं तरच बोलतो
तुमची थुंकीही झेलतो.

तुम्ही सांगितले म्हणून दाढी राखली
आवळा म्हटले मूठ, आवळली.
किमान जागलकरी तरी होऊ द्या
ज्याला क्रांती म्हणता ते तरी लक्षात येऊ द्या.

चांगभले / महावीर जोंधळे

चालणं, उठणं, बसणं, हसणं,
सरळ साधं असं
खिशात पैसा नसला की,
कम्युनिस्ट व्हावं तसं.
फाटलेली कॉलर दुमडून चालताना डोळ्यात
कार्ल मार्क्स, एंगेल्स दिसतो,
माओही असतो बगलेत.
विस्कुटलेल्या झिझुट्या उगवून,
मेंदूत उबवून क्रांती
कोण देणार या जगात
कोणाच्या भाकरीची शास्वती.
तुम्ही काय आम्ही काय
सारेच शब्द तोलूत तराजूत
वजनाला क्रांतीदूताचे
कित्येक डोळे मजबूत.
खानदानी लाचारी पेरून
प्रत्येक दगडाखाली
खनखनाटी सावकारही म्हणतात,
लेनिन आपला वाली.
क्रांतीसाठी सत्याचा आभास
पांघरून 'आम्ही'
तुमच्यात येऊ इच्छितो,
घ्याल का सामील करून ?
पुढच्या दारानं नाही जमलं तर
मागच्या दारानं घ्या जमवून.

आतापर्यंत अनेक मेळे बदलले,
आलटून पाहिले, पालटून पाहिले
पाहिले तांडे बदलून,
मेळ्यांचे पुन्हा तांडे झाले.
कसेही असा तुम्ही भले, तुमचे 'ते' भले,
तुमच्या त्यांचे चांगभले.
तांड्यात यावे म्हणतो
तांड्यावर गावे म्हणतो
तांबड्या मलमली
कापडांच्या पालात
स्वस्त-मस्त झोपावे म्हणतो
हातोड्या कोयत्याला साक्षी ठेऊन
अंकत फिडेलची गती मंद धून
अर्ध्य चंद्रकोरीची तर त्याला काही हरकत नाहीना ?

क्रांतीची भाषा सोपी असते म्हणतात
चार घास पोटात गेल्यावर.
रक्ताचा रंगही बदलता येतो
मेंदू लालफ्रिजात गोठवल्यावर.
खरं काय तुम्हीच सांगा !

येथे काय तेथे काय प्रत्येक जणच कार्ल मार्क्स,
एंगेल्स आणि लेनिन.
थांबा, मागे पहा. खोटं काय खरं काय
ते माओच सांगेल.

अनुक्रमणिका

फसगत / श्यामकांत कुळकर्णी

या अफाट शहरात
पहाट झाली असं समजून
एक कावळा काव्-काव्
करून प्रामाणिकपणे
आपलं कर्तव्य वजावतो आहे
पण त्याला कळत नाही की
पहाट व्हायला अजून बराच वेळ आहे
अजून तांबडंही फुटलं नाही
झुंजुमुंजु देखील झालं नाही
म्हणून काक महाशय, अजून थोडी झोप घ्या.
जरा डोळे किलकिले करून बघा
हा मर्क्युरी दिव्यांचा झगमगाट आहे
रविकिरणांशी यांचा कसलाच संबंध नाही
चंद्रप्रभेशीही त्यांचं नातं नाही
म्हणून महाशय अजून थोडं स्वस्थ पडा.
थोडा वेळच कां ?
पहाट झाल्यावरही तुम्ही निःशब्द रहा.
अहो, उषःकाल होण्यापूर्वीच
हे अफाट शहर आपोआपच जागं होतं
मिलच्या भोंग्यांच्या धाकांनं
जम्बो जेट्च्या घरघरीनं
म्हणून महाशय, तुम्ही
या घनदाट वस्तीतून
दूर, समुद्र किनारी
एखाद्या झाडावर जाऊन विश्रांति घ्या.
या अफाट शहराचा
दिवस जागवायला
तुमच्या कंठशोषाची गरज नाही.
जिथं वेदमंत्रांचे घोष नि
कुराणातले. वायवलचे शांतिपाठ
ऐकायला कुणाला फुरसत नाही
तिथं तुमची वेळी अवेळी केलेली
काव्-काव् कुणाला ऐकवणार आहे ?
या अफाट शहरातून चिमणी केव्हाच
चिव्-चिव् न करता
रानात निघून गेली आहे !
राघू-मैना रानात जाऊनच
मंजुळ बोली बोलू लागले आहेत.
काक महाशय, तुम्ही या फ्लॅटवरून
चटकन् उठा नि सागरतीरीं जा.
कारण या फ्लॅट्मधनं कुणी
अकस्मात् जरी 'राम' म्हणेल
तरी पिंडदानाच्या वेळीसुद्धा
तुमची गरज या शहरात भासणार नाही

काळीज तुझे घनवेडे / प्रतिमा पं

काळीज तुझे घनवेडे
पाऊस निळा कोसळतो अविरत येथे
अंधुक धुक्याच्या आत
झुलणारे रेशिममोर हरवले कोठे ?

पाण्यास ओढ का लागे ?
भरतीच्या वाटे साजण येतो कोणी
राधेचे व्याकुळ डोळे
रानात हरवती काहुरले अनवाणी.

काळीज तुझे घनवेडे
मातीवर जळतो दीप तुझा स्वप्नाळू
कळते न तुला हीं केव्हा
पायांच्या खालुन गूढ सरकते वाळू.

नक्षत्र खुळे की फूल
मेंदीवर चढले साज अटळ अश्रूंचे
पाहून तुला हळवेला
रानात धुक्याच्या मोर अनावर नाचे.

काल आणि आज / पंडित आवळीकर

काल ढगाचा गडगडाट तो
असा कसा सखि, झाला ग ?
काल विजेचा कडकडाट तो
जीवहि होता भ्याला ग.
जाताना म्हटलेस मला तू
"मन बावरते, गुदमरते.
तुझ्या प्रीतिच्या वर्षावामधि
रे, पुरती मी गांगरते.
आपण जर भेटीच टाळल्या..."
"टाळ हवे तर" ... म्हटले ग—
"जर भेटावे वाटलेच कधि
तर ये" . वादळ उठले ग.
निरोप घेता (अखेरचा जणु !)
"उद्या तुला भेटेन !" म्हणालो
विपण्ण तिमिरी व्यथित एकला
भग्न हृदय मीहि निघालो !
रात्र... नव्हे तर काळरात्र ती
जळत कशीतरि सरली ग
ढगहि निळे आभाळ आज हो
वीज गुलाबी उरली ग.
आज चांदणे-ऊन्ह मिळाले
तशात पाऊस आला ग
आलिस तू अन् प्राण परतले
मीलन-उत्सव झाला ग.

जाता जाता / **निरंजन उजगरे**

. . .आणि हो ! एक राहीलंच—
कोणाची वाट बघू नये
कोणाला गळ घालू नये
घेतला वसा टाकू नये;
प्रत्येकाने आपला मार्ग
करायचा असतो खोदून पूर्ण
बोटात प्राण असे पर्यंत . . .
वाट बघशील तर
वेळ टाळशील,
वेळ टाळशील तर
आपल्याच मार्गात झिजक्या बोटांनी
टवकत ट-व-क-त
तिथेच मातीत विरून जाशील
'सात बाय अडीच' खड्ड्याबाहेर . . .

लिहायची आहे कविता तर / **गोपाळ मो. कोलते**

लिहायची आहे कविता तर लिही
पण उमटु दे शब्द दिशा दिशा दाही
घेशिल का नभातिल निळी निळी शाई
तारकारूपी शब्द काव्याचिया काही ?
आणशिल दरियातुन लाटेसम कल्पना
खोल खोल तळातुन मोत्याच्या भावना ?
शशिचा आल्हाद फुलेल हृदयातुन
रविचा एखादा किरण काव्यामधुन ?
कोरशिल इंद्रधनु काव्य अजिंठ्यावर
हृदय पिळणारा का निघेल आर्तस्वर ?
येईल का बहर फळांनी लदवदुन
होइल का जागा कुणि कविता वाचुन ?
कवितेतुन तुझ्या मधु टपकेल का ?
सृष्टीचा हिरवा रंग उमटेल का ?
लिहिशिल आयुष्यात दुसरी ज्ञानेश्वरी
तुक्यासम गाथा एखादी न्यारी ?
लिहिशिल एखादी क्रांतिकारि 'तुतारी'
जमेल गडकऱ्यांची प्रेमाची शाहिरी ?
जगतो कालिदास अजुनही जगतात
'गितांजली' शोभे जगाच्या हृदयात
'क्रांतिचा जयकार' स्फूर्ति देत राही
प्रत्येकाच्या हृदि यशवंताची 'आई'
लिहायची कविता तर अशि काही लिही
अमृताच्या शाइने हृदयातुन लिही.

आठवणी / **बजरंग सरोदे**

रात्री पोटी
काळीज ओठी
तुझे एक गाणे—
चंद्र-चांदणे
घेऊन येते
स्वर-गंधांचे लेणे !
स्वप्निल काठी
गाठी भेटी—
हळुच कुरवाळुनी
क्षण निद्रेच्या
तमात बुडता
कुशीत आठवणी !

वादळ / **दुर्गेश**

काल रात्री स्वप्नात
आले चक्री वादळ
उघडीत ओळखीच्या खोल्यांच्या
बंद खिडक्या
जागा होऊन धुंडाळला
प्रत्येक कोपरा नि कोपरा
आपला कोणीही दिसेना तेथे !
राहिलो हुंदके देत
संकुचित करीत
जीवनाचा शेष भाग !

अशा वेळी / **दे. शि. दुधलकर**

रानभर झाल्या गाई
येई चरतांना याद
घरी बांधल्या वासरा
घाली हंबरून साद.
ओढ पाऊलाला तिच्या
वाट जडावून गेली
चालताना पुढे कशी
सांज झाकाळून आली.
तिन्ही सांज पेंगताना
जीव आतुरतो तान्हा
अशावेळी माऊलीचा
आटू नये कधीं पान्हा.

इथवर / चित्रा पांढरकर

पाऊसपाण्याने न्हाऊन निथालेल्या
झाडरस्त्यांसारखे
तुझ्या आठवणीत न्हाऊन आलेय गच्च
माझे मन.
करवंदी ओठांच्या चवीसारखी
पाकळीन् पाकळी फुलून येतेय अंगभर
कुठल्या गझलींच्या संगतीत तू हरवून
बसलाय, अन् इथवर
माझी एकही ओळ आठवू नये.

ओळी / विश्वास कानडे

पराभवाचे परवचे
म्हणून म्हणून
चिमणा-चिमणी
उन्हाचे, आकाशाचे
पावसाचे, वादळाचे
आभार मानून
चांदण्याच्या मार्गाने
आकाश गंगेपलीकडे
निघून गेलेत.
त्यांच्या मुलांचा चिवचिवाट
देवळातल्या घुमटांत.
हे कसचे परवचे ?

नजरेतून माझ्या. . / मृणाल चिंचाळकर

नजरेतून माझ्या
झोपेचे गाव उठून गेले आहे
आता, रात्रीचे मुकलेले दिवेच
सोवत करतील ही आशा. . .
पापण्यांच्या कुजबुजीतून
उगवते संदर्भ सांधून घेताना
रस्त्याकडेवर झुलणारी
वडापिंपळाची सक्षम झाडे
समजावीत असतात—
"घडणारी प्रत्येक घटना
सूर्यसाक्ष असते हे विसरू नकोस
तुझ्याही ओवीला कैवल्याचा कोंभ फुटेल".

सावळता चंद्र खिडकीच्या गजांशी उभा आहे
आणि मी
'उद्यां'च्या तयारीत.

एक कविता / अनुराधा पाटील

सगळे ऋतू, देहभर पानगळ
मनातच झुलतात
शब्दांनी साकारलेले स्वप्नांचे झुले. . .
आता पाय ठेवावा तिथे,
खचतोय् किनारा
वाहात राहाणेच कायम झाले. . . !

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ

(कार्यवृत्त २१–८–१९७८ ते २५–१०–१९७८)

गो. स. देहाडराय, सरचिटणीस

१. कार्यालय व्यवस्थापक

१.१ दि. २४–९–७८ ला कार्यकारी मंडळाची सभा वि. सा. संघाची गोंडवण शाखा 'चंद्रपूर' येथे झाली. ग्रंथालय संचनालयाच्या आलेल्या विनंती पत्रानुसार, पाठविलेल्या ठरावाची माहिती व वि. सा. संघाचे धनवटे रंगमंदिर शीतवातयुक्त करण्यासंबंधी माहिती आणि एनस्लायकोपिडीया ऑफ सोशिआलॉजी, न्यू दिल्ली, यांचेकडून इंग्लीश–हिन्दी–मराठी डिक्शनरी छापण्याबद्दल आलेल्या पत्रांची माहिती देण्यात आली. या अनुषंगाने चर्चा झाली. नेरपरसोपंत (जि. यवतमाळ) या शाखेला मान्यता देण्यात आली.

२. आजीव सभासद

(१) श्री. आनंद दत्तात्रय गोडसे, नागपूर, (२) डॉ. द. रा. भागवत, आकोला,. (३) श्री. ब्रिजमोहन भगिरथ हेडा, अमरावती.

३. मराठी साहित्य महामंडळ :

३.१ महामंडळाची जादा सभा चंद्रपूर येथे घेण्यात आली. चंद्रपूरला जानेवारी दि. ५–६–७–१९७९ रोजी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन घेण्याचे निश्चित करण्यात आले.

४. सांस्कृतिक कार्यक्रम

४.१ दि. ३१–८–७८, गणेश व्याख्यानमाला अंतर्गत प्रा. श्रीराम पुजारी, सोलापूर, यांचे "भारतीय संगीताची वाटचाल" आणि दि. १–९–७८ ला "संगीतातील समस्या" ह्या विषयांवर व्याख्यान झाले. ह्या व्याख्यान मालेतील एक व्याख्यान अकोला येथे दि. २९–८–७८ रोजी झाले.

४.२ दि. ८–९–७८ ला गेल्या काही वर्षातील "साहित्यातील घडामोडी" ह्या विषयावर परिसंवाद झाला. या परिसंवादात प्रा. वीणा मुळे, प्रा. केळकर व डॉ. देशपांडे यांनी भाग घेतला होता. परिसंवादाचे संयोजन सौ. स्वाति शहाणे यांनी केले.

४.३ दि. १–१०–७८, मुंबईचे सुप्रसिद्ध पत्र पंडित व साहित्यिक श्री. श्री. रा. टिकेकर ह्यांचे "अहिल्याबाई होळकर" ह्या विषयावर व्याख्यान झाले. याच प्रसंगी त्यांचा श्री. आ. रा. देशपांडे (अनिल) ह्यांचे हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

४.४ दि. १६–१०–७८, कोजागिरी निमित्त स्थानिक कवींचा कविता वाचनाचा कार्यक्रम झाला. संयोजन श्री. वामनराव निवाळकर यानी केले. यावेळी श्री. दुधलकर, कु. मीना गजभिये, श्री. ताकसांडे, आत्माराम राठोड, सुनिता मोहरील, श्री. प्रकाश खैरात, ज्योती लांजेवार, श्री. वालदेकर, सुनीती सप्रे, डॉ. रवी चरडे, अनिल कुळकर्णी, श्री. जेमिनी कडू, भाई पंचभाई इत्यादी कवींनी भाग घेतला.

५. स्मृति-दिन व जयंती

५.१ दि. ३०–८–७८, कवी 'बी' यांच्या पुण्यतीथी निमीत्त "चाफा" या कवितेवर परिसंवाद झाला. या परिसंवादामध्ये प्रा. प्रभाकर हेजीब, डॉ. सौ. आशा सावदेकर, श्री. अनंत अडावतकर व कु. लता ढोरे यांनी भाग घेतला. संयोजन सौ. सुलभा हेर्लेकर यांनी केले.

५.२ दि. २–१०–७८, गांधी जयंती निमित्त त्यांचे फोटोला हार घालण्यात आला.

५.३ दि. २४–१०–७८, पुण्याचे सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. श्री. ना. सी. फडके यांचे निधनानिमित्त शोक सभा घेण्यात आली. श्री. आ. रा. देशपांडे, प्रा. वा. कृ. चोरघडे, प्रा. श्री. मा. कुळकर्णी, डॉ. द. भि. कुळकर्णी, डॉ. सुनिल सुभेदार यांची भाषणे झाली. प्रास्ताविक गो. स. देहाडराय यांनी केले. समारोप डॉ. आष्टीकर यांनी केला. ठराव वाचून दाखविल्यावर उपस्थितांनी एक मिनिट उभे राहून श्रद्धांजली अर्पण केली.

६. संगीत समिती

६.१ दि. ३०–८–७८ ला गायन सम्राट पं. भीमसेन जोशी यांचे शिष्य श्री. माधव गुडी यांचा शास्त्रीय गायनाचा कार्यक्रम झाला.

६.२ दि. १४–९–७८ ला मुंबईचे प्रख्यात सुरमणी पं. मोहन प्रकाश यांचा हार्मोनियम वादनाचा कार्यक्रम झाला.

७. नाटच समिती

७.१ दि. ९–१०–७८ ला वि. सा. संघातर्फे श्री. बळवंत लामकाणे यांनी लिहिलेल्या स्वतंत्र सामाजिक "उमा" नाटकाचा प्रयोग वि. सा. संघाच्या धनवटे रंग मंदिरात झाला. दिग्दर्शक अरविंद पाठक. कलावंत– माणिक माटे, अविनाश सावदेकर, जयमणी मुदलीयार, मुकुल खोत, शिरीष वेळेकर, निरंजन पाठक हे होते.

७.२ दि. ९–९–७८, घर अंगण या कार्यक्रमांतंगत "मेकॅनिक यंग ग्रुप" यानी "भाजी पाव व रदिम्" ह्या एकांकीकेचा प्रयोग सादर केला. लेखक – रमेश पवार.

७.३ दि. २१/२२–१०–७८, विदर्भ साहित्य संघातर्फे बालनाटच स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. एकंदर १२ संस्थांनी भाग घेतला होता परंतु प्रत्यक्षात ११ संस्थांनीच एकांकीका सादर केल्या. उद्घाटन तरुण भारताचे मुख्य संपादक श्री. मा. गो. वैद्य यांचे हस्ते झाले. प्रथम क्रमांक–रंग स्वानंद "चिकी चिकी बोम बोम" रोख रु. १०१/- व फिरता चषक, द्वितीय क्रमांक–नवयुग विद्यालय 'झेल्या', रोख रु. ७५/-. तृतीय क्रमांक–सहयोग "राजाची दिवाळी", रोख रु. ५०/-. उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्र—बौद्ध विकास मंडळ "शेवटचे पान". वैयक्तिक अभिनयाची पारितोषिके— मुळे प्रथम रोख रु. २५/- संदेश लाम काणे, "राजाची दिवाळी" सहयोग. द्वितीय रोख रु. १५/-, अभय तेलंग "झेल्या" नवयुग विद्यालय. तृतिय रु १०/-, सुरज मोडक "शेवटचे पान" बौद्ध बाल विकास मंडळ.

उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्र— पराग माटेगावकर "तैमुर्लंग" देववाप्पा.
मुली–प्रथम रोख रु. २५/- कु. मंजुषा पाचपोर "चिकी चिकी बोम बोम" रंग स्वानंद."
द्वितीय रोख रु १५/- कु. वंदना बोरकर "लॉटरीवाला" आनंद कला निकेतन.
तृतिय रोख रु. १०/- कु. जयदेव "जेव्हां अकलेला अक्कल फुटते" लोकांची शाळा.

श्री अविनाश किन्हीकर यांनी ५१/- रु. दिग्दर्शनासाठी म्हणून जाहीर केले. त्याची बक्षीसे प्रथम–रोख रु. २५/- किशोर आयलवार, "चिकी चिकी बोम बोम" रंग स्वानंद. द्वितीय रोख रु. १५/- विलास कापटे "राजाची दिवाळी" सहयोग. तृतीय रु. ११/- रोख रमेशचंद्र दिक्षीत "झेल्या" नवयुग विद्यालय.

स्पर्धेचा बक्षीस समारंभ डॉ. मधुकर आष्टीकर यांचे अध्यक्षतेखाली होऊन सर्वांना त्यांचे हस्ते बक्षिस देण्यात आली. या कार्यक्रमानंतर कामगार वसाहत केन्द्र, पांढराबोडी, यांनी "सत्याचा शोध" बाल नाटय सादर केले. बक्षीसाच्या रकमेमध्ये वाढ करण्यात यावी म्हणून प्रा. ज. रा. फणसाळकर यांनी ह्या स्पर्धेसाठी यावर्षी रु. ५१/- देणगी दिली. श्री. किन्हीकर व फणसाळकर या दोघांचा वि. सा. संघ आभारी आहे. सर्वश्री डॉ. सुधीर सहस्त्रभोजने, प्रभाकर आंबोणे आणि डॉ. सौ. आशा देशपांडे यांनी परीक्षकांचे काम केले.

८. सन्माननीयांच्या भेटी

८.१ ११–९–७८, महाराष्ट्र राज्य आरोग्य मंत्री श्री. गाढेकर यांनी भेट दिली.

८.२ २८–९–७८, डॉ. तुळपुळे, शं. गो. यांनी वि. सा. संघाला भेट देऊन उपस्थितांशी साहित्यावर चर्चा केली.

८.३ ५–१०–७८, महाराष्ट्र राज्याचे माजी सभापती श्री. वि. स. पागे यांनी वि. सा. संघाला भेट दिली, त्यावेळी त्यांनी शिवाजी संदर्भ ग्रंथालयाचे निरीक्षण केले.

९. श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालय

९.१ २९–९–७८, श्री. "शिवाजी संदर्भ ग्रंथालया" मध्ये अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी नागपूर विद्यापीठाच्या एम. ए. मराठी विषयात १९७८ च्या परीक्षेत अपूर्व यश प्राप्त करून गुणवत्ता क्रमाने पास झालेल्यांचा सत्कार समारंभ नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. काळमेघ यांचे हस्ते करण्यात आला. सौ. कमल पांढरीपांडे, कु. चारूलता फत्तेखानी, श्री. रमेश कांबळे व निलीमा दाणी यांना बक्षिसे देण्यात आली.

१०. परीक्षा समित्ती

१० १ १९७८ च्या प्रथम सत्रात २७ ऑगस्ट आणि २३ सप्टेंबर याप्रमाणे क्रमशः शासकीय, पारंगत आणि अन्य सर्व परीक्षा एकूण १७ केन्द्रांत झाल्या. एकूण ६०२ परीक्षार्थी सम्मीलित झालेत.

१०.२ प्रथम सत्रातील पारितोपिक प्राप्तकर्ते आणि शासकीय व पदवी परीक्षांचा निकाल पुढे दिला आहे.

१० ३ आगामी परीक्षा २७ जानेवारी, १९७९ ला होतील. आवेदन पत्रे १५ नोव्हेंबरच्या आंत कार्यालयांत पाठवावी.

१०.४ प्रथम सत्रात साहित्य पारंगत चे वर्ग प्रा. माणिक के. वैतुले आणि डॉ. सौ. शकुंतला खोत यांचे कडून चालविले गेले. शासकीय परीक्षांचे वर्ग श्री. भा. य. लांवे आणि श्री. ह. गो. येगांवकर यांचे कडून चालविले गेले.

१० ५ प्रथम सत्रातील सर्व वर्गांचा समारोप दि. १९–९–७८ रोजी संघाध्यक्ष डॉ. मधुकरराव आष्टीकर यांचे अध्यक्षतेखाली पार पडला.

१०.६ शासकीय आणि साहित्य पारंगत परीक्षांचे वर्ग केन्द्र कार्यालयात ५ नोव्हेंबर पासून सुरु होतील.

१०.७ **पारितोषिक प्राप्तकर्ते**

	विद्यालयीन परीक्षा		परीक्षार्थ्यांचे नांव	केन्द्र	पुरस्कार रक्कम
					रु. पै.
	म. प्रवेश		कु. आशा जेठानंद मुलचंद मादरानी	बाबानानक हायस्कूल, नागपूर	५-००
	म. परिचय		सदानंद भाऊराव कोल्हे	कुर्वेज न्यू मॉडेल हायस्कूल, नागपूर	५-००
	म. बोध		कु. कल्पना गोटुलाल भांगडिया	नेहरु विद्यालय, चिमूर	५-००
	म. प्रबोधिनी		संजय नंदकिशोर तिवारी	कुर्वेज न्यू मॉडेल हायस्कूल, नागपूर	५-००
	म. प्रबोध उच्चस्तर		कु. रजिया बेगम		५-००
			म. रीयास खां सरदार खां		५-००
	म. प्रारंभ		रघुनाथ मेंगाजी बोरकुटे	जि. प. हायस्कूल, गुंजेवाही	५-००
१०.८	**महाविद्यालयीन**				
	भाषा परिचित		अनिल मार्तंडराव सुदामे	भा. भा. मंदिर, नागपूर	५-००
	भाषा स्नातक		कु. मेघा दिक्षीत	भा. भा. मंदिर, नागपूर	५-००
	सा. स्नातक	१	सौ. मंगला विजय देशकर	भा. भा. मंदिर, नागपूर	५-००
		२	सौ. विजया अरविंद जागिरदार	भा. भा. मंदिर, नागपूर	५-००
		३	कु. नूतन म. बर्वे	भा. भा. मंदिर, नागपूर	५-००
	सा. परिचित	१	चक्रधर उत्तमराव पवार	मडघे वि., कविठा बु.	५-००
	सा. परिचीत	२	ओंकारनाथ पंढरीनाथ निनावे	कर्मवीर विद्यालय, नागभिड	५-००
	सा. विनीत		उद्धव बाजीराव कविटकर	श्रीमती जनाबाई नाथे विद्यालय, काकडा	५-००

१०.९ १९७८–७९ प्रथम सत्र पदवी परीक्षेत पुढील परीक्षार्थी उत्तीर्ण झाले आहेत––

साहित्य स्नातक पदवी परीक्षा–– प्रथम श्रेणी सर्वप्रथम–– सौ. मंगला विजय देशकर, सौ. विजया अरविंद जागिरदार, कु. नूतन म. बर्वे.

द्वितीय श्रेणी–– कु. रेखा मनोहर ओक, कु. निर्मला तुकारामजी तळवेकर, श्री. महंमद इसरार महमद अमीन शेख.

तृतीय श्रेणी–– कु. विमल विश्वनाथ पोटदुखे.

भाषा स्नातक पदवी परीक्षा–– प्रथम श्रेणी सर्वप्रथम–– कु. मेघा दिक्षीत.

द्वितीय श्रेणी–– कु. मिना जनार्दनजी चन्ने, दामोदर मारोतराव सेलोकर.

तृतीय श्रेणी–– विलास मोरेश्वरराव पवार, काशिनाथ बळीरामजी आमले, देवेंद्रकुमार शर्मा, नथ्यू हरी मेश्राम, राम जनार्दन पिंपळखुटे, अब्दुल जब्बार, ज्ञानेश्वर शेषराव राऊत, श्री. माजिद, नुरूल्ला, मो. मुमताज अहमद, रमेश निळकंठराव वाघमारे.

अनुक्रमणिका

१०..१० साहित्य पारंगत खंड–२

---- सौ. भाग्यश्री प्रमोद काळीकर, सर्वप्रथम (डॉ. सिंगणापूरकर सुवर्णपदक प्राप्त).

१०.११ साहित्य पारंगत खंड–१

(जनता कॉलेज, चंद्रपूर) :— कु. शोभा वामनराव शेंडे, श्री. प्रकाश विश्वनाथ जिवने.

(शिवाजी हायस्कूल, दारव्हा) :— श्री. अशोककुमार अंबादास बैतुले, मधुकर अंबादास बैतुले, सुधाकर तुकारामजी दरेकर, रविंद्रकुमार कृष्णराव तायडे, प्रभुदास मनिराम ताजने, विलास परशरामजी भागडे, प्रमोदकुमार नारायणराव अंजनकर, मोहंमद अब्दुल हमीद खाँ, श्री. नारायणदास लढ्ढा.

(भा. भा. मंदिर, नागपूर) :— कु. नलिनी केशवराव झाडे, कु. कल्पना भानुदय भांबुरकर, सौ. मालती मधुकर साठे, विजयकुमार नारायणराव इंगळे.

१०.१२ १९७८–७९ च्या प्रथम सत्र मराठी प्रवीण व प्राज्ञ परीक्षेत पुढील विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत:—

मराठी प्रविण (निम्नस्तर)

प्रथम श्रेणी :— श्री. अरुणकुमार सरकार, सर्वप्रथम, पुरस्कार रु. १५/- रोख, श्री. अब्दुल वाहाब शेख.

मराठी प्राज्ञ (उच्चस्तर)

प्रथम श्रेणी :— श्रीमती एल्सी फ्रानसीस ए., सर्वप्रथम, पुरस्कार रु. १५/- रोख, श्री. योग राज साहनी (प्राविण्य), कु. सोसाम्मा अब्राहम (प्राविण्य), श्री. जयसिंघानी साजनदास ईसरदास (प्राविण्य), श्री. मामीडवार नरसिंग नागय्या, श्री. टी. एन. गोपालकृष्णा पिल्ले, श्री. गोपाल चंद्र त्रिपाठी, सौ. विजया चंद्रकान्त सावरकर, डॉ. सौ. काननीका गोपाल चंद्र त्रिपाठी, श्री. जयहिंदकुमार अमीरचंद सिंघई, कु. प्रतिभा रामभरोस यादव, श्रीमती माधीवकुट्टी जि. वरियर, डॉ. कुसुमलता पटोरिया जैन.

द्वितीय श्रेणी :— श्री. बि. एन. देवराज, ए. के. जोसफ.

सुविधा :—

विशेष पुरस्कार :— सर्व प्राविण्य संपादन करणाऱ्यांना प्रत्येकी रु. १०/- रोख पुरस्कार.

११. शाखा वृत्त

११.१ वणी शाखा :– दि. २७–८–७८, लोकनायक अणे जयंतीनिमित्त 'तांबे यांचा कलावाद' ह्या विषयावर डॉ. सौ. आशा सावदेकर यांचे भाषण झाले.

११.२ दि. ९–९–७८, शाखेचे एक सभासद श्री. परशुरामपंत गोरकार यांच्या ७५ व्या वाढदिवसा-निमित्त अभिष्टचिंतन करण्यात आले. त्यावेळी स्वातंत्र्य संग्राम काळातील त्यांच्या आठवणी कथन केल्या.

११.३ दि. २२–९–७८, श्री खंडारे, बचत विकास अधिकारी, वर्धा, ह्यांचे पुनर्जन्म आहे काय ? ह्या विषयावर व्याख्यान झाले व त्यानंतर प्रश्नोत्तराचा कार्यक्रमही चांगला झाला.

११.४ दि. २–१०–७८, "कौमुदी" या काव्य संग्रहाचे प्रकाशन प्राचार्य राम शेवाळकर ह्यांचे हस्ते झाले. काव्य संग्रहाचे संपादन राम बोडेकर ह्यानी केले आहे.

अनुक्रमणिका

११.५ वणी शाखेची १९७८–७९ कार्यकारिणी खालील प्रमाणे आहे. अध्यक्ष–ना. मा. सरपटवार कार्याध्यक्ष–माधव सरपटवार, उपाध्यक्ष–अ. स. ढुमणे, सौ. विजयाताई पाटील, सरचिटणीस–वामन ठाकरे, चिटणीस–ना.व. कावडकर, गौतम सुत्रावे, हिशेब तपासणीस–श्री वि. पाध्ये, सदस्य–शा.सी. कवडे, तारा चोपडा, सर्वश्री कृष्णा लाडसे, मा. ता. राजगडकर, बा. झा. कांबळे, पु. मा. रेभे, गणपत पाटील, रा. गि. ढुमे, अॅड. अनंतराव देशपांडे, अॅड. वि. कृ. कोंडावार, डॉ. ला. तु. राजकोंडावार, डॉ. ल. गो. ढुमे, श्री. दादासाहेब हूड, भय्यासाहेब पांपदीवार, वसंतराव पाटील, पु. हृ. दामले, सुभाष उसेवार.

११.६ नागभीड शाखा

दि. ९–९–७८, कै. ज. स. जनवार स्मृति पारितोषिक वितरण समारंभ डॉ. लीना रस्तोगी यांचे हस्ते झाला. कु. मनिषा जोशी हिला पारितोषिक मिळाले. त्याचवेळी 'साहित्य आणि समाज' या विषयावर व्याख्यान झाले.

११.७ दि. १०–९–७८, बाल चित्रकार हेमंत जोगळेकर ह्यांच्या चित्राचे प्रदर्शन भरविण्यात आले व त्यांचा सत्कार करण्यात आला.

११.८ २२–१०–७८, "साहित्यायन" नावाने कथाकथन, ग्रंथपरिक्षण आणि कविसंमेलन कार्यक्रम झाला. प्रा. ना. सी. फडके यांच्या निधनाबद्दल शोक सभा घेण्यात येऊन मूक श्रद्धांजली अर्पण केली.

११.९ गोंदिया शाखा

दि. १२–८–७८, श्री. ललगूणकर यांच्या "कदंळ" काव्य संग्रहाचे प्रा. श्रीधर शनवारे यांचे हस्ते उद्घाटन करण्यात आले. त्याच वेळी सौ. ललगूणकर, सौ. पाटणकर, कु. अंजली बापट व कु. अर्पणा कुलकर्णी यांचे काव्य गायन झाले.

११.१० १३–८–७८, ना. मंत्री छेदिलालजी गुप्ता यांचा वि. सा. संघाचे अध्यक्ष डॉ. आष्टीकर यांचे हस्ते स्वागत समारंभ साजरा झाला.

१९७८–७९ साठी कार्यकारिणीची खालील प्रमाणे निवड करण्यात आली : अध्यक्ष–सौ. मनोरमाबाई धोटे, उपाध्यक्ष–श्री. प्र. शं. तनखीवाले, सौ. शालीनी कुळकर्णी, कार्यवाह–रमेश कोतवाल, सरचिटणीस –वसंत क्षिरे, वसंत मातुरकर, चंद्रशेखर तेलंग, कोषाध्यक्ष–ना. गो. बापट, वास्तु व्यवस्थापक–श्री. वसंत देव, सुरेश आकांत, वाङमयीन कार्य समीती–रमेश ललगूणकर, नाटय समिती–कृष्णा चौधरी, कार्यकारिणी सदस्य– सर्वश्री कृ. गो. आकांत, माणिक गेडाम, मा. बा. भडकमकर, मधुकर ढोक, अ. शे. पांढरीपांडे, रवींद्र राठोड, बा. का. देशमुख, मणिभाई मयूर, डॉ. सौ. आसावरी कुळकर्णी, सौ. सिंधू नामजोशी, सौ. मोहना मार्डीकर, श्री. देशपांडे, श्री. विलास देशपांडे.

११.११ लाखणी शाखा

दि. ६–१०–७८, शाखेचा वर्धापन दिन डॉ. मधुकर आष्टीकर यांचे अध्यक्षतेखाली झाला. याचवेळी निबंध स्पर्धक, लाखनी केन्द्रातून माध्यमिक उच्च माध्यमिक व बी. ए. ला मराठी वाङमयात सर्वोच्च गूण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा अध्यक्षातर्फे सत्कार करण्यात आला.

११.१२ अकोला :

दि. २९-७-७८, गणेश व्याख्यान मालेतील एक व्याख्यान प्रा. श्रीराम पुजारी, सोलापूर, यांनी दिले.

११.१३ दि. २९।३०-९-७८ व १-१०-७८ या वर्षीच्या न्या. रानडे आंतर महाविद्यालयीन वादस्पर्धा रा. ल. तो. महाविद्यालय येथे घेण्यात आल्या. रा. ल. तो. महाविद्यालयाच्या श्रीहरी मांडवगणे व श्रीकांत देशपांडे या चमूने रौप्य ढाल जिंकली. सर्वोत्कृष्ट वक्त्याचे १००/- रु. चे पहिले रोख बक्षीस श्रीहरी मांडवगणे यांना मिळाले. द्वितीय पारीतोषिक रोख बक्षीस रु. ७५/- धरमपेठ महाविद्यालयाची कु. विशाखा निमखेडकर हिला देण्यात आले. 'सांसदीय लोकशाही विकसनशील देशाला उपयुक्त नाही' हा वादविवादाचा विषय होता. स्पर्धेचे संचालन प्रा. पंढरीनाथ मांडवगणे यांनी केले.

११.१४ नरखेड शाखा

दि. १५–८–७८, गुरुकुंज मोझरी येथील स्वामी निगुर्णानंदजी यांचे संतकवी तुलसीदास यांचे साहित्यातील कार्य या विषयावर व्याख्यान झाले.

इतर शाखांचे वृत्त हाती आले नाही.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन

यंदाचे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ५३ वे अधिवेशन चंद्रपूर येथे जानेवारी १९७९ दि. ५, ६, ७ ला होणार आहे.

जास्त माहितीसाठी :–

वि. सा. संघ, झांशी राणी चौक, नागपूर-१२ ह्या पत्त्यावर चौकशी करावी.

किंवा

संयोजक, **अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन**, सरदार पटेल महाविद्यालय, मंडई वार्ड, चंद्रपूर–४४२४०१ यांच्याशी पत्रव्यवहार करावा.

अनुक्रमणिका

प्रकाशक : गो. स. देहाडराय, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, नागपूर १२.

मुद्रक : क. मा. सावंत, व्यवस्थापक, नागपूर विद्यापीठ मुद्रणालय, नागपूर.

कार्यवृत्त

विदर्भ साहित्य संघ
१६ सप्टेंबर १९७५ ते १५ आक्टोबर १९७५

गो. स. देहाडराय,
सरचिटणीस

१. सांस्कृतिक कार्यक्रम

१.१ **न्या. मू. रानडे आंतरमहाविद्यालयीन वादस्पर्धा:–** ही स्पर्धा वक्तृत्त्वोत्तेजक सभा पुणे आणि वि. सा. संघ या संस्थांच्या विद्यमाने दि. २६, २७ व २८ सप्टेंबरला धनवटे रंग मंदिरात आयोजित करण्यात आली. स्पर्धेचा विषय 'सध्याच्या शिक्षणाचा दर्जा खालावला आहे!' हा होता. एकूण १६ महाविद्यालयाच्या ३२ स्पर्धक विद्यार्थ्यांनी भाग घेतला. ह्या स्पर्धेत फिरती रौप्य ढाल नागपूरच्या इंदिरा मेडिकल कॉलेजने मिळविली. श्री. सुरेश शास्त्री, इंदिरा मेडिकल कॉलेज यांना १०० रुपये रोख आणि कु. प्रतिभा शास्त्री धरमपेठ महाविद्यालय यांना ७५ रु. रोख अशी वैयक्तिक पारितोषिके देण्यात आली. कु. गीता वैद्य विज्ञान महाविद्यालय व श्री. एन्. जे. गडकरी, हिस्लॉप महाविद्यालय यांना प्रमाणपत्रे देण्यात आली.

दि. २८ सप्टेंबरला सकाळी १०॥ वाजता विभागीय आयुक्त श्री केशव बळवंत मंडलेकर यांचे हस्ते पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला. "आजच्या युगांतील महाविद्यालयीन विश्वांत वादस्पर्धेला अत्यंत महत्त्व आहे. अभ्यासाव्यतिरिक्त जो विद्यार्थी या कलेत नैपुण्य मिळवितो तो यशस्वी जीवन जगतो. वि. सा. संघ या दृष्टीने प्रयत्नशील आहे याबद्दल ती संस्था अभिनंदनास पात्र आहे." असे उद्गार श्री. मंडलेकर यांनी पारितोषिक वितरण प्रसंगी काढले. अध्यक्षस्थानी संघाध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे, कवि अनिल, होते. शेवटी स्पर्धेचे आमंत्रक श्री. वा. के. अत्रे यांनी आभार मानले.

१.२ कवीवर्य कै. अण्णाजी वोवडे यांच्या स्मृतिदिनानिमित्त दि. १–१०–१९७५ ला संघाध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे (अनिल) यांचे हस्ते त्यांच्या छायाचित्राला पुष्पमाला अर्पण करण्यात आली.

१.३ दि २ आक्टोबर हा राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा जन्मदिन. त्या दिवशी सकाळी ८ वाजता संघाचे उपाध्यक्ष श्री त्रि. गो. देशमुख यांचे हस्ते पूज्य महात्माजींच्या छायाचित्राला पुष्पमाला अर्पण करण्यात आली.

१.४ दि. २ आक्टोबरला संध्याकाळी ६–३० वाजता विदर्भातील पहिले मराठी कादंबरीकार आणि विदर्भातील हरिभाऊ आपटे म्हणून ख्यातनाम असलेले कै. बाळकृष्ण सन्तुराम गडकरी यांच्या छायाचित्राचे अनावरण संघाध्यक्ष श्री. आ. रा देशपांडे, कवि अनिल, यांचे हस्ते झाले. या प्रसंगी कै. बा. सं. गडकरी यांच्या साहित्यावर अभ्यासपूर्ण प्रबंध लिहून विक्रम विद्यापीठाच्या डॉक्टरेट मिळविणाऱ्या सौ. सिंधुताई मांडवकर यांनी कै. गडकऱ्यांच्या वाङमय कर्तृत्वाची ओळख करून दिली. गडकरी कुटुंबियातर्फे कै. गडकरी यांचे चिरंजीव श्री. मु. बा. गडकरी यांचे भाषण झाले. शेवटी श्री. आ. रा. देशपांडे यांनी समारोपादाखल भाषण करून सर्वांचे आभार मानले. या समारंभास कै. गडकरी यांचे आप्तेष्ट, शिष्य व मित्रमंडळी मोठ्या प्रमाणावर गडकरी सभागृहात उपस्थित होती.

१.५ मराठीचे सुविख्यात कादंबरीकार, लघुकथा लेखक आणि थोर साहित्यिक पद्मभूषण श्री. विष्णु सखाराम उपाख्य भाऊसाहेब खांडेकर यांना १९७४ चे ज्ञानपीठाचे, एक लाख रुपयांचे सर्वोच्च पारितोषिक मिळाले. श्री. भाऊसाहेब खांडेकर वि. सा. संघाचे सन्माननीय सभासद आहेत. त्यांच्या या गौरवाबद्दल संघातर्फे त्यांना अभिनंदनपर तार पाठविण्यात आली.

२. रंजन कला मंदिर संस्थेचे स्थानांतर

संघाच्या वास्तूमधील कोठेकर दालन रंजन कला मंदिर या संस्थेने रिकामे करून देऊन दि. २८ सप्टेंबर १९७५ ला स्थानांतर केले. निरोपप्रसंगी रंजन कला मंदिराचे अध्यक्ष श्री. प्रभाकर चांदेकर व संघाध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे यांची भाषणे झाली. कै. नाना जोग यांचे तैलचित्र व तीन टयूब लाइट साहित्य संघाला सप्रेम भेट दिल्याचे श्री. मनोहर म्हैसाळकर यांनी प्रकट करताच संघाध्यक्षानी त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

३. शाखावृत्त

३.१ गोंदिया:–

विदर्भ साहित्य संघाच्या गोंदिया शाखेची वार्षिक सभा दि. २१ सप्टेंबरला भवभूती मंदिरांत होऊन चालू वर्षासाठी पदाधिकाऱ्यांची निवड करण्यांत आली. ती येणेप्रमाणे
अध्यक्ष सौ मनोरमाबाई धोटे, उपाध्यक्ष : श्री. बाबासाहेब तनखीवाले, कार्यवाह श्री. रमेश कोतवाल, सहकार्यवाह सर्वश्री रमेश ललगुणकर, वसंत भातुरकर, वास्तु व्यवस्थापक : वसंतराव देव, सदस्य प्रा. कृष्णा चौधरी, श्री. यशवंत सरूळकर, सौ. निलीमा कुळकर्णी, सर्वश्री वसंत क्षिरे, धनंजय उके, प्रकाश एदलाबादकर, मनोहर जोशी, शेंडे, बाबुराव पांडे, शं. द. कोलपेचवार.

३.२ दारव्हा:–

दि. ४ व ५ आक्टोबरला नागपूरचे तरुण संशोधक श्री. विजय देशमुख यांची 'सूर्यपुत्र कर्ण' या विषयावर व्याख्याने झाली.

इतर शाखांचे वृत्तांत हाती आले नाहीत.

या मासिकाला वापरलेला कागद हा महाराष्ट्र राज्य शिक्षण खात्याने उपलब्ध करून दिलेला सवलतीच्या दरातील कागद आहे.

प्रकाशक : गो. स. देहाडराय, सरचिटणीस, वि. सा. संघ, झाशी राणी चौक, नागपूर–१२.

मुद्रक : श्री. वि. गंधे, प्रदीप मुद्रणालय, उत्तर अंबाझरी मार्ग, नागपूर – १०.

अनुक्रमणिका